

शंभर वर्षांपूर्वी

चंदेल प्रकाशन

का. न. केळकर

शंभर वर्षांपूर्वी

(१८५७ मधील मनोवेधक हकिगती)

लेखक

काशिनाथ नरसिंह केळकर, ॲडव्होकेट

हिंदुव्यवहार धर्मशास्त्र, नव्या स्मृतीची आवश्यकता,
नेपोलियन व हिटलर, शमीपूजन, इत्यादि ग्रंथांचे कर्ते

चंदेल प्रकाशन

१९५७] [किं. रु. १·५०

प्रकाशक :
शं. भा. चंदेल
चंदेल प्रकाशन
८६६ सदाशिव, पुणें २

मुद्रक :
य. गो. जोशी
आनंद मुद्रणालय
१९६।४६ सदाशिव : पुणें २

ती० ताईस अर्पण

ग्रंथकर्त्याचे चार शब्द

दहा वर्षांपूर्वी मीं शमीपूजन हें पुस्तक लिहिलें तेव्हां याच विषयावर माझ्या हातून दुसरें एखादें पुस्तक लिहिलें जाईल असें वाटलें नव्हतें. पण १८५७ च्या शताब्दीचें निमित्तानें ही गोष्ट घडून आली. शमीपूजन लिहितांना १८५७ च्या इतिहासाचें मुख्य सूत्र साधार उलगडून दाखवण्याकडेच माझी दृष्टी होती. आणि तें काम अगदी थोडक्या जागेंत करावयाचें असल्यानें कित्येक मनोरंजक हकीगती जितक्या तपशीलवार रीतीनें द्यावयास हव्या तितक्या मला त्या देतां आल्या नाहींत. या पुस्तकांत ऐतिहासिक विवेचनावर भर न देतां, तत्कालीन हकीकतीच जास्त सांगण्यावर मीं भर दिला आहे. पूर्वी इंग्रजी राज्य असतांना माझ्या मनांत सहजच प्रतियोगी भावना वावरत होती. व आपल्या पक्षाची बाजू आपण साधार व सविस्तर पुढें मांडीत आहोत असा मनांत अभिनिवेश होता. या पुस्तकाची भूमिका अर्थात् वेगळी आहे. आपण मुलांचेंपुढें बसून तत्कालीन घडलेल्या गोष्टी सरळ रीतीनें त्यांना सांगत आहोत अशी या पुस्तकाची भूमिका आहे. मुलांचेपुढें बोलतांना संदर्भ ग्रंथ किंवा आधार यांचा उच्चार वारंवार करावा लागत नाही. तुमच्या ऐतिहासिक माहितीवर त्यांचा विश्वास असतो. पण यामुळेंच तुम्हीं त्यांना अयथार्थ असें कांहीही सांगू नये ही जबाबदारीहि सहजच तुमचेवर पडते. याकरिता डॉ. सिल्व्हेस्टर, फोबर्स मिचेल, लंडन टाईम्सचा युद्धवार्ताहर विल्यमरसेल वगैरे तत्कालीन लोकांनी समक्ष पाहिलेल्या हकीगतींचा या पुस्तकांत विशेष उपयोग केला आहे. समक्ष पाहिलेल्या गोष्टी स्वभावतःच किती मनोरंजक असतात, आणि ऐतिहासिक पुराव्याच्या दृष्टीनें त्या पहिल्या प्रतीच्या साधनांत कशा मानता येतात हें जाणत्यांना सांगण्याचें कारण नाही.

१८५७ च्या विषयासंबंधानें इंग्रजी साधनें म्हणजे चरित्रें, आठवणी, अस्सल पत्रसंग्रह, पार्लमेंटरी रिपोर्ट वगैरे अगदी विपुल आहेत. पण हिंदी लोकांच्या बाजूची साधनें इतकी थोडी व क्षुद्र आहेत

कीं तें पाहून वाईट वाटतें. नानासाहेब पेशवे, झांशीवाली राणी, तात्या टोपे यांच्या हातचें एकही अस्सल पत्र किंवा हस्ताक्षर अद्याप पहाण्यांत नाही. अशा स्थितींत इंग्रजी साधनग्रंथांचा हात धरून, आणि ठिकाठिकाणीं स्वतःचा युक्तिवाद आणि तारतम्य चालवून अंधारांतून चांचपडत वाट काढावीं लागते. चार वर्षांपूर्वीं भारतीय इतिहाससमिती सरकारनें निर्माण केली, तिनें १८५७ मधील प्रमुख व्यक्तिविषयीं कांही नवीं साधनें उजेडांत आणलीं असतीं तर फार उपकार झाले असते. पण या बाबतींत सरकारनें इतिहास संशोधकांच्या योगाक्षेमाकरितां ५ लक्ष रुपये खर्च करूनहि, या समितीनें इतिहासाचा खंड तर राहोच पण अस्सल साधनांचे एक चिटोरेंहि प्रसिद्ध केलें नाही. पूर्वीं पैसा नाही म्हणून इतिहाससंशोधन होत नाही अशी ओरड होती, आतां पैशाचा पाऊस पडूनहि पुन्हां तीच रड आहे हें पाहून मनाला गंमत वाटतें. दुसरें काय म्हणणार ? याबाबतींत स्वतःला जें सुचेल आणि ज्याला जें शक्य होईल तें त्याने करून मोकळे व्हावे हेंच खरें.

या पुस्तकांत वरसईकर गोडसे भटजींच्या बखरीबद्दल एक लेख दिला आहे. हीं बखर मीं दोनतीन वेळां मुळांतून बारकाईनें वाचून पाहिली आहे. यांतील बाणपूरच्या राजाविषयींची हकीकत (' माझ्या प्रवास ' या छापील पुस्तकांत नसलेली) मी केसरींत १९३८ सालीं प्रासिद्ध केली होती. तसेंच १९४४ सालीं ' सह्याद्रिच्या मे महिन्याचे अंकांत मूळ गोडसे बखर आणि ' माझा प्रवास ' हें छापील पुस्तक यांत कोठें कोणता फरक आहे याबद्दल एक चिकित्सक लेख प्रसिद्ध केला होता. तोच या पुस्तकांत उद्धृत केला आहे. अलिकडे चित्रशाळेनें काढलेल्या ' माझा प्रवास' या पुस्तकाच्या नव्या आवृतींत श्री. न. र. फाटक यांनी जी प्रस्तावना लिहिली आहे ती वाचकांनी या पुस्तकांतील माझ्या लेखाशी अवश्य ताडून पहावी. म्हणजे कै. चिंतामणरावांवर श्री. न. र. फाटक यांनी जो गहजब उडवून दिला तसा उडवून देण्याचें खरोखर कारण नव्हतें असें दिसून येईल. टीकाकार याचा प्राकृत अर्थ, दुसऱ्याची निंदा करणारा किंवा रेवडी उडवणारा इतकाच आपण समजतो. पण याचा खरा अर्थ दुसऱ्याचें अंतरंग सहृदयतेनें समजून घेणारा व तो विषद करणारा असाच वास्तविक आहे. ही सहृदयता

श्री . न. र. फाटक यांचें अंगी असती तर त्यांनी आपला लेख वेगळ्या भाषेनें लिहिला असता. पण जोपर्यंत गोडसेभटजींची मूळ बखर किंवा चिंतामणराव वैद्य यांचे ‘ माझा प्रवास ’ हें छापील पुस्तक जगांतून नाहीसें होत नाहीं, तोंपर्यंत या टीका प्रतिटीकांचा विषय सर्व सोडून दिला तरी चालण्यासारखें आहे ! उदयोन्मुख नव्या पिढींतील तरुणांचीं मनें अत्यंत निकोप आणि आरशासारखीं स्वच्छ असतात. साहित्यिक आणि संशोधक यांच्यामधील हेवेदावे त्यांच्या मनापर्यंत पोंचूच शकत नाहींत. इतिहासांतील सत्यासत्य किंवा एखाद्या व्यक्तीचें मोठेपण हें त्यांना अंतर्मनानें समजल्याप्रमाणे अगदी आपोआप लक्षांत येते. म्हणून, अशा निकोप अंतःकरणाच्या मुलांच्या मेळाव्यांत आपण जाऊन बसावें आणि स्वतःच्या विद्वत्तेचा कोणताहि अभिनिवेश अंगी न बाळगता आपलें हृद्गत त्यांच्यापाशींच उघडून दाखवावें असें मला फार वाटतें. हें पुस्तक केवळ त्याच हेतूनें लिहिलें आहे.

पुणें
१० मे १९५७

का. न. केळकर

अनुक्रमणिका

* * *

१ कधीहि न संपणारी गोष्ट

माझीं मुलें—नातवंडें कित्येकदा “ बापूकाका ! गोष्ट सांगा ” म्हणून माझा पिच्छा पुरवितात. त्यांना मी म्हणतो, “ मी बुड्ढा मनुष्य. तुम्हांला आवडतील अशा मजजवळ कुठे आहेत गोष्टी ? तुम्ही शाळाकॉलेजच्या नव्या जगांत वावरणाऱ्या मुली, तुम्हांला गोष्टी नव्यानव्याच हव्यात. आणि सांगणारहि नवा म्हणजे तरुण असला तर उत्तमच ! नव्हे का ? आमच्या गोष्टी कसल्या इतिहासांतल्या जुन्या ! त्या ऐकून मांजर देखील शेपूट हलवणार नाही; मग मनुष्याने कान टवकारणें दूरच. मी झिन्नत महालची गोष्ट सांगूं लागलो तर तुम्ही रग अंगावर ओढून घ्याल आणि जांभई देऊन झोंप काढायला लागाल ! ”

‘ हें हो काय बापूकाका ? ’ शकू म्हणाली. “ गोष्ट सांगितलीच पाहिजे तुम्ही आज. केसरीच्या ग्रंथशाळेमधून तुम्हीं मोठमोठीं गोष्टींचीं पुस्तकें आणून वाचतां आणि आम्हांला मात्र कांही सांगत नाही. तुम्ही नेपोलियनच्या गोष्टी, १८५७ मधल्या तात्या टोपेच्या गोष्टी कितीतरी वाचल्या आहेत.”

“ अन् आम्हांला मात्र सांगत नाही ! ” शैलू गाल फुगवून मध्येच म्हणाली.

“ त्या बंडांतल्या गोष्टी होय ?–” मी म्हणालों. “ त्यांत कुणाचा हात तुटला तर कोणाचा पाय तुटला ! त्याचें काय आता. आपले तर हातपाय धड आहेत ना ? मग आपणांला या गोष्टी काय करायच्या ? ”

“ मग असें जर आहे तर देशभर १८५७ च्या शताब्दीचा उत्सव करणार आहेत तो कशाकरिता ? आमच्या शाळेंत देखील इतिहासाचे

मास्तर त्या विषयावर व्याख्यान देणार आहेत आणि मॅजिक लँटर्नने चित्रेंहि दाखविणार आहेत." अशोक म्हणाला.

" सांगानात का त्या मुलांना एखादी गोष्ट, तीं मुलें इतकीं पाठीमागे लागलीं आहेत तर," सुशिलाबाई म्हणाली.

मग मला वाटलें की आता गोष्ट सांगण्यावांचून सुटकाच नाही. तरीहि कांहींसें थट्टेने मी त्यांना म्हणालों, " हें पाहा मुलांनो ! मला गोष्टीबिष्टी कांहीएक येत नाहीत... मी कांहींतरी वाचतों हें खरें. पण तें विसरून जातों. मी तुम्हांला फार तर माझी गोष्ट सांगतों. ऐकाल तुम्ही ? "

यावर सगळेजण एकदम एका आवाजाने म्हणाले, " काय तुमची स्वतःची गोष्ट ? मग सांगा, तीच सांगा."

" बरें तर ऐका हं," असें म्हणून अंगावर शाल पांघरून घेऊन त्या मुलांमध्ये मी बसलों. आणि गोष्टीची सुरुवात स्वतःपासून करून १८५७ मधील कित्येक हकीगती त्यांना सांगितल्या. दररोज रात्रीं गोष्टी सांगण्याचा तो क्रम कित्येक दिवस सुरू होता. जेवणें-खाणें झाल्यावर अंथरुणावर बसून गोष्ट सांगायला सुरुवात केली म्हणजे, " दिनारजादी शाहजादीला म्हणते " या अरेबियन नाइटमधील वाक्याची आठवण येऊन मला हसू येत असे ! कारण दिनारजादीच्या गोष्टी जशा संपत नसत, तशा माझ्याहि गोष्टी संपत नसत. आणि त्या संपणार तरी कशा ? कारण १८५७ चें युद्ध म्हणजे एक रामायणच आहे. त्यांत वीरकथांप्रमाणे हर्ष व शोक यांच्या गोष्टी कितीतरी !

एके दिवशीं १८५७ विषयी अशाच गोष्टी निघाल्या त्या सांगत असतांना मी म्हणालों, " पूर्वजन्माचा ऋणानुबंध म्हणा किंवा कांहीं म्हणा, १८५७ च्या इतिहासाचा व माझा कांहीं संबंध असावा असें मला वाटतें. कारण त्याशिवाय या विषयाचा मला इतका ध्यास न लागता; आणि ' शमीपूजन ' हें पुस्तक लिहिण्याकरिता मी दहा वर्षें श्रमहि केले नसते ! अगदी लहानपणी, वरसईकर गोडसे भटजींचे ' माझा प्रवास ' हें बंडासंबंधी पुस्तक माझ्या हातीं पडलें. तेव्हापासून या विषयाचा धागा माझ्या मनांत उत्पन्न झाला. आणि त्यानंतर जेव्हा जेव्हा या बंडांतील प्रमुख लोकांसंबंधी गोष्टी निघत त्या त्या वेळी त्या लोकांचा मी पक्षपाती होतो.


१९३७ सालीं या विषयासंबंधी संशोधन करण्याकरितां मी उत्तर हिंदुस्थानचा प्रवास केला. त्या प्रवासांत, दिल्ली, आग्रा, झांशी, कानपूर, ब्रह्मावर्त, इत्यादि पुष्कळ ठिकाणीं हिंडून मी बंडांतील अनेक ऐतिहासिक स्थळें पाहिलीं. तीं पाहिल्यावर मी वाचलेला १८५७ चा सर्व इतिहास माझ्या मनांत संपूर्ण रीतीने साकार व सजीव झाला. नर्मदा ओलांडून वर जाऊं लागलें म्हणजे बुंदेलखंडाचें वैभव असलेले जुने किल्लेकोट, गढ्या, मंदिरें, देवालयें वगैरे दिसूं लागतात. या बांधकामाचा नमुना शिल्प या दृष्टीने महाराष्ट्रांतल्या बांधकामापेक्षा अधिक सुंदर वाटतो. झांशीच्या तटाची व किल्ल्याची १८५७ च्या युद्धांत पुष्कळ पडझड झाली. आणि जाळपोळीमुळे त्यांतील वाडे उद्ध्वस्त केले गेले. पण आज उभा असलेला हा अजिंक्य किल्ला अवश्य पाहण्यासारखा आहे. शहरांत जुना राजवाडा, गणपतिमंदिर व महालक्ष्मीचें मांदिर आहे. या महालक्ष्मीवर झांशीच्या राणीची फार श्रद्धा असे. त्या मूर्तीचें ध्यान कसें असेल बरें, असें केव्हा केव्हा वाटे, आणि मनांत त्या मूर्तीचें कांहीं एक रूप प्रवासाला निघण्यापूर्वीं साकार झालें होतें. पण सांगण्यासारखी गोष्ट म्हणजे, महालक्ष्मीच्या देवळांत जेव्हा मी दर्शनाला गेलों तेव्हा हुबेहूब माझ्याच मनांत असलेलें त्या मूर्तीचें ध्यान पाहून मी अगदी चकित होऊन गेलों ! हा मानसशास्त्राचा कांहीं चमत्कार आहे, किंवा माझा या विषयाशीं पूर्वजन्मीचा कांही संबंध आहे हे मला कांहीच सांगतां येत नाही. पण जीं जीं ठिकाणें मी पाहिलीं ती अगदी अंतर्मनाची ओळख असल्याप्रमाणे ओळखीचीं वाटलीं यांत शंका नाही ! ग्वाल्हेर येथे झांशीच्या राणीची समाधि आहे. काळ्या दगडांनी बांधून काढलेलें उंच तुळशीवृंदावन, आणि आसपासच्या रखरखीत वैराण मैदानांत त्या वृंदावनावर सावली करणारे दोन अजस्र वटवृक्ष, असें मनावर गंभीर परिणाम करणारें तें दृश्य होतें यांत शंका नाही.

दिल्ली पाहिली की कांहीएक प्रकारची उदासीनता वा हुरहूर मनांत उत्पन्न होते. या दिल्ली शहराने कित्येक राज्यांचे उदयास्त आजवर पाहिले असतील. पांडवांच्या इंद्रप्रस्थापासून तों शेवटच्या इंग्रजी राज्यापर्यंत सात-आठ स्मृतिशेष झालेल्या राजधान्यांचे अवशेष कुतुबमिनारवर चढलें म्हणजे

दृष्टीस पडतात. दिल्लीची वास्तु रुधिर-प्रदिग्ध आहे. हजारों लोकांच्या कत्तली येथे झाल्या आणि १८५७ सालीं तर कत्तल इतक्या मोठ्या प्रमाणावर झाली कीं, रस्ते धुळीने व रक्ताने माखून लाल झाले ! दिल्लीच्या लाल किल्ल्यांत १८५७ सालचा शेवटचा बादशहा बहादूरशहा याचा अंगरखा, आणि त्याची बेगम झिन्नतमहालचा झगा आणि बंडांतील कित्येक चित्रें, तरवारी, नाणीं तसेंच तत्कालीन वर्तमानपत्रें यांचा संग्रह तेथील म्युझियममध्ये आहे. त्या वस्तु पाहण्यासारख्या आहेत. पण १८५७ सालीं इंग्रजांशीं अभिमानाने लढाई दिलेला लाल किल्ला हीच सर्वांत पाहण्यासारखी मुख्य वस्तु होय ! याच किल्ल्याने नेताजी सुभाषचद्र बोस यांना स्वातंत्र्ययुद्धाची स्फूर्ति दिली. रंगून येथील बहादूरशहाच्या कबरे-समोर " १८५७ च्या अपयशाचा आम्ही सूड घेऊं " अशी नेताजी सुभाषचंद्र यांनी शपथ घेतली आणि आझाद सैनिकांना ' चलो दिल्ली ' हा संदेश दिला ! या सर्व गोष्टी दिल्लीचा तो लाल किल्ला पाहिला की मनांत येतात !

या प्रवासांत कानपूर येथे मी गेलों. ज्या घाटावर इंग्रजांची कत्तल झाली तो सतीचोर घाट व त्यावरील महादेवाचें देवालय, ' कानपूर वेल ' चें स्मारक वगैरे पाहून नंतर ब्रह्मावर्तास गेलों. पण नवल असें कीं, तेथील गंगेचा घाट आणि कांही देवळें यांखेरीज तेथे घरेंच नाहीत ! सर्व गांव उजाड—शून्य आहे. बंडानंतर ब्रह्मावर्तावर अक्षरशः गाढवाचा नांगर फिरविण्यांत आला, आणि सर्व शहर जाळून पोळून उद्ध्वस्त करण्यांत आलें. दुसरा बाजीराव पेशवा हा ब्रह्मावर्तास ३३ वर्षें राहिला होता. त्याने कित्येक सुंदर इमारती व वाडे ब्रह्मावर्तास बांधले होते. पण आज तेथे कांहीच राहिले नाही. गंगेचें पात्र फार विस्तीर्ण व मनोहर असून पाण्याला अतिशय जोर आहे. कानपूरच्या लढाईत पराभव झाल्यावर याच घाटावर नावेंत बसून त्रिवर्ग पेशवे बायकामुलांसह रात्रीं पसार होऊन लखनौच्या बेगमेच्या मुलखांत गेले व पुढे नेपाळमध्यें त्यांचा शेवट झाला. तो सर्व इतिहास आतां गंगेला मिळाला आहे ! गंगेच्या घाटावर बसून तिच्या विस्तीर्ण पात्राकडे टक लावून बघत असतां माझ्या मनांत कितीतरी विचार आले. त्यांत एक विचार असा होता की, या अनेक

ऐतिहासिक स्थळीं राष्ट्रीय अभिमानाच्या हटातटानें ज्यांनी आत्मार्पण केलें त्यांच्या वासनांचें पुढे काय झालें ? त्या नाहींशा झाल्या काय ? पण असें



कानपूर ' वेल ' स्मारक

होणें शक्यच नाही. माणसें मरतात, पण त्यांच्या आशा जगतात! त्या आशांचा उदयकाल कधींना कधी खचित येईल अशी त्यांची खात्री असते म्हणूनच माणसें प्रसंगीं मृत्यूलाहि भीत नाहींत. एरवी हिंदुस्थानाला हे स्वातंत्र्याचे दिवस कसे दिसले असते?

या जगांत सर्वत्र कर्माचा कायदा आहे. जे कार्य तुम्ही कर्तव्य म्हणून आरभले आणि निष्ठेने करीत आहां,तें करीत असतांना आयुष्य कदाचित् अपुरें पडेल. पण त्या कार्याची गति संपलेली नाही, किंवा तें कार्यहि नाहीसें झालेलें नाही! आपण हिंदु लोक पुनर्जन्मावर विश्वास ठेवणारे आहोंत ना? या जन्मीं नाही तर दुसऱ्या जन्मीं, आपल्या हातांनी नाही तरी अन्य हातांनी त्या आकांक्षांवर यशाचा मुकुट चढेल. पण ती गोष्ट कधी तरीं सिद्ध झाल्याशिवाय राहणार नाही. याचेंच नांव कर्माचा कायदा! आणि हा ज्यांना कळतो ती माणसें कोणत्याहि परिणामांना न भितां आपलें कर्तव्य करीत असतात. १९०८ सालीं हायकोर्टाने लो. टिळकांना शिक्षा दिली. तेव्हा "माझ्या हालअपेष्टांनीच माझ्या अंगीकृत कार्याचा उदय होईल" अशी भविष्यवाणी त्यांनी उच्चारली होती. त्यांच्या शताब्दीच्या प्रसंगीं हायकोर्टाने अनुतापपूर्वक आपलें पातक धुवून काढलें आणि लो० टिळकांचे ते अमर शब्द हायकोर्टाच्या इमारतींत सुवर्णाक्षरांनी खोदून ठेवले! या जगांत कर्माचा कायदा आहे याचेंच हें उदाहरण नाही काय? लो० टिळकांच्या शताब्दीप्रमाणेच १८५७ च्या वीरांची शताब्दी आता सर्व देशभर साजरी होणार आहे. या आनंदाच्या प्रसंगीं ते त्रिवर्ग पेशवे, तात्या टोपे, झांशीवाली राणी, दिल्लीचे बहादुरशहा, बिहारचे अमरसिंह आणि कुंवरसिंह, आणि जीं कित्येक हजारो माणसें त्या काळीं तोफेच्या तोंडीं गेलीं किंवा कामास आलीं तीं सर्व या प्रसंगीं आकाशांत दिव्य देहाने हजर असतील यांत शंकाच नाही. इंग्रजी राज्य असतांना त्यांच्या गोष्टी केवळ कर्णोपकर्णीं बापापासून मुलानातवंडापर्यंत सर्वांना माहीत असत. कारण त्या काळीं लिहिणें हें अगदी धोक्याचें व दुरापास्त होतें. पण त्या वीरकथा अमर आहेत, इतकेंच नव्हे तर, जन्माचा ठसा मनावर उमटविणाऱ्या आहेत.

१८५७ च्या शताब्दीच्या निमित्ताने त्या जुन्या इतिहासांतल्या काय

काय नव्या गोष्टी उजेडांत येतात, किंवा कोणतें नवें संशोधन होतें हें आता पाहावयाचें आहे. हा विषय निघाला म्हणजे माझ्या मनांत कित्येक आठवणी जागृत होतात. त्या एकेक गोष्टी तुम्हांला सांगूं लागलों तर रात्र सरेल पण माझ्या गोष्टी संपणार नाहीत. तात्पर्य, हा १८५७ चा विषय म्हणजे कधीहि न संपणारी गोष्टच म्हणावयाची !

* * *

२ कांहीं सामाजिक हकीगती

अठराशें सत्तावनमधील युद्धकथा सांगण्यापूर्वी प्रथम कांहीं सामाजिक हकीगती सांगतों. कारण आजचा काळ व शंभर वर्षांपूर्वीचा काळ यांत जमीन अस्मानाचें अंतर पडलें आहे. वास्तविक नानासाहेब पेशवे, तात्या टोपे, झांशीवाली राणी वगैरे माणसें कांही फार पूर्वीची नाहीत. हीं इंग्रजी अमदानींतलीं माणसें. फार तर अव्वल इंग्रजीतली म्हणा. पण विष्णु-शास्त्र्यांच्या निबंधमालेच्या फक्त पंधरावीस वर्षें आधीचीं. विष्णुशास्त्री चिपळूणकर किंवा लो० टिळक डेक्कन कॉलेजमध्ये विद्यार्थिदशेत असतांना, १८५७ च्या बंडाशीं संबध आलेल्या व्यक्तींकडून त्यांनी कितीतरी हकी-गती ऐकल्या असतील. फार कशाला, खुद्द कै० चिंतामणरावजी वैद्य यांचें कुलोपाध्याय विष्णुपंत गोडसें वरसईकर हेच झांशीच्या वेढ्यांत सांपडले होते आणि बंडाच्या ज्या गोष्टी ते सांगत त्या इतक्या अद्‌भुत-रम्य होत्या की, त्यांचा मनावर कायमचा ठसा न उमटेल तरच आश्चर्य ! पण आता त्याहि गोष्टींना शंभर वर्षें म्हणजे चार पिढ्या उलटल्या आणि या शंभर वर्षांत भौतिक शोधांमुळे देशस्थितींत इतकें स्थित्यंतर झालें आहे की, शंभर वर्षांपूर्वी धार्मिक, आर्थिक, सामाजिक परिस्थिति नक्की काय होती याची कल्पना येणें दुरापास्त आहे

आजच्या काळांत दिसणाऱ्या आगबोटी, आगगाड्या, तारायंत्रें, टपाल, युनिव्हर्सिट्या, स्थानिक स्वराज्य संस्था किंवा म्युनिसिपालिटी या सर्व गोष्टी १८५७सालीं किंवा फारतर आगेमागे एक दोन वर्षेंच या देशांत आल्या. पण त्यापूर्वी यांतलें कांहीएक नव्हतें. इंग्रजी शाळांना नुकती सुरुवात झाली होती. मुंबई–पुण्याला ज्ञानप्रकाश, धूमकेतु वगैरे वर्तमानपत्रें इंग्रजी

वर्तमानपत्रांच्या अनुकरणाने निघालीं होतीं. तीं शिळाप्रेसवर काढीत. टेलिग्राफ आणि आगगाडी यांची सुरुवात नुकती झाली होती. घोड्याच्या साहाय्यावाचून नुसत्या वाफेने आगगाडी चालणें आणि हत्तीचें ओझें तिने ओढून नेणें हें सामान्य लोकांच्या दृष्टीने आश्चर्यच होतें! पहिला फाटा राणीगंज ते अलाहाबाद इतकाच होता आणि बंडाच्या वेळीं मद्रासहून कलकत्याला ज्या पलटणी गेल्या त्या प्रथम राणीगंजहून अलाहाबादेस गेल्या. आगगाडीचे डबे मालाच्या डब्याप्रमाणें उघडे असत. आणि त्यांत माणसें इतकीं खच्चून भरत की, उभ्याने तर प्रवास करावा लागेच, पण धड अंगाने आगगाडीच्या प्रवासांतून मनुष्य परत आला तर मोठेंच नशीब समजत!

पेशवाईत पूर्वीच्या काळीं जासुदामार्फत पत्रांची डाक जात असे. मोठमोठे सरदार किंवा पेढ्यांचे व्यापारी यांचे स्वतःचे जासूद असत. यांत पोस्टाची सार्वजनिक पेटी करून सरकारने नवी सुधारणा केली. पण पत्र लिहून पोस्टाच्या पेटींत टाकलें तर तें अदृश्य रूपानें नेमकें त्या गावीं जाऊन त्या माणसाला कसें मिळतें, किंवा तारेने संदेश कसा पोचतो याचें सामान्य माणसाला मोठें आश्चर्य वाटत असे. त्यांतच एखाद्या अडाणी माणसाने पेटींत पत्र टाकलें तर, पेटीला तोंड लावून "सातारा! सातारा बरं का" असें गावाचें नांव तो ओरडून सांगत असे. जणू कांही पेटीच्या मागे माणूस बसलेला असून तो त्याप्रमाणे ऐकणार आहे!

घोड्यावर बसण्याची कला त्या काळीं सर्वांना माहीत होती व सामान्य लोकांचा बहुतेक प्रवास घोडे व बैलगाड्या यांतून होई. घोडा हेंच मुख्य वाहन होतें; किंबहुना स्त्रियांनाहि घोड्यावर बसतां येत असे 'दारीं घोडा नाही असें घर नाही आणि घोड्यावर बसतां येत नाही असें मनुष्य नाही' अशी त्या काळीं अक्षरशः स्थिति होती. पण त्यांतहि अश्वविद्या आणि बारगीरपणा यांची कांही गोष्ट होतीच. त्या काळीं उत्तर हिंदुस्थानांत अश्वविद्येबद्दल तिघांचें नांव फार प्रसिद्ध होतें. एक ग्वाल्हेरचे सरदार बाबासाहेब आपटे, दुसरे ब्रह्मावर्तचे नानासाहेब पेशवे व तिसरी झांशीवाली राणी लक्ष्मीबाई. बाबासाहेब आपटे हे दुसऱ्या बाजीरावाचे व्याही. बाजीरावाची मुलगी बयाबाई ही बाबासाहेब आपटे यांनी सून

करून घेतली होती. घोड्यावरून वेळेला पन्नास साठ मैलांची मजल मारणें त्यांना कांहीच वाटत नसे! अश्वपरीक्षेबद्दल झांशीवालीची एक गोष्ट उपलब्ध आहे. एकदा एक सौदागर दोन देखणे व चलाख घोडे विकावयास आला. बाईसाहेबांनी त्यांना मंडळावर धरून फिरवून आणलें व परीक्षा केली व सांगितलें की एका घोड्याची किंमत हजार रुपये व दुसऱ्याची फक्त पन्नास! कारण दुसरा घोडा जरी उमदा व चलाख आहे तरी छातींत फुटला आहे. म्हणून निकामी आहे. सौदागाराने बाईसाहेबांच्या परीक्षेची तारीफ करून सांगितलें की, या घोडयास मी उत्तम मसाला देऊन दिखाऊ ठेवलें आहे, मी आजवर पुष्कळ फिरलो पण कोठेहि ह्याची परीक्षा झाली नाही. बाईसाहेबांनी ठरविलेल्या किंमतीस दोन्ही घोडे विकत घेतले आणि सौदागरास बक्षीस देऊन मार्गस्थ केले.


जुने पोवाडे, लळितें आणि तमाशे यांपेक्षां करमणुकीचा कांही नवा प्रकार म्हणून नाटकें करण्याला त्या काळीं सुरुवात झाली होती. त्यांतले विषय बहुधा पौराणिकच असत. गोडसे बखरींत पुढील उल्लेख आहे:—एकदा कोकणांतली चाळीस पन्नास लोकांची नाटकमंडळी ग्वाल्हेरीस आली होती. त्यांना झांशीतील कांही लोकांनी पत्र पाठवून झांशीस आणलें. त्यांचे खेळ शहरांत पुष्कळ झाले. तेव्हा बाईसाहेबांनीं त्यांस सरकारांतून शिधा चालू करवून पुष्कळ नाटकें करविली. सर्व जामदारखाना या नटांना उघडा ठेवला होता, व भरजरी शालू, लुगडीं, हिऱ्यामोत्यांचे खरे अलंकारहि नटांना वापरावयास मिळत. हिऱ्यामोत्यांचे खरे अलंकार मिळाल्यावर पात्रें का खुलणार नाहीत? मग नाटक झाल्यावर झाडा घेऊन किल्ल्याबाहेर सोडीत. नाटकांचे विषय हरिश्चंद्रासारखे पौराणिक असत. एकदा खास सरदारलोकांच्या स्त्रियांकरितां 'उषा-अनिरुद्ध' या नाटकाचा प्रयोग केला होता. बाईसाहेब घटका-दोन घटका बसल्यावर मग उठून गेल्या. शेवटीं सर्व नाटकवाल्यांस एक मेजवानी करून बिदागी देऊन रवाना केलें आणि सदोबा 'मॅनेजर' यास रोख चार हजार रुपये इनाम दिले!

त्या काळीं पेशवाईतील दक्षिणा बंद झाली होती व संस्कृतचा राजाश्रय गेला होता. इंग्रजी शिक्षण लोकांत फारसें नव्हतेंच, व जे इंग्रजी

शिकत ते नोकरीकरितां किंवा आपद्धर्म म्हणून नाइलाजानें शिकत, हौसेनें नव्हे. ब्रह्मावर्तास नानासाहेब बाजीरावाच्या अपरोक्ष चोरून इंग्रजी शिकले होते. तथापि त्यांचा सल्लागार व वकील अजीमुल्ला हा फर्डा इंग्रजी बोलणारा होता. तात्या टोपे यांना इंग्रजी सहीपुरतें किंवा थोडें अधिक येत होतें. झांशीवाल्या लक्ष्मीबाईला इंग्रजी येत असल्याचा फक्त पुरावा नाहीं. पण तिची बुद्धि इतकी तल्लख होती आणि इंग्रज रेसिडेंटशीं वारंवार संबंध आल्यानें रुळलेली होती कीं, बोललेलें इंग्रजी तिला समजत नसेल असें म्हणवत नाही ! न्यायनिवाडे ती समक्ष करी आणि कज्ज्याचा निकाल ताबडतोब तोंडी सांगे तोच शिरस्तेदार उतरून घेत असे. " कायदा आणि न्याय यांची उपज तिच्या अंगीं जन्मसिद्ध होती " असें इतिहास–लेखक जस्टिस किंकेड यांनीं म्हटलें आहे, तें अगदीं खरें वाटतें. तिच्या पूर्वीच्या पिढीचे संस्थानिक झांशीचे रघुनाथ-राव नेवाळकर हे इंग्रजी शिकलेले होते, इतकेंच नव्हे तर, शास्त्रीय उपकरणांच्या साहाय्यानें इतरांना त्यांनी स्वतः केलेल्या विजेच्या बॅटरीचा एक प्रयोग करून दाखविला होता. ग्वाल्हेरचे दिवाण दिनकरराव राजवाडे इंग्रजी स्वतःच्या प्रयत्नाने शिकले होते, व पत्रव्यवहार इंग्रजींत करीत. ग्वालेरचे बाबासाहेब आपटे, सरदार फाळके इत्यादि मंडळी त्याप्रमाणेंच. पण हें शिक्षण गरजेनुसार घेतलेलें आणि गरजेपुरतेंच होतें.

तथापि याचा अर्थ असा नव्हे की, इंग्रजी शिक्षण म्हणजेच सर्वस्व आहे किंवा देशांत कोणी शहाणीं किंवा राजकारण जाणणारीं माणसेंच नव्हतीं ! इंग्रजी ज्ञानालाहि महत्त्व आहे, पण तें किती याला कांहीं मोजमाप नसावें का ? झांशीवालीबद्दल एका इंग्रज ग्रंथकाराने असे उद्गार काढले आहेत की, "ज्या स्त्रीनें एका कसलेल्या इंग्रज सेनापतीशीं रणांत सामना दिला ती एक छोटें संस्थान किंवा सुभा चालविण्याला अपात्र होती असें आम्ही समजत होतो ही मोठी अजब गोष्ट म्हटली पाहिजे ! " लखनौच्या वेढ्यांत मृत्यु आलेला इंग्रज मुत्सद्दी सर हेन्री लॉरेन्स याने रॉबर्ट मॉंटगॉमरी याज-जवळ असें प्रांजलपणानें उद्गार काढले की, " इंग्रजी राज्यकर्त्यांपेक्षां देशी राजेरजवाड्यांच्या अंमलाखालीं प्रजा अधिक सुखी होती ! " लंडन टाईम्सचा बातमीदार विलियम रसेल याने आपल्या पुस्तकांत अशासारखे

उद्‌गार कितीतरी ठिकाणीं काढले आहेत. सांगण्याचा मुद्दा इतकाच की, इंग्रजी ज्ञान आणि राजकारण या दोहोंचा पृथक्पणें विचार केला पाहिजे. त्यांची गल्लत करण्याचें कारण नाहीं.



हेन्री लॉरेन्स

त्याकाळीं लोकांत धर्मश्रद्धा फार व ब्राह्मणांना दानधर्म करण्याची बुद्धि विशेष होती. पेशवाई बुडाली तरी अनेक संस्थानांतून यज्ञयाग होत असत, व त्यांत ब्राह्मणांचा परामर्श घेतला जाई. ग्वाल्हेर-मध्ये बायजाबाई शिंदे यांनीं असाच एक मोठा यज्ञ केला. त्याला देशांतून हजारो ब्राह्मण आले होते. धार नगरीचा राजा वारला तेव्हा त्याच्या उत्तरकार्याकरिता राणी आणि दिवाणजी यांनी लाखो रुपये खर्च केले. उज्जयिनी, इंदूर, देवास, इत्यादि ठिकाणांहून सुमारें दहा हजार ब्राह्मण दक्षिणेकरिता जमला होता. गांवांत कोठे उतरावयाला देखील जागा मिळणे दुरापास्त झालें होतें. दानें व्हावयाचीं जागा प्रशस्त व चोहोकडून बांधलेली असून त्याला हत्ती जाण्यासारखा दरवाजा होता. या दानसमारंभाचें वर्णन गोडसे भट याने पुढीलप्रमाणें केले आहे— ‘ दुसरें दिवशीं सकाळींच भोजन आटोपून चिठ्या दरवाजावर दाखवून दानशाळेंत गेलों. आंत यादीचे ब्राह्मण सुमारें दोनशे जमले होते. एकंदर दाने अनेक झालीं. ऐन्याच्या

अंबारीसह सालंकार एक हत्ती दिला. वरती आठ हजार रुपये दक्षिणा दिली. शिवाय नुसते तीन हत्ती पांच हजार रुपये दक्षिणा देऊन दिले. चार घोडे, तीन उंट, दहा बैल, नऊ म्हशी व तेरा दासी दिल्या. एक शय्यादान झालें. महादानाच्या ब्राह्मणास पायजमा, धोतरजोडा, अंगरखा, शिपाईगिरी पागोटें, ढाल तलवार, व पुष्पाचा हार, इतकें सामान चढवून पूजा करून वर गुलाल उडवून दरवाजाबाहेर काढून द्यावें. बाहेर पडल्यावर त्याची छी: थू: काय विचारावी ? बाहेर हजारो तेलंग वगैरे लोक जमलेले असतच. त्यांनीं हुर्यो करून त्या बिचाऱ्याला शेणमार करावा. दासी दान घेणाराची तर फारच फजिती. एखाद्या सुंदर सर्वालंकारयुक्त दासीचा पदर एखाद्या गरीब बावळ्या ब्राह्मणाच्या धोतराशीं बांधून त्याची दरवाजाबाहेर धिंड निघाली म्हणजे लोकांच्या चावनट थट्टांनी आणि शेणमारांनीं त्याची अगदी दुर्दशा होऊन जाई. तशांत ती दासी लुच्ची असली तर त्या ब्राह्मणाबरोबर झराझर चालेनाशी झाली म्हणजे ब्राह्मण अगदीं गयावया होई. शय्यादान घेणारा एक मनुष्य यजुर्वेदी होता, त्यास ताटीवर बसवून एक सोन्याचा मृतदेह त्याजजवळ ठेवून, ताटी चार माणसांच्या खांद्यावर ठेवून दरवाजाबाहेर काढून दिली. हत्तीदानाचे लोक बाहेर आले की पुनः राजाच्या सेवकाला हत्ती विकून टाकीत. कारण हत्ती फुकट मिळाला तरी हत्ती रंकाला काय होय ? या प्रमाणें तीन दिवस दानाची मौज पाहिली.''

हेच गोडसेभटजी पुढे झांशीस गेले व राणी लक्ष्मीबाईच्या आश्रयाला सातआठ महिने राहिले होते. लक्ष्मीबाईच्या कित्येक गोष्टी त्यांनीं दिलेल्या आहेत. त्यावरून लक्ष्मीबाईच्या दातृत्वावरहि उत्तम प्रकाश पडतो. एकदा एक काशीकर विद्वान् ब्राह्मण नित्यदानास गेला असतां लालुभाऊ ढेकरे यांनीं त्याची विद्वतेविषयीं आणि शीलाविषयी फार स्तुति केली व सांगितलें कीं, अल्पवयांतच प्रथम स्त्री वारल्यामुळें त्यांना दुसरा विवाह करण्याची इच्छा आहे. परंतु मुलीला पैसा फार पडतो सबब दुःखी आहेत. हें ऐकून बाईसाहेबांनी प्रश्न केला की, 'रुपये देऊन मुलगी देणारा आहे की काय ?' त्यावर भटजी नम्रतेने बोलले की, आमच्या जातीचा एक देशस्थ ब्राह्मण काशीस आहे त्याची मुलगी सुमारें बारा वर्षांची आहे.

मुलगी रूपानें बरी आहे. रासघटित सर्व जमलें आहे. परंतु त्यास मुलीकरिता चारशे रुपये दिले पाहिजेत. ते मी गरीबानें कोठून आणावे? शिवाय लग्नाकरिता सुमारें शंभर लागतील. हे शब्द ऐकताच बाईसाहेबांनी पांचशे रुपये तांब्याच्या ताम्हनांत आणवून उदक सोडून भटजीच्या पदरांत ओतले आणि सांगितलें की, लग्न होईल त्या वेळीं आम्हांला कुंकुमपत्रिका पाठविण्यास विसरूं नये. याप्रमाणें भटजीबोवांचें नशीब उदय पावल्यावर तो मोठ्या उत्कंठेनें काशीस गेला आणि लग्न-समारंभाची तयारी करून बाईसाहेबांस मूळ धाडलें.

एकदा बाईसाहेब महालक्ष्मीच्या दर्शनाहून परत येत असतां किल्ल्याच्या दक्षिण दरवाज्यापाशी हजारो भिकारी रस्ता अडवून उभे आहेत आणि गलका करीत आहेत असें दिसलें. बाईसाहेबांनी दिवाणजीला कारण विचारतां, त्यांनी विदित केलें की, हे लोक फार गरीब आहेत. हल्ली थंडी फार पडते. यांस पांघरूण नसल्यामुळे यांचे फार हाल होत आहेत. याबद्दल विचार होण्याकरिता सरकारच्या पायापाशी यांचा अर्ज आहे. हें ऐकून बाईसाहेबांस फार वाईट वाटलें, आणि त्यांनी हुकूम केला की आजपासून चौथे दिवशी रमणा करावा व दर मनुष्यास एक रूदार टोपी, एक रूदार बंडी व एक काळी किंवा पांढरी घोंगडी द्यावी. असा हुकूम होतांच दुसऱ्या दिवशी दर्जी जमा करून बंड्या शिवण्यास प्रारंभ केला व नेमलेल्या दिवशीं दवंडी पिटवून वाड्यासमोर भिकारी लोक जमा केले. त्या दिवशीं दर एकास टोपीबंडी व घोंगडी दिली. असे चार हजार लोकांस कपडे वांटले असतील. अशा उदारपणासंबंधी गोष्टी या बाईसंबंधी कितीतरी आहेत. असो.

त्या काळचा पोशाख-पेहेराव कसा होता याची कल्पना तत्कालीन चित्रांवरूनच बरोबर येऊं शकेल. इंग्रजी रीतिरिवाज आज आपल्या अंगवळणीं पडले आहेत. परंतु डोक्याला हॅट किंवा साहेबी टोपी असा देशी मनुष्य शंभर वर्षांपूर्वी दिसता तर लोकांनी त्याला बाटग्यांत काढला असता, किंवा शेणमारहि केला असता. पेशवाईत मोगली पद्धतीची तुमान व अंगरखा होता, तोच दरबारी पोशाख शिष्टमान्य असे. आणि शिरोवस्त्र म्हणून फेटे किंवा पागोटीं असत. पण त्यांचे आकार प्रांतपरत्वे

निराळे असत. स्त्रियांच्या पोशाखांत बदल झाला नव्हता. लढाईत किंवा अपवादप्रसंगीं स्त्रियाहि पुरुष पेहराव करीत असें दिसतें. महाराणी लक्ष्मीबाई स्वतः कारभार पाहूं लागल्यावर कधी स्त्रीवेषाने तर कधी पुरुष वेषानें कचेरींत येऊन बसत. पायांत पायजमा, अंगांत जांभळे अंबऱ्याची बंडी, डोकीस टोपी घालून वर पागोट्यासारखी बांधलेली बत्ती, कमरेस काचा किंवा जरीचा दुपेटा व त्यास लटकावलेली तरवार, या प्रकारच्या पोशाखांत ती गौरवर्ण उंच मूर्ति गौरीप्रमाणे दिसत असे. दरबारांत येऊन तेथें खोलीसारखी पडदपोशीची जागा केलेली असे तेथें लोडास टेकून बसत व तेथें दिवाणी, मुलकी, फौजदारी सर्व कामकाज होई तें पाहात असत. झांशीच्या किल्ल्याबाहेर लढाईकरिता त्या पडल्या तेव्हा पायांत स्टाकीनबूट वगैरे घालून सर्व पठाणी पुरुषवेष केला होता. लक्ष्मीबाईच्या कांही दासी त्यांच्या शरीररक्षक म्हणून पुरुषवेषाने सदैव त्यांच्याजवळ असत व लढाईत त्यांना मृत्यु आला.

या बंडांत दिल्लीची झिन्नतमहाल, लखनौचीं हजरतमहाल बेगम वगैरे कित्येकांचीं नांवें लढाऊ म्हणून प्रसिद्ध आहेत. स्त्रिया म्हणजे केवळ अबला नाहीत हेंच त्यांनी सिद्ध केलें. धारची लढाई होऊन इंग्रज सैन्य चंदेरीकडे येत असतां, मैदानांत अनेक लोक मरून पडले होते त्यांत एका सुंदर स्त्रीचा देह होता असा डॉ. सिलव्हेस्टर याच्या पुस्तकांत उल्लेख आहे. तात्पर्य, त्या काळीं स्त्रियांना इंग्रजी शिक्षण येत असलें किंवा नसलें तरीहि राजकारणाचें वावडें नव्हतें. तें त्यांना कळत होतें. किंबहुना पुरुषांना त्यांची सर्व प्रकारें सक्रिय सहानुभूति होती म्हणूनच लोकांना त्या अग्निदिव्याला तोंड देतां आले !

* * *

३ रक्तानें लिहिलेला इतिहास

गेल्या खेपेस शंभर वर्षांपूर्वीच्या सामाजिक हकीगती सांगितल्या. आज १८५७ ची युद्धकथा सांगणार आहे. काँग्रेसच्या जन्मापूर्वी ही एक तेजस्वी चळवळ होऊन गेली. अर्ज-विनंत्यांपासून तो सशस्त्र बंडापर्यंत राजकीय चळवळ कशी नमुनेदार करावी याचा आदर्श या चळवळीने देशापुढे ठेवला. त्या अद्भुतरम्य संग्रामाची हकीगत थोडक्यांत सांगतो.

बंडापूर्वीं चाळीस वर्षांत इंग्रजांनी जीं अपकृत्यें केलीं त्यामुळें असंतोषाची नुसती शीग भरून राहिली. पेशवाई बुडविल्यावर साऱ्या देशांत इंग्रजांना कोणी जाबता उरला नाही. आणि निरंकुशपणाने त्यांनी मन मानेल तसा जुलूम करण्याला सुरुवात केली. पेशवाई बुडाल्यावर अवघ्या तीस वर्षांत त्यांनी सातारचें राज्य बंडाचा खोटा आळ घालून बुडविलें. सातारची गादी मराठी राज्याचे आदिपीठ असल्यामुळे लोक फार हळहळले. रंगोबापूजीने विलायतेस पंधरा वर्षें राहून व पार्लमेंटकडे अर्जविनंत्या करून सनदशीर चळवळीची पराकाष्ठा केली. पण त्याला निराश होऊन परत यावें लागलें. सातारचें राज्य बुडाल्यावर पुढे आठदहा वर्षें राज्यें बुडण्याची सांथच उत्पन्न झाली. कोणाचा दत्तक नामंजूर होऊन, तर कोणाची कर्जाची बाकी थकली म्हणून, कोणी शत्रु म्हणून, तर कोठे शत्रुत्वाचें कांहीहि कारण सांगतां येण्यासारखें नाहीं म्हणून, अशा अनेक कारणांनी राज्यें बुडालीं. सरकारची लहर हा मुख्य खाक्या होता. त्यांनी होय म्हटलें तर 'होय', आणि 'नाहीं' म्हटलें तर ब्रह्मदेव खालीं उतरला तरी नाही ! नाही ! नाही ! ! डलहौसी तहनामे मानीतच नसे. तहनाम्याला तो खुशाल 'ग्रँट' म्हणजे 'देणगी' असा शब्द लावी. कारण देणगी म्हणजे

मोहोबत आणि मोहोबत संपली म्हणजे सर्व संपलेंच ! इनामें, जहागिरी, वतनें, देशमुखी, पाटिलक्या कांहींहि सुरक्षित नव्हतें. १८५१ सालीं सरकारने इनाम कमिशन नेमलें होतें. त्याने मुंबई प्रांतांत मालकीचा पुरावा नसल्याच्या सबबीवर एकवीस हजार जहागिरी निकालांत काढल्या !

पंजाबचें मोठें राज्य बुडाल्याने हिंदुस्थानची हद्द खैबर घाटाला भिडली. त्यांनी ब्रह्मदेश जिंकला; नागपूर, झांशी, अयोध्या इत्यादि अनेक राज्यें बुडवून दोन लक्ष चौरस मैलांचा प्रदेश आणि अडीच कोटि नवी प्रजा ब्रिटिश राज्यांत सामील केली ! अयोध्येचें राज्य बुडालें तेव्हा एकट्या अयोध्या प्रांतांत ऐशीं हजार लोक बेकार होऊन भीक मागूं लागले. मग इतरत्र सगळीकडे काय स्थिति असेल याची कल्पनाच करावी. त्या वेळी हिंदुस्थानांत ब्रिटिश अंमल सोडला तर संस्थानी राज्यांचाच मनु होता. संकटकाळीं आपलेपणाची अशीं लोकांना तींच आश्रयस्थानें होतीं. पण तींहि गेल्यामुळे हजारो लोकांना अन्नान्नदशा आली. "लक्षावधि लोक आहेत ते हल्लीं चोरासारखे मुकाट्याने बसले आहेत. त्यांनीं कोठे व कोणत्या कामांत प्रसिद्ध व्हावें ?" असे हृदयस्पर्शी वर्णन लोकहितवादींनी १८४९ सालीं केलें होतें. जगांतल्या साऱ्या राज्यक्रांत्यांचें मूळ आर्थिक दुरवस्था व बेकारी यांत आढळतें. हिंदुस्थानांत तेंच घडून आलें. यांतच सरकारच्या सामाजिक व धार्मिक कायद्यांची भर पडली. गोहत्येबद्दल सरकारला कांहीच विधिनिषेध नव्हता म्हणा. पण जेव्हा गाईच्या व डुकराच्या चरबीचा संबंध बंदुकांच्या काडतुसांशी आला, तेव्हा मात्र असंतोषाच्या दारूच्या कोठारांत ठिणगी पडली आणि बंडाच्या ज्वालांनी पेट घेतला.

त्या असंतोषाचा राजकारणाकडे उपयोग करणारी फार चतुर माणसें त्या वेळीं हिंदुस्थानांत होतीं. त्यांत नानासाहेब पेशवे, तात्या टोपे, अजीमुल्लाखान, लखनौची हजरतमहाल बेगम, फैजाबादचा मौलवी अहमदशहा इत्यादिकांचीं नांवें अवश्य सांगितलीं पाहिजेत. बंडापूर्वी सातआठ महिने दर मशिदींत इंग्रजांविरुद्ध मौलवी लोक अत्यंत जळजळीत प्रचार करीत असत. साताऱ्चे रंगो बापूजी विलायतेस गेले असतां त्यांची व नानासाहेबांचे वकील अजीमुल्लाखान यांची लंडनमधील निवासांत गांठ

पडली होती. हा अजीमुल्ला अत्यंत हुशार मनुष्य असून इंग्लिश, फ्रेंच, उर्दू इत्यादि भाषा त्याला अस्खलित येत होत्या. तो हां हां म्हणतां दुसऱ्यावर छाप बसवी. लंडनमधील अनेक थोर उमरावांच्या स्त्रिया त्याच्या प्रेमपाशांत सांपडल्या होत्या. बरेलीच्या सरदार घराण्यांतला कोणी महंमदअलीखान हाहि दिल्लीच्या बादशहातर्फे खटपटी-करिता विलायतेस आला होता. हिंदुस्थानांतल्या निरनिराळ्या दरबारांत वागलेलीं हीं माणसें—त्यांना परराष्ट्रीय राजकारण कळत नव्हतें थोडेंच ! त्यांनी इंग्रजांची



श्रीमंत नानासाहेब पेशवे

नस बरोबर हेरली. त्या वेळी इराण व रशिया यांच्याशी युद्ध करण्यांत इंग्लंड गुंतलें होतें. तेव्हा वकिलातीचे काम संपल्यावर हीं माणसें सरळ वाटेने हिंदुस्थानांत परत न येतां, क्रीमियांत जाऊन सेबेस्टपूलचा वेढा पाहून आली. त्यांना हें सहज दिसून आलें की हे इंग्रज लोक फक्त हिंदुस्थानांत शेखी मिरवतात. पण परराष्ट्रीय युद्धांत रशिया सारख्यांकडून सहज मार खातात. तेव्हा त्यांनी रशियन अधिकाऱ्यांशीं संधान बांधलें. हिंदुस्थानांत गोरे सैन्य त्या वेळीं सारें बावीस—तेवीस हजार होतें; व देशी फौज मात्र सुमारें दोन लक्ष होती. इंग्रजांची गोरी फौज पुष्कळशी परदेशांतच गुंतली होती. अशी सुवर्णसंधि शंभर वर्षांत एखादेवेळच येणार. अर्थात् तिचा उपयोग केला तर काय होऊं शकेल याची कांही राजकारणी व्यक्तींना उत्तम कल्पना होती. म्हणून त्याचाच फायदा घेऊन कांही धीट व धाडसी पुढाऱ्यांनी राज्यक्रांतीच्या कटाची उभारणी केली.

त्यावेळीं एक भविष्य साऱ्या देशभर लोकांच्या तोंडीं होतें व ते

इंग्रजाच्याहि कानावर गेलें होतें. तें असें कीं, प्लासीच्या लढाईपासून बरोबर शंभर वर्षांनी म्हणजे १८५७ सालीं इंग्रजांचें राज्य जाणार ! सीतामाईने ' ताम्रमुखांना ' वर दिला होता की, तुम्ही शंभर वर्षे राज्य कराल. मग ते तरी याहून अधिक राज्य कोठून करतील ? दर पंचांगांत हें भविष्य छापीत आणि लोक त्यावर खुशाल विश्वास ठेवीत. कटाची शपथ हातांत चपाती घेऊन अन्नाला साक्ष ठेवून घेत. या गुप्त सांकेतिक चपात्या हातोहात इतक्या जलद फिरत की त्याची कल्पनाहि येणार नाही. कोठे एका टोकाचें अटक-पेशावर, व कोठें गंगेच्या मुखाजवळचें कलकत्ता, चंद्रनगर ! तसेंच कोठे दिल्ली-अंबाला आणि कोठे दक्षिणेंतलें बेळगाव-धारवाड ! पण इतक्या विस्तीर्ण टापूंत धागे पसरवून बंडवाल्यांनी जो बार उडविला त्याचें खरोखरच आश्चर्य वाटतें. आजच्याइतकीं दळणवळणाचीं साधनें त्या काळीं मुळीच सुलभ नव्हतीं !

बंडाची पहिली गोळी मंगल पांडे याने उडविली आणि तो आनंदाने फाशी गेला. हा मंगल पांडे चारित्र्यवान् ब्राह्मण होता, असें मॅलेसन याने इतिहासांत लिहिलें आहे. शिपायांनीं प्रथम शांततामय सत्याग्रह केला पण कांहीहि उपयोग झाला नाही. दि. १० मे रोजीं ३४ व्या पलटणीने काडतुसें घेण्याचें नाकारलें. यामुळे अधिकाऱ्यांनी ८५ लोकांना दहा वर्षें सक्तमजुरीची शिक्षा देऊन तुरुंगांत घातलें. त्यामुळे त्यांचे इतर सोबती इतके खवळले की, रात्री त्यांनी बेधडक तुरुंग फोडले; आपल्या सोबत्यांची मुक्तता केली आणि इतर कैदीहि सोडून दिले. बाजारांतील लोकहि शिपायांना सामील झाले. मीरतमध्ये लष्करी बंदोबस्त फारसा नव्हताच, फक्त एकच पलटण होती. तिने बंडवाल्यांचा प्रतिकार केला नाही आणि काय असेल ते असो, बंडवाल्या घोडदळ पलटणीने इकडेतिकडे वेळ न गमावतां सरळ दिल्लीचा रस्ता धरला !

चांदणें स्वच्छ पडलें होतें आणि मीरतहून दिल्ली अवघी पस्तीस मैल असल्यानें रातोरात चालून बंडवाले दिल्लीस पोचले. तेथेहि इंग्रजांचा बंदोबस्त नव्हता. फक्त दोनच पलटणी होत्या. त्यांपैकी एक बंडवाल्यांनाच फितूर झाली. शहरांत इंग्रजांचा खजिना आणि मॅगेझीन असून त्यांत तीनशे तोफा, वीस हजार लहान मोठीं हत्यारें, दोन लक्ष काडतुसें आणि

तोफेचे गोळे एवढा प्रचंड साठा होता. एका पलटणीच्या हातून मॅगेझीनचें रक्षण करणें अशक्य झालें, तेव्हां कॅप्टन विलोबी याने स्वतः आपल्या हाताने या कोठाराला बत्ती दिली. तेव्हा धरणीकंप व्हावा त्याप्रमाणे सारें दिल्ली शहर त्या आवाजाने हादरून गेलें ! मग बंडवाल्यांनी राजवाड्यांत



दिल्लीचा दुर्दैवी बादशहा बहादुरशहा


जाऊन, बादशहाला प्रणाम करून त्याला आपला पुढारी केलें, दिल्लीच्या सिंहासनावर त्याला नव्याने बसविण्याचा प्रश्नच नव्हता. कारण तो बादशहाच होता. हिंदुस्थानांत मोगल, मराठे, इंग्रज कोणीहि येवोत, दिल्लीची बादशाही आजपर्यंत कोणी नाकबूल केली नव्हती. ' खुलख

खुदाका, मुलख बादशहा का ' अशी मुळी तत्कालीन राजकारणाची वहिवाट व म्हणच होती. मग यांत बंडखोरीचा आक्षेप तरी कां यावा ! याप्रमाणे एका दिवसांत दिल्ली हस्तगत करून बंडखोरांनी बादशहाच्या नांवाने फर्मानें काढण्यास सुरुवात केली, तेव्हा सारें हिंदुस्थान चकित होऊन गेलें !

मग दररोज नव्या पलटणी फितूर होऊ लागल्या आणि ठिकाठिकाणीं बंडाचे बार उडूं लागले. जेथे पाऊल ठेवावें तेथे सुरुंग आहे असें इंग्रजांना वाटूं लागलें. कोणच्याहि पलटणीची खात्री वाटेना. दि. २६ मे पर्यंत साठ पलटणी इंग्रजांना सोडून बंडवाल्यांकडे गेल्या. याप्रमाणे आपली सर्व सत्ता व सेना एका रात्रींत अदृश्य होतांना पाहून इंग्रजांना बावरल्या-सारखें झालें. बंड केलें की शिपाई इंग्रजांच्या छावण्यांना आगी लावून त्या बेचिराख करीत. महूला अशीच इंग्रजांची फार मोठी छावणी होती. बंडवाल्यांनी ती सर्वच्या सर्व पेटवून दिली, तेव्हा त्याच्या ज्वाला कित्येक कोसपर्यंत दिसत होत्या ! बंडाचा हा प्रकार पाहून इंग्रजांना जीव घेऊन पळतांना पुरेवाट झाली. मग कोणी रानांत, कोणी वनांत, कोणी हत्तीवर, कोणी लमाणांत, कोणी नेटिवाचा वेश पत्करून, तर कोणी स्त्रियांचा लहंगा वापरून आपले जीव जगविले ! साऱ्या हिंदुस्थानभर या टोकापासून त्या टोकापर्यंत बंडाचा वणवा जळत होता. लोकांना वाटे हीं इंग्रजांचीं पापें जळत आहेत. त्या इंग्रजी राज्याची आता चिमूटभर राख देखील उरणार नाही ! राजकारणांत दूरवर पाहणारे दुसरे कोणी सावध किंवा विचारी होते; ते म्हणाले, डोंगरावरचा वणवा फार तर गवत जाळतो. त्याने तो डोंगर कांही जळून नाहीसा होत नाही हें खास ! त्यांतूनहि बघावें काय काय होतें तें ? आणि जर इंग्रज खराच नाहीसा होणार असेल, तर तो हवा होता कुणाला ?

उत्तर हिंदुस्थानांत पंजाबपासून कलकत्त्यापर्यंत बहुधा प्रत्येक प्रमुख ठिकाणी बंड झालें आणि जवळजवळ दहा महिने असें दृश्य दिसलें कीं, इंग्रजांची सत्ता देशातून नाहीशी झाली आहे. झांशीला बंड झाले तेव्हा तेथील इंग्रज रेसिडेंटाने दप्तर स्वाधीन करून हें राज्य आता तुम्हीच सांभाळा, अशी लक्ष्मीबाईंना विनंती केली. आणि कानपूरच्या इंग्रजांनीं

खजिन्याचें रक्षण करण्याला नानासाहेब पेशव्यांनाच पाचारण केलें ! हातांत आलेला खजिना इंग्रजांना सुखासुखी परत देईल तो राजकारणांत एक मूर्खच म्हटला पाहिजे. कानपूरला सहा महिने नानासाहेबांनी



रानावनांतून पळणारे इंग्रज

इंग्रजांची नाकेबंदी केली होती, इतकेंच नव्हे तर, कलकत्त्याहून दिल्ली ताब्यांत घेण्याकरिता जे इंग्रजी सैन्य येत होतें त्याच्या वाटेंत पक्का आडसर घातला होता. या सहा महिन्यांत दोनदा कानपूर हातांतून गेलें. पण

तात्या टोपे यांनीं तें पुनः सर केलें. लखनौस तीन हजार इंग्रजांची रेसिडेन्सींत नाकेबंदी झाली होती आणि मरणाच्या दारांत असल्याप्रमाणे इंग्रज एकेक दिवस मदतीची वाट पाहत होते. लखनौची हजरतमहाल बेगम ही एक वीरांगनाच होती. स्वतः हातांत समशेर घेऊन तिने सारा अयोध्या-प्रांत इंग्रजांशीं लढण्याला उद्युक्त केला होता. लखनौमधील प्रत्येक घर हें इंग्रजाविरुद्ध बंदुका रोखलेला किल्लेकोट झाला होता. बिहारमध्ये कुंवरसिंह व अमरसिंह रणांत उतरले होते. कुंवरसिंहाचें वय सत्तर वर्षांचें होतें आणि पराक्रम भीष्माचार्यांसारखा होता. अमेथीचे वेणीमाधव, बरेलीचे खानबहादुर खान, फरुकाबादचे नबाब, बांदेवाले नबाब, तसेंच बाणपूर, सागर, चंदेरी येथील हिंदुराजे व जमीनदार तर यांत पडले होतेच; पण भिल्ल, रामोशी, मेवाती ही जी अडाणी निरक्षर प्रजा ती देखील आपापले भाले, बर्च्या, तीरकमठे घेऊन इंग्रजांविरुद्ध या युद्धांत सामील झाली होती.



सत्तावनचा भीष्माचार्य कुंवरसिंह

ग्वाल्हेर, इंदूर व भोपाळ वगैरे मध्यहिंदुस्थानांतील संस्थानांत इंग्रजांनीं तैनाती (कंटिजंट) फौज ठेवली होती. पण तात्या टोपे तेथे आले की कळ फिरवल्याप्रमाणे ती सारी सेना बंडवाल्यांना सामील होत असे! संस्थानिक व दिवाण एकीकडे आणि त्यांची सर्व सेना दुसरीकडे हें दृश्य कित्येक ठिकाणीं दिसलें. दक्षिणेंतहि नानासाहेबांचे जाहीरनामे आणि मौलवींचे फतवे येऊन थडकले होते. त्याप्रमाणे हैदराबाद, सातारा,

कोल्हापूर, बेळगाव, धारवाड, जमखंडी, नरगुंद या ठिकाणी बंडाच्या ठिणग्या उडाल्या, पण त्या दबल्या. ठिकठिकाणीं सुरुंगाची दारू ठासून वात पेटविली तरी सगळेच बार उडतात असें घडत नाहीं. कांही उडतात व कांही फुकट जातात! दक्षिणेंत बंडाने पेट घेतला नाही याचा अर्थ, दक्षिणेंत कांही झालेंच नाही असा नाही! होतें पण दिसलें नाही इतकेंच. नरगुंदकर बाबासाहेब फांशी गेले, त्यांची आठवण दाक्षिणेंतील लोक अजून काढतात!


यानंतर इंग्रजांची प्रतिकाराला सुरुवात झाली. बंडाच्या अगदी आरंभालाच एक गोष्ट सुदैवाने इंग्रजांना अनुकूल घडली होती. ती अशी की, बाहेर परराष्ट्रांत जें युद्ध सुरू होतें, तें संपून आंतरराष्ट्रीय परिस्थितींत पुनः सामसूम झालें होतें. दि. २ जानेवारी १८५७ ला काडतुसांचें प्रकरण झालें आणि दोनच महिन्यांत इंग्लंड व पर्शिया यांचा तह झाल्याची बातमी दि. १६ मार्च १८५७ रोजीं पॅरिस येथे थडकली, यामुळे जाणत्या इंग्रजांनी धैर्यानें या युद्धाला तोंड द्यावयाचें ठरविलें. परराष्ट्रीय युद्ध संपून इंग्रजी फौजा परतीची वाट चालू लागल्या होत्या. ती फौज येतांच मुंबईचा गव्हर्नर एल्फिन्स्टन याने ताबडतोब हैदराबाद, महू, सागर, माळवा या मार्गाने ती उत्तर हिंदुस्थानांत पाठविली व दुसरी मद्रासची पलटण नीलसाहेबाच्या नेतृत्वाखाली प्रथम कलकत्त्यास जाऊन नंतर प्रयाग–कानपूरकडे वळली. चार महिन्यांत शिखांची भरती करून पंजाबमधून लॉरेन्स याने फौज धाडली. नेपाळच्या जंगबहादुराकडे मदत मागितली. हैदराबाद, भोपाळ, ग्वाल्हेर, इंदूर इत्यादि जीं संस्थानें बंडाला सामील नव्हतीं त्यांची मदत इंग्रजांनी सक्तीनें घेतली आणि बंडवाल्यांनी दिलेले युद्धाचें आव्हान स्वीकारलें. त्यांच्याहि दृष्टीने हा हटातटाचा आणि प्राण-पणाचा झगडा होता!

सप्टेंबरांत दिल्लीवरील हल्ल्याला तोंड लागलें. इंग्रजी सैन्यापुढें निभाव लागत नाही असें पाहून निराश होऊन बादशहाने जयपूर, जोधपूर, बिकानेर, अलवार इत्यादि हिंदु-मुसलमान संस्थानिकांना पत्र लिहिलें की, " अनेक संस्थानें मिळून एक फेडरेशन वा संघ यावेळीं इंग्रजाविरुद्ध झाला पाहिजे. हवे असल्यास दिल्लीची सर्व बादशाही सत्ता सर्वांवर

सोपवून मी राजिनामा द्यावयास तयार आहे!" हिंदु-मुसलमानांनी एक होऊन इंग्रजांशीं जो लढा आरंभला होता त्यांत या संघराज्याचीच (आजच्या भारतीय संघराज्याप्रमाणे) कल्पना होती. याचा अर्थ, या युद्धांत जय मिळता तर हिंदुपदपातशाही स्थापन झाली नसती, किंवा पूर्वीची एकतंत्री मुसलमानी बादशाहीहि राहिली नसती. तर 'भारताचें नवें संघराज्य' उदयाला आलें असतें! पण या आशांचा उपयोग काय? राज्यें हीं कल्पनांवर चालत नाहीत, पुढाऱ्यांच्या कर्तृत्वावर चालतात. दिल्लीची लढाई जिंकण्याला एक देखील कर्तबगार सेनापति बादशहापाशी नसल्यामुळे दिल्लीचा पाडाव झाला. यावेळी इंग्रजांच्या साडे चौदा हजार सैन्यांत सहा हजार गोरे, आणि साडेआठ हजार पंजाबी शीख होते! असा शीखांच्या मुसलमानविषयक वैराचा इंग्रजांनी राजकारणाकडे उपयोग करून घेतला!

दिल्लीतल्या फौजेनें दिल्ली सर होण्याच्या आधीच पळ काढून ती लखनौच्या वेढ्यांत मिळाली होती. सप्टेंबरांत हॅवेलॉक आणि औटरॅम या सेनानायकांनी मोठ्या शर्थीने व शौर्यानें बंडवाल्यांची फळी फोडून तेथील इंग्रज बायकामुलांची सुटका केली. पण त्यांना लखनौ जिंकतां आलें नाही. अखेर डिसेंबरांत नेपाळचा जंगबहादूर याचें अकरा हजार सैन्य कॉलीन कॅंबेल याच्या मदतीस आलें, तेव्हा लखनौ सर झालें!

दिल्ली व लखनौ हे दोन बालेकिल्ले पडल्यावर मात्र आणीबाणीची वेळ आली. इंग्रजांची मे महिन्यांत जी शोचनीय स्थिति होती ती पालटून त्यांच्याजवळ आता मुबलक सैन्य होते. उत्तम रायफली व दारूगोळा होता. इतर संस्थानिकांच्या मदतीची खात्री होती. यामुळे बंडवाल्यांचे आव्हान स्वीकारून त्यांनी ईर्ष्येने या युद्धाचा सोक्षमोक्ष करावयाचें ठरविलें. याच्या उलट बंडवाल्यांना एकहि संस्थानिक नव्याने सामील झाला नव्हता व कोठूनहि मदत मिळणारी नव्हती. पण अशा बाबतींत जीं माणसें नशिबावर हवाला ठेवून समुद्रांत नाव लोटतात त्यांची आशा विलक्षण असते. होय, कांही मातबर संस्थानिक आम्हांला आज मिळाले नाहीत पण ते कदाचित् उद्या मिळतील. ते खुषीने सामील न झाले तर आम्ही सक्तीने त्यांच्यावर ती पाळी आणू! राजकारणांत ज्याचा जय होईल



ग्वाल्हेरचा किल्ला

त्याच्याकडे वळणारे पुष्कळजण असतातच की नाही? राजकारण हा साहसाचा खेळ आहे. आणि ' साहसे श्रीः प्रतिवसति ' हें त्याचें सूत्र आहे. तात्पर्य, हा आशानिराशेचा डाव उभपयक्षीं रंगांत आला होता एवढें खरें !

आणि अशा खडतर परिस्थितींत, आकाश सर्व बाजूंनी संकटमेघांनी भरून आलेलें असतां, झांशीची राणी लक्ष्मीबाई हिने या युद्धांत या वेळीं पदार्पण केलें ! हे पाहिलें म्हणजे तिच्या वीरवृत्तीचें फार फार कौतुक वाटल्याशिवाय राहत नाही. संकट दूर असलें म्हणजे ' होळीचे होळकर ' अनेक गर्जत असतात. पण संकटासमोर उभा राहील तोच खरा ' धीर ' ! झांशीच्या राणीची हकीगत सर्वविश्रुत असल्यामुळे ती येथे देण्याचें कारण नाही. झांशीच्या वेढ्याला मार्चमध्ये सुरुवात झाली आणि अनेक लढयां-नंतर जूनमध्ये ग्वाल्हेरच्या लढाईत ती पडली. पण या अवघ्या चारच महिन्यांत शेकडों वर्षे अजरामर राहील अशी कीर्ति तिने मिळविली ! झांशीवाली रणांत पडल्यावर बंडवाल्यांकडील साक्षात् वीरश्रीच अंतर्धान पावली. ग्वाल्हेरची लढाई हा या युद्धांतला परमोच्च बिंदु होता. त्यांत बंडवाल्यांना यश येतें तर इंग्रजांवर खचित प्यादेमात होण्याची वेळ आली होती आणि मग तात्या टोपे आणि रावसाहेब पेशवे यांनी महा-राष्ट्रांत येऊन सारी दक्षिण इंग्रजांविरुद्ध पेटविली असती. पण या जगांत ' दैव ' म्हणून जें कांही आहे त्यापुढे कोणाचा कांही उपायच नाही. ' असें झालें असतें तर—' या शब्दांइतकें दुःखद शब्द जगांत दुसरे कोणतेहि सांपडणार नाहींत !

ग्वाल्हेरच्या लढाईत बंडवाल्यांचा मोड झाल्यावर हें युद्ध आटोक्यांत आलें असे इंग्रजांना दिसूं लागलें. यानंतर त्रिवर्ग पेशवे, लखनौची बेगम, चांदेवाले नबाब, तात्या टोपे इत्यादि पुढारी अयोध्या प्रांतांत शिरून गनिमी काव्याने शत्रूला सतावूं लागले. ऑक्टोबर महिन्यांत राणीचा जाहीरनामा अलाहाबादेस प्रसिद्ध झाला. आणि योगायोग असा की, दिल्लीचा कैदी बादशहा बहादुरशहा आणि त्याची बेगम झिन्नतमहाल यांची त्याच दिवशीं हद्दपारी भोगण्याकरिता रंगूनकडे रवानगी झाली. अशा रीतीने दिल्लीचे बादशहा व बादशाही नष्ट झाली, आणि बंडाच्या प्रारंभींच दिल्ली हस्तगत करून बंडवाल्यांनी जो राजकीय डाव टाकला

होता त्याचें संपूर्ण निराकरण झालें! आणि बंडवाल्यांच्या दृष्टीने त्यांत हानि अशी की, ज्या सुपरिचित शब्दांनी साऱ्या हिंदुस्थानाला त्यांना पाचारण करितां येत होतें ती कल्पना गळून पडली. "दिल्लीची बादशाही" हे दोनच शब्द, पण फार व्यापक राजकीय अर्थाचे होते, व राजकारणाच्या दृष्टीने यापूर्वी अनेकांना उपयोगी पडले होते. मराठ्यांचें साम्राज्य आणि इंग्रजी सत्तेची वाढ हीं दोन्ही दिल्लीच्या बादशहाचीं अंकित राहूनच झालीं होतीं. ब्रिटिश राष्ट्रकुलांत बादशहाची सत्ता जशी नांवाची, आणि घटक राष्ट्रांना स्वातंत्र्य हवें तितकें, तीच गोष्ट पेशवाईअखेरपर्यंत दिल्लीच्या बादशाहीची होती. आणि दिल्लीच्या वेढ्यांत बहादुरशहाने जो संघ-राज्याच्या कल्पनेचा उच्चार केला होता त्यावरूनहि हीच गोष्ट शाबीत होते. आतांची लोकशाहीची कल्पना त्यावेळी नसेल; पण सर्वत्र नांदत असलेल्या संस्थानी स्वराज्याच्या त्या काळांत, तत्कालीन राजकीय आकांक्षेचा उच्चार 'दिल्लीच्या बादशाहीची स्थापना' किंवा 'चलो दिल्ली' या एकाच वाक्यांत करतां आला असता असें आम्हांला वाटतें. त्यांत कायद्याच्या दृष्टीने लपण्याला सोय होती, तसेंच कोणालाहि हव्या तितक्या स्वातंत्र्याला वाव होता. इंग्रजांना ही सगळी संपादणी कळत होती. याकरिता 'दिल्लीच्या बादशाही'चें कोलीत कोणी खेळवूं नये म्हणून त्यांनी बादशाहीच नष्ट केली आणि तें पद व्हिक्टोरिया राणीला दिलें!

हिंदुस्थानांत एवढें मोठें बंड झालें याचा पार्लमेंटांत फार गवगवा झाला आणि पार्लमेंटनें 'कंपनी सरकार' नष्ट केलें म्हणजे एका अर्थाने ही देखील राज्यक्रांतीच झाली! इतकेंच नव्हे तर जुने तह, सनदा, वहिवाटी, वारसाहक्क, धर्मविषयक समजुती यांना आम्ही धक्का लावणार नाही, जसा आमचा धर्म तसाच तुमचाहि मानूं, हे जे शब्द स्वतः आपल्या हाताने व्हिक्टोरिया राणीने उदारपणाने लिहून दिले होते, त्यामुळे ज्यांनी बंड केलें त्यांना नैतिक समर्थन झाल्यासारखें वाटलें. जाहीरनाम्याने सर्वांना सरसकट माफी दिली होती. यामुळे जिवाच्या भीतीमुळे ज्यांची धांवपळ चालली होती त्यांना अचानक गळफास तुटावा इतकें बरें वाटलें! कारण त्या काळांत इंग्रज लोक सूडाने इतके वेडावलेले होते की, हजारो माणसांना नाहक फाशीं जावें लागलें होतें!

यानंतर वर्ष-सहा महिनेपर्यंत त्रिवर्ग पेशवे, तात्या टोपे वगैरेंनी आपल्या गनिमी काव्याच्या हालचालींनी इंग्रजांना नुसते नाचवीत ठेवलें होतें. पण सर्वशक्तिमान् सरकार आणि गनिमीकाव्याने लढणारे असहाय लोक यांचा सामना फार काळ लांबू शकत नाही व त्याचा दारुण शेवटहि ठरलेला असतो. नानासाहेब व बाळासाहेब हे अत्यंत हाल भोगून नेपाळांत मरण पावले. रावसाहेब पेशवे व तात्या टोपे हे फितुरींत सांपडून फाशीं गेले. अमरसिंह व अजीमुल्ला बेपत्ता झाले. रोहिलखंडचा महंमदअल्ली व बरेलीचे खान बहादूरखान यांना फाशीं देण्यांत आलें. वेणीमाधव नेपाळमधील लढाईत कामास आले. लखनौची बेगम वेषांतर करून अफगाणिस्तानांत पोंचली. आणि दिल्लीचा दुर्दैवी राजपुत्र फिरोजशहा हा इराणांतील रस्त्यांत भीक मागतांना कित्येकांना आढळून आला ! अशा रीतीने गदरांतील प्रमुख पुढाऱ्यांचा शेवट झाला आणि त्याची दारुण स्मृति मात्र पुढे इतिहासांत कायम राहिली !

परिशिष्ट

ग्वालेरचा रेसिडेंट मॅकफर्सन याचें बंडासंबंधीं मत

मॅकफर्सनच्या आठवणींत म्हटलें आहे—" शिंदे ग्वालेर सोडून पळून गेल्यामुळें रावसाहेब पेशव्यांची फार निराशा झाली. नवीण दिवाण नेमण्याचे वेळीं काढलेल्या हुकुमांत त्यांनीं शिंद्यांचा ' आमचे अत्यंत एकनिष्ठ सरदार ' असा मोठ्या गौरवाने उल्लेख केला होता. ग्वालेरमध्यें येऊन राज्य ताब्यांत घेण्याबद्दल बायजाबाई शिंदे यांना रावसाहेब पेशव्यांनीं जीं पत्रें पाठविलीं, तीं पत्रें तिनें सर हॅमिल्टनकडे पाठवून दिलीं ! ग्वालेरमध्यें रावसाहेबानीं सैन्याला लुटालूट करूं दिली नाहीं. पण दिनकरराव राजवाडे, सरदार बळवंतराव व माहुरकर यांची घरें जमीनदोस्त केलीं. पेशव्यांनीं शिंद्यांचे सर्व अधिकारी तसेच कायम ठेवले; फक्त सरसेनापतिपद तात्या टोपे यांना दिलें. खजिन्यांतून स्वतःच्या फौजेला व शिंद्यांचे फौजेला पगार म्हणून वीस लक्ष रुपये वांटले. शिवाय सुमारें पंचवीस तीस हजार रुपयांचे त्यांना जवाहीर मिळाले. "

(आठवणी पृ. ३३४)

मॅकफर्सनचें पत्र

आग्रा २८ फेब्रुवारी १८५८–“टाईम्समध्यें कोणी एकजण लिहितो कीं अयोध्या, बुंदेलखंड या प्रांताप्रमाणें पंजाब प्रांतांतहि लोकांच्या जमिनी-वरील हक्कांवर आम्ही गदा आणली असती तर, लखनौ कानपूरच्या लढाया लढण्यापेक्षां हॅवेलॉक याला कलकत्यापासूनच सुरवात करावी लागली असती ! म्हणजे सारा देशच आमच्यावर उलटला असता ! हें मत अगदीं बरोबर आहे असें मला वाटतें. लोकांप्रमाणें बंगालच्या फौजें-तहि असंतोष पसरला म्हणून सैन्यानें बंड केलें, असें समजूं नका. लोकांत आधींचा सार्वत्रिक असंतोष नसता तर, केवळ काडतुसांच्या ठिणगीमुळें आग पेटली नसती ! पण या वादग्रस्त विषयाला अंत नाहीं. त्याला हजार कारणें आहेत. पण दरएक कारण आपापल्या पुरतें खरें असलें तरी, सैन्यांत, समाजांत, किंबहुना हरएक ठिकाणीं आमच्याबद्दल अप्रीति व असंतोष नसता तर बंड झालेंच नसतें. आणि याहि असंतोषाला कारण म्हणजे लोकांचे आम्ही बुडाविलेले जमीनदारी हक्क, माफी हक्क वगैरे होत.”

(२)

ता. ३ मार्च १८५८–“शक्य असेल तर, लॉर्ड कॅनिंगच्या कौन्सिलांतील कोणीहि अधिकाऱ्यानें माझ्या एका प्रश्नाचें उत्तर द्यावें. एप्रिल महिन्यांत बंडाच्या सूचना अनेक ठिकाणांहून सतत त्यांचे कानावर आदळत अस-तांना, सिमला व अंबाला येथून युरोपियन फौज ताबडतोब आणवून त्यांनी ती दर एक मुख्य शहरी मॅगेझीनवर कां ठेवली नाही ? आणि शहरांतील सर्व अधिकाऱ्यांना खबरदार राहण्यास सक्त हुकूम कां दिले नाहींत ? हें बंड फक्त फौजेपुरतें आणि केवळ मीरतसारख्या एखाद्या शहरापुरतें असेल असें सरकारला वाटलें ! पण या बंडाची पाळेंमुळें अगदीं खेडोपाड्यापर्यंत पसरलीं होतीं हें आतां जरी सरकार उमगेल तरीहि या बंडाचा पुष्कळच उपयोग झाला म्हणावयाचा ! The mutiny arose in the villages, not in the cantonments.”

(आठवणी पृ. ३४५)

* * *

मागें तिसऱ्या प्रकरणांत १८५७ ची युद्धकथा संक्षेपानें एकत्र सांगितली, याचें कारण त्याचें मुख्य सूत्र वाचकांचे दृष्टीआड होऊं नये. १८५७ च्या मुख्य इतिहासांत झांशी, लखनौ, कानपूर वगैरे ठिकाणीं घडलेल्या गोष्टी अगर उपाख्यानेंहि महत्त्वाची आहेत. ज्यांनीं त्या वेळीं त्या गोष्टी समक्ष पाहून लिहिल्या, त्यांच्या शब्दाला साहजिकच विश्वसनीय इतिहासाचें प्रामाण्य येतें. दुसरें असें कीं, अशा हकिगती स्वभावतःच अत्यंत सुरस व मनोवेधक असतात. डॉ. सिल्व्हस्टरचें पुस्तक अशाच प्रकारचें आहे. याकारितां त्या पुस्तकाची वाचकांना सारांशरूपानें ओळख करून द्यावयाची आहे. बंडाची बातमी दक्षिणेंत आल्यावर पुण्याहून हैद्राबाद, महू, सागर, माळवा या मार्गानें जी फौज गेली त्याबरोबर असिस्टंट सर्जन या नात्यानें तो गेला होता. शिवाय तो उत्तम लेखकहि असल्यामुळें, बातमीपत्राच्या रूपानें या हकिगती त्यावेळीं मुंबईच्या टाईम्स-मध्यें प्रसिद्ध झाल्या होत्या. त्याची हकिगत पुढीलप्रमाणें:–

डॉ. सिल्व्हेस्टर लिहितो, " निजामच्या राज्यांत जवळ जवळ वीस हजार लोक बंड करण्यास तयार होते. पण दहशतीने ते दबले. औरंगा-बाद, बुलढाणा येथें कित्येकांस फांशीं तर कांहींना तोफेच्या तोंडीं देऊन ता. १२ जुलैला आम्ही महूला पोंचलों. तेथील सर्व छावणी बंडवाल्यांनीं जाळून संपूर्ण बेचिराख केली होती. कित्येक म्हणतात कीं, औरंगाबादे-कडे न जातां प्रथम सरळ आम्ही महूकडे येतों तर छावणीचा बचाव झाला असता ! पण हें म्हणणें खरें नाही. निजामच्या राज्यांतील बंडावा आम्हीं मोडल्यामुळे, केवळ दहशतीनें दाक्षिण देश बंडांत न पडतां अलिप्त

राहिला. बंडवाल्यांचा क्रम तडक दिल्लीची वाट धरण्याचा असल्यामुळे, आम्हीं येतांच महूचे बंडवाले तर दिल्लीकडे निसटून गेले असते; व मागे दक्षिण देशाची पिछाडीहि धोक्यांत आली असती ! यानंतर आम्ही धारचा डोंगरी किल्ला हस्तगत केला. किल्ल्यांत राजाचा खजिना जशाचा तसा सांपडला. त्यांत रुपये, मोहोरा, खंडोगणती धान्य, दारूगोळा इत्यादि मुबलक लूट मिळाली. त्याची किंमत सुमारें नऊ लाख रुपये होईल. हें सर्व सामान सतरा हत्तींवर लादून महू येथे सुरक्षितपणें पाठविलें. नंतर माहिदपूर, मंदसोर, इंदोर, येथील बंडावा मोडला. वाटेंत— गुलरिया गावाला आग लावली. त्यांतला एकहि मनुष्य जिवंत सुटला नसेल !

इंदूर येथे आमच्या सैन्याचें अधिपत्य प्रख्यात सेनापति सर ह्यू रोझ याने घेतलें. त्याचा दरारा मोठा सख्त होता, आणि युद्धशास्त्र इतरांपेक्षा इतकें नवीन आणि अलौकिक होतें की, कसलाहि बांका किल्ला असो, त्याच्या माऱ्यापुढे नामोहरम झाल्याशिवाय रहात नसे. रठगड, सागर, चंदेरी हे अवघड डोंगरी किल्ले त्याने असेच मारून काढले. रठगडला दोन हजार बुंदेले व विलायती यांनी आमचा वेढा उठविण्याचा प्रयत्न कसून केला. पण निभाव नाही असें पाहून कड्यावरून शिड्यांचे दोर लावून ते पळून गेले. सागरच्या नजीकचा टापू डोंगराळ असून किर्र झाडीचा आहे. सागर व टिहेरी यांतील डोंगराची रांग फक्त तीनच खिंडींतून ओलांडतां येते. मदनपूरची खिंड नऊ हजार बुंदेल्यांनी लढविली आणि नरातची खिंड बाणपुरच्या राजाने रोखून धरली होती. पण दोघांचाहि पराजय झाला.

चंदेरीच्या टापूंत एकामागोमाग उंच दरडी ओलांडून जावें लागतें. किल्ला उंच डोंगरावर असून भोंवताली दरडीचा खोल निसर्गसिद्ध खंदक आहे. फक्त एकच अरुंद वाट डोंगरावरून किल्ल्याकडे जाण्याला आहे. याला 'कट्टीगट्टी' असें म्हणत. आम्ही हत्तीवरून तोफा ओढून याच नाक्यावर ठेवल्या आणि कित्येक दिवस मोर्चे खणून किल्ला शरण येण्याची वाट पाहात होतों. आमचा हा उन्मत्त अतिक्रम निसर्ग-देवतेला आवडला नसावा असें दिसतें. कारण या प्रांतांत गेल्या पन्नास-साठ वर्षांत कोणाहि शत्रूने

पाऊल ठेवलें नव्हतें. समोर मोठमोठ्या गगनचुंबी वृक्षांनी आपलीं उंच डोकीं काढलीं असून त्यांना वसंताचा बहर आला होता. आणि पहाडांत उठणाऱ्या गोळीबाराच्या प्रतिध्वनीने आकाशांत भीतिग्रस्त झालेले पोपटांचे थवे चिवचिवाट करीत आणि झाडांवरील वानरहि शिपायांकडे पाहून ओरडत. त्यांतच एखादा चित्ता किंवा वाघ झाडींतून डरकाळी फोडून बाहेर निघतांना दिसे. ससाणे वगैरे अनेक वन्य पक्षी डोक्यावरून थवे करून नित्य उडत असत. या किल्ल्यावरून शत्रूने सुमारें पंधरा दिवस प्रतिकार केला व आमचें नुकसानहि पुष्कळ केलें. कारण त्यांच्याजवळ तोफा इतक्या होत्या की, तटावर दर शेपन्नास कदमावर तोफेचा मोर्चा होता. अखेर १७ मार्च रोजीं दोन ठिकाणीं सर्व बळ एकवटून आम्हीं एल्गार केला. तटाला खिंडार पाडलें व शिड्या लावून किल्ल्यांत प्रवेश केला.

इंग्रजांनी किल्ला सर केलेला पाहतांच बंडवाल्यांनी स्वतःच किल्ल्यावरील दारूच्या कोठाराला बत्ती दिली. त्यांत ८६ व्या पलटणीचे कित्येकजण हवेत उडाले आणि कित्येक भाजून जायबंदी झाले. एका बाजूने आमच्या सैन्याचा लोंढा आंत शिरतांच दुसऱ्या टोकाने शत्रूनें किल्ल्याखालीं चोरवाटेने प्रयाण केलें आणि पलीकडच्या जंगलांत ते पसार झाले. किल्ल्यावर आम्हांला द्रव्य कांहीच मिळालें नाही. फक्त खंडोगणती धान्य, जनावरें, तोफा इतकेंच मिळालें. शिद्यांच्या पलटणींपैकी इसागडची तुकडी चंदेरीच्या बंदोबस्ताकरिता मागें ठेवून मार्चच्या तिसऱ्या आठवड्यांत आम्ही झांशीवर आपला मोर्चा वळविला.

झांशीच्या पंचक्रोशींत आमचें सैन्य आले तेव्हां इंग्रज सैन्याशीं फार मोठा जंग करण्याची तयारी तेथें झाली आहे अशा बातम्या कानावर होत्या. वाटेनें गावांतून चिटपाखरूं दिसत नव्हतें. गांवें निर्मनुष्य झालीं असून रस्त्यावर गवत उगवलें होते आणि तलावांतून एकांतवासप्रिय बकपक्षी ध्यानस्त बसलेले दिसत. झांशीचा किल्ला प्राचीन व मोठा भव्य असून रखरखीत मैदानांत वसलेला आहे. शहराला अकरा मैल लांबीचा कोट असून प्रत्येक बुरूजावर तोफा आहेत. इंग्रजांची वसाहत या किल्ल्याच्या दक्षिणेला मैदानात असून त्याच्याजवळ जोखनबाग होती.

बंडाला सुरवात झाली तेव्हां या जोखनबागेंतच इंग्रज स्त्री–पुरुषांची हत्या झाली. कँटोन्मेंटमध्यें मोठाले वृक्ष आणि कांहीं घरें होती तीं सर्व बंडवाल्यांनीं पाडून टाकली होतीं. हेतु असा कीं, आमच्या सैन्याला या घरांचा किंवा झाडांचा आडोशासारखा आश्रय करतां येऊं नये. तेव्हां आम्ही जमिनींत चर खणून त्यांच्या आश्रयाने तोफा ठेवल्या. ता. २३ मार्चला वेढा पडल्यावर बाहेरून आंत किंवा आंतून बाहेर मनुष्य पडण्याची नाकेबंदी झाली. ता. २४ ला चंदेरीहून एक तुकडी मदतीला आली. आम्हांला राजनिष्ठ असलेल्या कांही देशी संस्थानिकांची फौजहि आमच्या बाजूनें वेढ्यांत होती. भोपाळच्या बेगमेनें आपलें तोफखान्याचें पथक दिमतीला दिलें होतें.

माऱ्याकरिता आम्हीं दोन केंद्रें ठरविलीं होतीं. उजवें केंद्र पश्चिमेस जलमंदिराच्या दिशेने होतें. येथे एक फकिराची झोपडी असून काही झाडें होतीं. याच्या आश्रयानें आम्ही तेथें तंबु राहुट्या उभारल्या. वाळूच्या गोण्या भरणें, दारूगोळ्याची आवक-जावक व नेआण करणें, टोपल्या भरणें, किल्ल्यांवर जे कुलपी गोळे टाकावयाचे ते प्रथम भट्टींत तापवून लाल करणे इत्यादि हरएक कामें या केंद्रावर होत. वेढ्याचें क्षेत्र कित्येक मैल पसरलें असल्यामुळें सैन्यांतच ठिकाठिकाणीं बातम्या आणि इशारें पोचविण्याकारिता जवळच्या एका टेकडीवर तारायंत्र बसविलें होतें. दुसऱ्या केंद्राचें नांव ‘ मॅमेलोन ’ होतें. झांशीच्या किल्ल्याच्या अगदीं समोर थोड्या अंतरावर हें केंद्र असून शत्रूच्या ऐन माऱ्यांत होतें.

ता. २४ रोजीं सर्व तयारी झाल्यावर मोर्चे खणून गोळागोळीला सुरुवात झाली. आमच्या तोफांचे गोळे इतके अविरत सुरू होते की त्यांना खळ नव्हता. केव्हा केव्हा किल्ल्यांतील तोफा बंद पडत व बुरुजाची पडझडहि होई. पण तिची ते ताबडतोब रात्रीं व दिवसां खपून दुरुस्ती करीत. ही दुरुस्ती चालू असतां कित्येक बायकाहि काम करीत असतांना दिसत. अशा रीतीने सात दिवस गेल्यानंतर काल्पीहून वेढा उठविण्याकरिता पेशव्यांची दहा हजार फौज येत आहे अशी बातमी कळली. तेव्हां ती सबंध रात्र पाहारा करीत जागून काढावी लागली. उजाडत्या नवव्या दिवशीं तात्या टोपे यांचें सैन्य आलें. तेव्हा वेढ्याकरिता कांही

जुजबी सैन्य तेथेच ठेवून कांही पायदळाच्या तुकड्या व कांही तोफखाना अशीं सुमारें दोन हजार निवडक माणसें सर ह्यू रोझ याने तात्या टोपेच्या सैन्यावर पाठविलीं. झांशीपासून सुमारें एक मैलांतच दोन्ही सैन्यांची गाठ पडून तोंड लागलें. तात्या टोपेकडचे लोक ईर्षेने लढत होते. सर्व आकाश धुळीने आणि धुराने धुंद झालें होतें. इतक्यांत आमच्याकडील एक तोफ शत्रूने जवामर्दी करून निकामी केली. त्यांच्या नेमबाजीपुढे फार माणसें पटापट निकामी होऊं लागलीं. तेव्हा खाली निजून गोळ्या सोडण्याचा आम्हांला हुकूम देऊन, सर ह्यू याने घोड-दळाला पुढे चाल करण्यास फर्मावलें. त्याप्रमाणे लेफ्टनंट क्लार्क आपली घोडदळ तुकडी घेऊन पुढे सरसावला. पण शत्रूच्या विलायती अरबांनी त्यावर गोळ्यांचा नुसता पाऊस पाडला. तथापि ती सर्व आग पिऊन, कॅप्टन नीडच्या घोडदळाने बहादुरी करून शत्रूची फळी फोडून त्यांचें सैन्य विस्कळीत केलें. हें होतांच धावपळीला सुरुवात झाली. पिछाडीला कांही नव्या दमाच्या तुकड्या तात्या टोपे याच्या दिमतीला होत्या. पण लढाईची घडी जी एकदा विस्कटली ती त्याला सावरतां आली नाही. सैन्याचा गोल बांधून तोफखान्याच्या संरक्षणांत गाडून उभें राहण्याचा व पुढे सरकण्याचा त्याने आटोकाट प्रयत्न केला. पण सैन्याचा धीर सुटून खिंडारें पडूं लागतांच, अखेर चोवीस इंची, छत्तीस इंची पन्ह्याच्या तोफा रणांगणांत टाकून त्याने बेटवा नदी ओलांडून पळ काढला व आम्ही पाठलाग करूं नये म्हणून सारें जंगलच पेटवून दिलें. या लढाईत आम्हांला सहा तोफा, दोन हत्ती, अनेक उंट, कांही दारूगोळा अशी लूट मिळाली. पेशव्यांच्या सैन्याशीं ही लढाई चाललेली असतां, झांशीच्या तटावर हजारों नागरिक जमून लढाईचा शेवट काय होतो हें उत्सुकतेने पाहत होते. याच वेळीं बाहेर पडून त्यांनी आमच्यावर हल्ला केला असता तर दोन्ही सैन्यांच्या पुढे आमचा खचित पराभव होता. पण ही गोष्ट कशी झाली नाही हें एक गूढ आहे इतकेंच खरें !

ता. २ एप्रिल रोजीं अवशीं पहाटे दोन्ही बाजूंनी शिड्या लावून झांशीच्या किल्ल्यावर चढाई करून जावयाचें असा गुप्त हुकूम होता. त्याप्रमाणे जलमंदिराच्या पश्चिम बाजूस जो दरवाजा होता तिकडे चढाई

करण्याला दोन तुकड्या आणि दक्षिणेच्या बाजूने चढाई करण्याला एक तुकडी अशा तीन तुकड्या सिद्ध झाल्या. तटाला शिड्या लागलेल्या पाहतांच वरून दगड धोंडे, विटा, बंदुकीच्या गोळ्या यांचा मारा सुरू झाला. त्यांतच ले. डिक्, माअिकली जॉन आणि फॉक्स असे तिघेजण तटावर चढले. परंतु इतरांनी मागोमाग वर चढण्याची गर्दी केल्यामुळे शिड्या मोडल्या व दुर्दैवाने तिघांना प्राणाला मुकण्याची वेळ आली आणि सगळाच गोंधळ झाला हें पाहून एक इंजीनियर ऑफिसर जवळ होता. त्याने दारूची एक गोणी आणून दरवाजावर अडकावली आणि बंदुकीच्या गोळीने तिला आग लावतांच एकदम मोठा स्फोट होऊन सबंध दरवाजाचे तुकडे तुकडे उडाले. हें पाहून इंग्रजी सैन्य मोठ्या ईर्षेने आंत घुसलें. पण दुर्दैव असें की, तो सर्व दरवाजा दगडविटांनी संपूर्ण चिणून बुजविला होता. त्यामुळे अपयश पदरांत घेऊन आम्ही परत आपल्या छावणीकडे वळलों.

इकडे दक्षिणेकडच्या तुकडीला मात्र यश आलें. कॅप्टन डार्टनेल आणि त्याचे साथीदार दक्षिण तटावर शिड्या लावून चढले व नंतर कित्येकजण वर जाऊन त्यांनी तडक शहरचा रस्ता धरला. खरी लढाई अरब व विलायती लोकांशीं याच ठिकाणीं झाली. वळवाचा पाऊस सुरू असतां त्यांतच गारांचा वर्षाव व्हावा असा शत्रूने आमच्यावर बंदुकीच्या गोळ्यांचा वर्षाव केला. आमचीं फार माणसें या चकमकींत मेलीं आणि कित्येक शूर लोक कामाला आले.

दुसऱ्या दिवशीं रात्रीं किल्ल्यांतील सुमारें चारशे लोक ‘ आम्ही टिहरीच्या पथकांतील आहों ’ असें सांगून बाहेर निसटले. यांत ती झांशीवाली राणी आणि तिचे अनुचर होते ! त्यांनी कपटविद्येने आम्हांला अखेर चकविलेंच. सकाळीं किल्ला साफ मोकळा पाहून ही गोष्ट आम्हांला उमगली; पण नंतर पाठलाग करूनहि राणी व तिचीं माणसें हातीं लागण्यासारखीं नव्हतीं.

झांशी हस्तगत झाल्यावर शिपाई लोक घरोघर शिरले व जें सापडेल त्यावर हात मारण्याला त्यांनी सुरुवात केली. त्यांत गणपति, विष्णु इत्यादि देवालयांतील देवांच्या मूर्ति देखील होत्या. त्यावरील अलंकार आणि

नक्षीकाम फार शोभिवंत होतें. शहरांत राजवाडा होता, त्यांत ठिकठिकाणीं उत्तम चित्रें असून त्यांत विवाह, नृत्य, युद्धप्रसंग, हिंदु सण इत्यादि प्रसंग असून हिंदुकलेचा उत्तम नमुना म्हणून गणण्यासारखी होती. शिकार-खान्यांत सांबरें, हरीण, काळवीट, पोपट, मोर इत्यादि असून दोन पांढरे हत्ती



शिपायांनी सांपडेल त्यावर हात मारण्यास सुरवात केली

होते. दिवाणखान्यांत मोठमोठीं झुंबरें, आरसे, मखमाली कोचें व खुर्च्या असून पलंग सोन्यारुप्याचे होते. सोन्यारुप्याचीं तशींच तांब्या-पितळेचीं भांडीं हजारों मिळालीं. त्यांत कित्येक कढया तर इतक्या मोठ्या होत्या की त्यांत हत्तीचा

रस्सा करीत की काय कोण जाणे ! एका खोलींत शाली, पैठण्या वगैरे उंची वस्त्रें, तसेंच रुपये, मोहरा वगैरे काठोकाठ भरलेल्या पिशव्या मिळाल्या. नुसत्या राजवाड्यांतच इतकी लूट मिळाली !

झांशी शहर ताब्यांत घेतल्यावर आम्हीं तेथे लष्करी कायदा पुकारला. आणि बंडाचें प्रायश्चित्त म्हणून सरसकट त्रिजन केलें. त्यांत चार हजार माणसें मरण पावलीं. गावांत हत्ती, घोडे, माणसें, उंट इत्यादि असंख्य प्राणी मरून पडल्यामुळे जिकडे तिकडे कमालीची दुर्गंधी सुटली होती. जिवंत राहिलेल्यांनी जलमंदिराच्या आवारांत आश्रय घेतला होता; त्यावर देखरेख करण्याकरिता मेजर रॉबर्टसन याला ठेवून ता. २५ एप्रिल रोजीं आम्ही काल्पीकडे निघालों.

काल्पीचा प्रवास करतांना उन्हाळा अतिशय कडक व भीति वाटण्याइतका जाणवूं लागला. दिवसा-रात्रीं वारे उष्ण वाहत. कोणत्याहि धातूच्या भांड्याला किंवा वस्तूला हात लावला तरी ती तापलेली असे. घशाला तहानेने सारखी कोरड पडे. आतापर्यंत लागलेल्या प्रदेशांत झाडी व जंगलें भरपूर होतीं. पण आता सगळा प्रवास रुक्ष, सपाट प्रदेशांतून होत होता. उंटानें तोंड लावण्याइतकेंहि एखादें झुडूप वाटेने आढळत नसे.

ता. ५ मे-ला कुंच गावापासून एका मैलावर आलों. पण नवल असें की, किल्ला, घरें, देवळें अगदी जवळ असल्याप्रमाणे आकाराने मोठीं दिसूं लागलीं. आमच्यासमोर मैदान असतांहि, सकाळींच ऊन इतकें रखरखीत पडलें की, जमिनींतून निघणाऱ्या वाफांमुळे ‘ मृगजळ ’ उत्पन्न होऊन, समोर एक विस्तीर्ण सरोवर पसरलें आहे असा भास झाला. मागून मेजर ऑरची तुकडी येत होती. त्यांतले घोडेस्वार वीस-वीस फूट उंच व धिप्पाड दिसूं लागले ! ते शत्रू की मित्र हेंहि कळेना. नंतर समजलें की हा सर्व मृगजळाचा खेळ होता.

कुंच व गलौली या दोन्ही ठिकाणीं निकराच्या लढाया झाल्या. त्यांत झांशीवाली राणी, बांदेवाले नबाब इत्यादि मंडळी पेशव्यांच्या सैन्याबरोबर होती. काल्पीसहि लढाईंत निभाव नाही असें पाहून गोपाळपूरकडे बंडवाल्यांनी पळ काढला आणि काल्पी शहर व तेथील दारूगोळ्यांचें प्रचंड कोठार आमच्या हातीं पडलें. बंडवाल्यांचें काल्पी हेंच पुरवठ्याचें मुख्य

केंद्र होतें. यानंतर शिंद्यांची फौज फितवून तात्या टोपे यांनी ग्वाल्हेर हस्तगत केल्यामुळे तिकडे आमचें सैन्य गेलें. ग्वाल्हेरची लढाई फार अटीतटीची व मातबर झाली. ता. १७ जून रोजीं हुझर पलटणीने केलेल्या हल्ल्यांत झांशीवाली राणी पडली. ती पुरुषवेषांत लढत असल्यामुळें, आम्हांला कांही दिवस ही बातमी समजलीच नाही, पण पुढे सर हॅमिल्टन यांनी निःसंदिग्ध पुराव्यानिशी त्याबद्दल आमची खात्री केली. तिच्या स्वामिभक्त अनुचरांनी तिचा अग्निसंस्कार केला. तिला रणांत मृत्यु आला हेंच एकपरीने बरें म्हणावयाचें. नाहीतर तात्या टोपेप्रमाणें शेवट होण्याचें तिच्या नशिबीं आलें असतें !

ता. १८ जून रोजीं मोरारची सेना व कोटा की सराई येथील स्मिथचें सैन्य यांची हातामिळवणी झाली. ग्वाल्हेरपासून सुमारें दहा मैल अंतरावर भोवताली टेकड्या असलेल्या एका मैदानांत आम्हीं मुख्य छावणी ठेवली. आणि नंतर पुनः ग्वाल्हेरवरील चढाईला रीतसर सुरुवात झाली. ग्वाल्हेरकडे येणारी एकेक दरड-शत्रूपासून आम्हांला निकराने लढून घ्यावी लागली. झांशीची राणी व इतर एक-दोघे मातबर पुढारी ग्वाल्हेरच्या लढाईत पडले तरी युद्ध आटोपलें नाही. तें नंतर पांच दिवस निकराने सुरूच होतें. ता. २० जूनला जयाजीराव शिंदे इंग्रजांच्या गोटांत येऊन दाखल झाले. दोन–तीन दिवसांत किल्ल्याच्या पायथ्याशीं असलेलें शहर हस्तगत झालें. नंतर कॅप्टन रोझ या तरुणाने स्वतःचा व इतर आठ जणांचा बळी देऊन मोठ्या जवामर्दीने ग्वालेरचा किल्ला हस्तगत केला. एका मागोमाग सतकोटांत असलेला व जमिनीपासून साडेतीनशे फूट उंच असलेला हा अजिंक्य दुर्ग पाहून असें मनांत येतें की, या बंडवाल्यांना कोणी मातबर निश्चयाचा व धीट पुढारीच मिळाला नाही. नाहीतर ग्वाल्हेरसारखा अजिंक्य किल्ला सोडून देऊन त्यांनी पळ काढला नसता ! ता. २६ जून रोजीं दरबार भरवून सर ह्यू रोझ व हॅमिल्टन यांनी शिंदे यांची पुनः गादीवर स्थापना केली आणि स्वस्थ मनाने रजा व विश्रांति घेण्याकरिता सर ह्यू रोझ दक्षिणेंत निघून आला.

जून महिना संपतांच पावसाळ्याला सुरुवात झाली. पूर्वी उन्हांत रखडत चालतांना पाण्याचा एक थेंब तरी कोठे दिसेल काय असा जीव

बेजार होऊन गेला होता. आतां पाऊस धो धो मुसळधारवृष्टीने पडूं लागला. आणि अनेक ठिकाणांची रुधिरप्राशन केलेली भूमि स्वच्छ धुऊन जाऊन पुन: निर्मळ व सतेज दिसूं लागली. आता तात्या टोपे यांच्या पाठलागाशिवाय सैन्याला दुसरें कामच नव्हतें. आमच्याजवळ घोडदळ, पायदळ, तोफखाना, उंटांच्या तुकड्या, ब्रिगेडस्, रेजिमेंट्स्, मुबलक रसद वगैरे सर्व कांही होतें. मुंबई–आग्रा रस्ता बिनधोक सुरू झाल्यामुळे, सहाशे मैलांवरून हरवक्त नियमित रसद मिळण्याची सोय झाली होती. तात्या टोपे याच्याजवळ यांपैकी कांहीएक नव्हतें. तथापि चातुर्य लढवून आमच्याशीं लढण्याचा त्याने अगदी नवा अजब मार्ग शोधून काढला! आमच्या पलटणींजवळ तोफा आणि इतर जड सामान-सुमान असल्यामुळे सैन्याची चाल हळू होत असे व मुख्य अडचण म्हणजे रस्ता सोडून आड रस्त्याला जातां येत नसे. तात्याजवळ तंबू-राहुट्यांचें सामान कांहीच नव्हतें. व जड सामान त्याला नकोहि होतें! हवी तेथे लूट करून अन्न, रसद त्याला मिळत असे. घोडीं थकलीं किंवा निकामी झालीं तर खुशाल तीं तो सोडून देई व कोठून तरी पुनः मिळवी. आमच्या पिछाडीवर छापे घालून आमचेंच सामान तो लांबवीत असे! त्याच्या या गनिमी काव्याच्या ‘युद्धतंत्रा’ला तोफांची जरूरच नव्हती. एक नव्हे, दोन नव्हे, सहा सेनाधिकाऱ्यांनी त्याला पकडण्याचा चंग बांधला होता, पण व्यर्थ. त्याने सगळ्यांना झुकांडी दिली. तीसुद्धा एक दोनदा नव्हे तर शंभर वेळां. हा धावपळीचा धिंगाणा हजार मैलांच्या टापूंत सतत दहा महिने चाललेला होता. तात्या टोपे याला पकडून देण्याकरिता सरकारने एक लाख रुपयांचें बक्षीस जाहीर केलें होतें. याकरिता सहा सैन्यांचे जे निरनिराळे कमांडर त्यांच्यांत साहजिक स्पर्धा उत्पन्न झाली होती. प्रत्येकाला वाटे आपणच एकट्याने तात्या टोपे याला पकडलें असें व्हावें. त्या यशांत दुसऱ्याचा वाटा नसावा. तात्या कोठे आहे याचा माग तर दर सेनापतीला ठेवावा लागेच, पण आपल्यापेक्षा जे दुसरे पांच इंग्रज सेनापति ते कोणी जवळ नाहीत ना याचीहि काळजी प्रत्येकाच्या मनांत असे. तात्याला पकडण्याकरिता एकेक कमांडर जवळच्या तंबू-राहुट्या वगैरे सामान फेकून देऊन पाठलाग ईर्षेने करूं लागला. पण तरी काय झालें?

इंग्रजांनी चाळीस मैल मजल मारली तर हे बंडवाले पन्नास मैल मजल मारीत! असें सतत धावतांना घोड्यांच्या पाठी देखील वांकून टेकीला येत आणि आठ दिवस स्वस्थ विश्रांति घेण्याची पाळी येत असे! या धावपळींत नद्या, नाले, घनदाट जंगलें, डोंगर, वगैरे कशाचीहि तमा नव्हती. निसर्गसृष्टीने आणि वनदेवतांनी क्षणभर तटस्थ होऊन पाहण्यासारखा हा खेळ रंगांत आला होता. जंगलांत आम्ही पुष्कळदा वाट चुकत असूं. पण कोणीहि वनचर आम्हांला मदत किंवा माहिती देत नसत. जमीनदार अगर संस्थानिक वरून आमच्यापाशी गोडीगुलाबीने वागत असले तरी त्यांची हवी ती मदत तात्या टोपे यांना हटकून मिळे. याचा निष्कर्ष उघडच असा की, जनतेची सारी सहानुभूति तात्या टोपे आणि बंडवाले यांच्या पाठीशीं होती यांत शंकाच नाही.

तात्या टोपे यांच्या सैन्यांत बुंदेले, विलायती, भिल्ल, रामोशी इत्यादींची भरती होती. तलवार चालविणें आणि नेमबाजी यांत त्यांचा हातखंडा होता. उंट व घोडीं यांवरूनच ते मजल मारीत. इंग्रज सैन्य आलें की धांवपळ होऊन ते पांगत. आमचा समज होई की त्यांनी पळ काढला. पण खुणेने नेमकें एखाद्या झाडाखाली कांही तासांतच पुनः ते सर्व जमत! त्यांच्या घोड्यांना धड नालबंदीहि नसे. तेव्हा घोड्यांच्या पायांना फडकीं बांधून ते लोक प्रवास करीत. एरवी घोड्यांच्या टापांनीं तरी चाहूल लागते. पण टापांना फडकीं गुंडाळल्यामुळें यावेळीं तीहि लागत नसे. एकदा आमचें सैन्य एका फर्लांगांत असतांहि तात्या टोपे यांचें सैन्य असेंच निसटून गेलें. तात्याच्या शोधांत एक सेनापति आग्र्याजवळ गेला, तर दुसरा त्याचा पाठलाग दक्षिणेच्या सरहद्दीवर करीत होता! कोठे आग्रा-ग्वाल्हेर, आणि कोठें दाक्षिण देश! त्यांत शेकडो मैलांचें अंतर. नर्मदा ओलांडून महाराष्ट्रांत यावयाचें तात्याच्या मनांत फार होतें. एकदा त्यानें नर्मदा ओलांडून तो बडोद्याजवळ आला होता. पण पुढे इंग्रजी सैन्य वाटेंत आडवें आल्यामुळें तापी नदीच्या खोऱ्यांत उतरून त्यानें पुनः नर्मदा ओलांडली आणि राजपुतान्यांत शिरून रावसाहेब पेशवे आणि दिल्लीचा राजपुत्र फिरोजशहा यांच्याशीं त्याने हातमिळवणी केली. तात्या टोपे याच्या सैन्यापैकी मागे राहिलेलीं माणसें कित्येकदा आमच्या हातीं लागत.

त्यांना आम्ही फाशी देत होतों. एके दिवशीं त्यांच्यापैकींच दोघे इसम तात्या कोठे आहे हें आम्हांला रात्रीं सांगून गेले. सकाळीं लगबग करून आम्ही त्या तळावर जातों तों तात्याचा पत्ता तर लागला नाहींच; पण आम्हांला येऊन बातमी देणाऱ्या त्या दोन चहाडखोरांना समोरासमोर फाशीं दिलेलें मात्र आमच्या दृष्टीस पडलें ! ! इतकें तात्या टोपे यांचें हेर-खातें अचूक व कार्यक्षम होतें.

या वेळीं राणीचा जाहीरनामा निघाला होता : " जे बंडवाले शस्त्र ठेवून शरण येतील त्यांना माफी देऊन घरोघर जाऊं देण्यांत येईल " असें त्यांत आश्वासन दिलें होतें. या जाहीरनाम्याचा बंडवाल्यांत आम्ही शक्य तितका प्रसार करीत होतो. या वेळीं फिरोझशहा वगैरे सर्व बंड-वाल्यांना इंग्रजी सेनांनीं सर्व बाजूंनीं वेढलें होतें. तरी त्यांच्यावर चाल करून न बिचकवितां कोणी मध्यस्थ किंवा वकील यांच्यामार्फत बोलणीं करून, तेच कसे शरण येतील हें आम्ही पाहत होतो. जलोन मुक्कामी त्यांच्या मध्यस्थामार्फत कांही वाटाघाट झालीहि. पण अटी याहून उदार पाहिजेत, अशा कांही तरी सबबीवर तीं बोलणीं फिसकटलीं आणि मुख्य पुढाऱ्यांपैकीं आमच्या जाळ्यांत कोणीच सांपडला नाही. आणि केवळ कालहरण करून, आग्रा ट्रंकरोड ओलांडून रावसाहेब पेशवे आणि फिरोझ-शहा नरसिंगगडच्या जंगलांत पसार झाले !

एप्रिल महिना सुरू झाला आणि पुनः उष्णतेची रखरख जाणवूं लागली. जिकडे तिकडे रूक्ष दिसत असे. आग्रा ट्रंक रोडसारखे मोठे हमरस्ते जड वाहतुकीमुळे मोडकळीस आले होते. मग खेड्यातल्या व शहरांतल्या रस्त्यांची गोष्टच बोलावयास नको. जिकडे तिकडे दुर्भिक्ष पसरलें होतें खेडेगावांत गवताची काडी नव्हती मग धान्य कुठचें ? बंडवाल्यांची पुढे पुढे उपासमार होऊं लागून माणसें तापाने हैराण पडूं लागलीं. फिरोझशहा असाच एकदा आजारी पडला, तेव्हां लोकांनी खाटेसकट खांद्यावरून त्याला दुसरीकडे हालविलें.

या वेळीं तात्या टोपे परोणच्या जंगलांत राजा मानसिंह याच्या घरीं थोडी विश्रांति घेण्याकरितां एकटाच आला होता. त्याजजवळ फौजफाटा नव्हता. जवळच कांही मैलांवर इंग्रजी सैन्य होतें. तेवढी खबर अर्थातच

त्याला होती. मानसिंह हा बंडवाला असला तरी इंग्रजांचा त्यावर रोष नव्हता. इतपत त्याने दोघांकडेहि संबंध ठेवले होते. इंग्रजांच्या हालचालीची कांही बातमी, माफीच्या जाहीरनाम्यानुसार कोणकोण शरण गेले व कोण जाणार आहेत, असल्या कांही गोष्टी ते दोघे बोलत असत, आणि सकृद्दर्शनीं मानसिंहाबद्दल त्याला विश्वासहि वाटत होता. पण मानसिंहाच्या चरित्रांतील एक पूर्ववृत्त यावेळीं तात्या टोपेच्या मार्गांत आडवें आलें. १८५७ व १८५८ सालीं शिंद्यांची सर्व कंटिंजंट फौज तात्या टोपे याने फितूर करून आपल्या बाजूला नेली होती. मानसिंह हा केवळ शिंद्यांचा मांडलिक असल्यामुळे त्यालाहि आपल्या पक्षास मिळण्याचा तात्याने त्यावेळीं आग्रह केला. पण मानसिंहाने नकार दिल्यावरून तात्याने त्याला कैद केलें होतें. हें डाचत असलेलें 'पूर्ववृत्त' मानासिंहाच्या मनांत असावें. कांहीहि असो, आपल्या घरीं विश्वासाने पाहुणचाराकरितां आलेल्या तात्याला विश्वासघाताने पकडून देऊन मानसिंहाने इंग्रजांच्या हवालीं केलें इतकी गोष्ट खरी. तात्या निद्रिस्त असतां, इंग्रजांना वर्दी देऊन मानसिंहाने शिपाई आणविले. जवळचीं हत्यारें तात्याच्या हातीं लागूं नयेत म्हणून दूर नेलीं आणि झडप घालून त्याला असावध स्थितींत पकडलें. या सगळ्या हालचालींना घटकाहि लागली नसेल. पण त्यांतला एकेक क्षण मानसिंहाला युगाप्रमाणे वाटत होता. कारण शिकार साधली तर ठीक, पण जर का फसली तर मात्र वाघाशीं गाठ आहे ! तात्याला गिरफदार केल्यावर मेजर मीडपुढे लष्करी चौकशी होऊन त्याला फाशीची शिक्षा सांगण्यांत आली. नानासाहेब पेशव्यांशिवाय आपण कोणाचीहि हुकमत मानली नाही, तसेंच इंग्रज बायकां–मुलांची कत्तल माझ्या हुकमाने झाली नाही, या दोन गोष्टी त्याने पुनः पुनः निक्षून सांगितल्या.

ता. १९ एप्रिल रोजीं शिवपुरीस सर्व सैन्यासमक्ष त्याला फाशीं देण्यांत आलें. अशा रीतीनें बंडवाल्यांचा हा अत्यंत कर्तबगार पुढारी या जगांतून कायमचा अंतर्धान पावला ! पण तात्या त्याच्या नेहमीच्या संवयीप्रमाणे पुनः कोठेतरी अचानक दिसेल. हॅम्लेटच्या बापाप्रमाणे पिशाच्चरूपाने नव्हे; तर खरेंखुरें हाडामांसाचें शरीर धारण करून ! लिंगदेह आणि वासनादेह हीं दोन्ही नाहींशीं झाल्यावर आणि परलोकांत कृताकृत

कर्माचा झाडा दिल्यावर नवीन देहाने तात्या पुनः अवतीर्ण होणारच नाही असें कां मानावें ! मृत्यूने सगळें संपतें असें नाही. त्याला पुनर्जन्म हा आहेच ! तात्याच्या मृत्यूमुळे बंडाचा शेवटचा अंक संपला, आणि किरकोळ बंडवाल्यांचा शोध किंवा पाठलाग नंतरहि कांही काळ चालला होता, तथापि या गोष्टींना महत्त्व नसल्यामुळे हा वृत्तांत येथेच थांबविण्यास हरकत नाही."

* * *

५ लखनौ अयोध्येची मोहीम

गेल्या प्रकरणांत माळवा व बुंदेलखंड यांतील युद्धकथा सांगितल्या. या प्रकरणांत कानपूर व लखनौ या भागांतील हकिगती फोर्बस मिचेल याचे पुस्तकाचे आधारें सांगावयाच्या आहेत. पुस्तकाच्या प्रारंभीच त्याने लिहिलें आहे कीं " लोकांच्या आग्रहाखातर या आठवणी मी लिहिल्या, असा खोटा अभिनिवेश मी कशाला धरू? त्या मी केवळ आत्मप्रसाधनार्थ लिहिल्या. आज तीस वर्षांनंतर मी या गोष्टी लिहीत आहे. याचे कारण, लखनौ कानपूर इत्यादि ठिकाणें पाहून त्यावेळच्या कित्येक जुन्या आठवणी माझ्या मनांत जागृत झाल्या. त्यावेळच्या प्रसिद्ध व्यक्ति अंतर्धान पावत आहेत. याकरितांहि या आठवणी लिहून काढाव्या असें मला वाटलें. या आठवणींना उजळा देऊन कालांतरामुळें शमलेले जुने रागद्वेष पुनः उकरून काढावे असा माझा हेतु नाहीं " या शब्दांवरून मिचेल याचा प्रांजल स्वभाव लक्षांत येईल.

स्कॉटलंड मधील सुप्रसिद्ध ९३ व्या हायलंडर पलटणींत तो कार्पोरल सैनिक होता. आणि १८५७ च्या नोव्हेंबरमधील लखनौच्या वेढ्यापासून तो १८५९ अखेर कानपूर अयोध्येतील बहुतेक सर्व प्रमुख लढायांत त्याची पलटण होतीच. म्हणून त्याच्या पुस्तकांतील कांहीं मनोरंजक गोष्टी टिपणाचे रूपानें पुढे देत आहे:—

मिचेल लिहितो—" कलकत्त्याच्या बंदरांत आमची हायलंडर पलटण दाखल झाली तेव्हां लोकांनीं हर्षानें आमचें स्वागत केलें. राणीगंज ते बनारस आमच्या सैन्यांची वाहतुक बैलगाड्यांतून झाली. दर दहा मैलावर बैलांचे ताफे बदलण्यांत येत. अशा रीतीने दर दिवशीं सुमारें

पंचवीस ते तीस मैल प्रवास होत असे. बनारसहून दोन टप्यानी ता. १९ आक्टोबर रोजीं अलाहाबादला पोंचलो. अलाहाबादपासून ४५ मैलांवर लोहंग गांव आहे. तेथपर्यंत नुकताच रेल्वेचा फांटा नेला होता. तेथें स्टेशन वगैरे कांहीच नाही. लोहंग येथून फत्तेपुरास जाऊन नंतर कानपूरास पोंचलो. जनरल व्हीलरची छावणी नष्ट झाल्याकारणानें नवी तटबंदीची छावणी गंगा नदीचे कांठीं बांधली होती. कारण लखनौकडे जाण्याला रस्ता नावांचे पुलावरूनच असल्यामुळें हा पूल रक्षण करणें लष्करी दृष्टीनें अवश्यच होतें.

आम्ही डाक बंगल्यांत उतरलो होतो. आणि कांहीं घटका विश्रांति घेऊन व्हीलरची छावणी, सतीचोर घाट, बिबीघर वगैरे ठिकाणें पाहून आलो. व्हीलरच्या छावणीभोंवतालची वाळूची तटबंदी चार फूट देखील उंच नव्हती. तोफा आणि बंदुकीच्या गोळ्यांपुढें या भिंतीचा काय उपयोग होणार ? नंतर सतीचोर घाटाकडे गेलो. येथेंच नांवांना आगी लावून इंग्रज स्त्री पुरुषांची कत्तल झाली ! रस्त्यानें जातांना कांहीं प्रेतें व हाडांचे सांगाडे पडलेले दिसत होतेच. नंतर बिबीघर आणि जवळच असलेली प्रेते फेंकून दिलेली विहीर पाहिली. त्यावेळीं मनाला काय वाटलें हें सांगतां येत नाही ! बरोबर ' गाईड ' घेतला होता. तो कानपुरांतील हकिगती सांगत असे. त्याला अनेक प्रश्न विचारून यासंबंधीं मी जें मत बनविलें तें मत तीस वर्षांनंतरहि बदललें नाहीं. तें असें कीं, इंग्रज बायकांची हत्या अत्यंत निघृणपणानें केली गेली यांत शंका नाही पण त्यांच्यावर बळजबरी केली किंवा त्यांच्या अब्रूला धक्का लावला ही गोष्ट मात्र मुळींच खरी नाहीं. बिबीघरांत आम्ही गेलों तेव्हां ठिकठिकाणीं जमिनीवर गोठून वाळलेल्या रक्ताचे डाग, अंगावरील फाटकें कपडे, स्त्रियांचे व मुलांच्या पायांतील बूट, फण्या, कंगवे यांचे तुकडे पसरलेले दिसत होते. भिंतीं स्वच्छ पांढऱ्या होत्या. त्यावर पेन्सिलीनें अगर कोळशानें कांहीहि लिहिले नव्हतें. कारण ही गोष्ट मी मुद्दाम लक्षांत ठेऊन पाहिली. कोपऱ्यांतल्या भिंतीवर तरवारीचे घाव आणि रक्त हीं दिसत होती. कारण त्या अनाथ स्त्रियांनीं साहजिकच जीवरक्षणार्थ कोपऱ्याचा आश्रय केला असेल ! जनरल हॅवेलॉकचे सैन्यानें कानपूर घेतल्यावर प्रेतें

फेंकून दिलेली विहीर बुजविण्यापूर्वी त्यांतील प्रेतें मोजली. तेव्हां ११८ स्त्रिया आणि ९२ मुलें बिबीघरांत मारली गेली असें आढळलें.

जनरल नील याचा मुक्काम यावेळीं कानपुरांत होता. त्यानें चौकशीचें सत्र सुरूं केले असून बिबीघर आणि त्याजवळील विहीर यांमध्यें फांशीचें खांब रोवून ठेवले होतें. त्यावर दररोज कित्येकांनां फांशी देत ! कोर्टापुढें ज्यांना शिक्षा होईल त्या इसमांना बिबीघरांत नेत आणि एक चौरस फूट जमीन जिभेनें चाटून साफ करावयास लावीत. आणि नंतर त्याला फांसावर चढवीत. त्या दिवशीं माझ्याच देखत तिघांनां फांसांवर देण्यांत आले. महार लोक त्या कैद्यांना बांधून आणीत. रक्तानें भरलेली जमीन जिभेनें चाटण्याला कोणी यत्किंचित कचरतांच झणकन पाठीवर कोरडा उठत असे ! अशा रीतीने २५ जुलैपासून ४ नोव्हेंबरपर्यंत नीलची ही निघृणपणाची ऑर्डर अंमलांत होती. अखेर कॉलिन कॅंबेल यानें ती रद्द केली. या अमानुष शिक्षांबद्दल नीलचा अनेकांनीं पुढें निषेध केला. पण त्याचे म्हणणे असे होतें कीं, ज्यांनीं या कत्तली केल्या त्यांना दया कशा-करितां दाखवावयाची ?

अशा रीतीनें कित्येक अपराधी व निरपराधी माणसें फांसावर गेली असतील पण रक्ताचा सूड कसा असतो आणि तीस वर्षांनंतर देखील त्या भावना कशा अकस्मात् पेट घेऊं शकतात याचें १८८७ सालीं घडलेलें उदाहरण येथेंच देतो. कारण त्यांत तात्पर्य फार मोठे आहे ! ता. १४ मार्च १८८७ सालीं मध्यप्रांतांत आगर या गांवीं मेजर नील या घोडदळाच्या अधिकाऱ्याचा मझरअली या स्वारानें परेड ग्राउंडवर खून केला. त्या खटल्यांत अशी हकीगत बाहेर आली कीं, मझरअली यानें आपल्या बापाच्या वधाचा सूड घेतला. मेजर नीलचा बाप जो जनरल नील त्यानेंच तीस वर्षांपूर्वी म्हणजे १८५७ सालीं मझरअलीच्या बापाला फांशी दिले होते ! जनरल नील याने कानपुरांत बसून जेव्हां गुन्हेगारांचा तपास करावयाचें ठरविलें तेव्हां अनेकांना त्याने पकडले. नील हलक्या कानाचा मनुष्य होता. आणि बक्षिसाच्या आशेनें हवें त्याचें नांव सांगणारे कानपुरांत त्यावेळीं पुष्कळ होते. घोडदळांतला दफेदार सफरअली त्यावेळीं असाच पकडला गेला. त्याचेवर आरोप होता कीं

जनरल व्हीलरचा खून त्याने केला. त्याने परोपरीनें सांगितलें की, आपण बंडांत खुषीनें सामील झालो नाहीं. इतरांच्या सक्तीमुळें आपण त्यांत भाग घेतला. व्हीलरचा खून आपण केला नाही ही गोष्टहि त्यानें निक्षून सांगितली. पण त्याचें म्हणणें न जुमानतां त्याला बिस्रीघरांत नेण्यांत आले, त्याच्या पाठीवर कोरडे उडवून तेथील जमीन साफ करविली आणि फांशीच्या खांबाकडे नेले. फांसावर जाण्यापूर्वी अत्यंत हृदयद्रावक रीतीनें त्याने तेथें जमलेल्या शेंकडो लोकांना डोळ्यांत पाणी आणून विनंती केली कीं, माझा लहान मुलगा सध्यां रोहटकला आहे. तुमच्यापैकीं कोणीतरी त्याची गांठ घ्या,आणि तो मोठा झाल्यावर त्याच्या बापाला म्हणजे मला, मी निरपराधीं असतांना धर्मभ्रष्ट करून, हालहाल करून कसें फाशीं दिलें, हें सांगा. मी तर मरतोच, पण माझ्या खुनाचा बदला घेण्याइतकें अल्ला त्याला खचीत खचीत आयुष्य देईल ! ”

यानंतर सफरअली याला फाशीं देण्यांत आलें. जनरल नील देखील लखनौच्या वेढयांत मरण पावला. आणि त्यानंतर तीस वर्षें निघून गेलीं. जनरल नीलचा मुलगा, मेजर नील, हा पुढें सैन्यांत अधिकारी झाला. आणि योगायोग असा कीं, सफरअल्लीचा मुलगा मझरअली हा त्याच्याच घोडदळ तुकडींत स्वार म्हणून नोकरीवर आला. मेजर नील चांगल्या स्वभावाचा होता. आणि मझरअली बद्दलहि त्याचें मत बरें होतें. एक दिवस कांहीं किरकोळ आजारामुळें तो लष्करी दवाखान्यांत पडून असतां रात्रीं एक फकीर मौलवी त्याचेकडे आला. आणि जेवणखाण झाल्यावर पुष्कळ जुन्या गोष्टी तो सांगत बसला होता. बंडाचे वेळीं मझरअली फार तर दोन तीन वर्षांचा अर्भक होता. आणि आपला बाप त्यावेळीं मेला इतकेंच त्याच्या कानांवर होतें. पण तो कशा रीतीनें मेला हें त्याला माहीत नव्हतें. सफरअलीला फाशीं दिलें त्यावेळीं तेथें समक्ष हजर असलेल्या शेकडों लोकांत हा मौलवी होता. त्यानें ती सगळी हकीकत इतक्या चित्तवेधक रीतीनें सांगितली कीं मझरअलीचें अंतःकरण थरारून गेलें. “ बाळ ! ” तो फकीर सांगू लागला, “ तुझा बाप अगदी निरपराधी असून कुत्र्याचें मौतीनें मेला ! जनरल नील आज हयात नाहीं, पण त्यांचाच मुलगा तुझ्या घोडदळ तुकडीचा अधिकारी आहे. तुझ्या


बापाच्या खुनाचा तूं सूड उगवावास अशी खुदाचीच इच्छा आहे, इतकेंच नव्हे तर जीं निरपराधीं माणसें मारली गेली, त्यांच्या वारसांनी, नातेवाईकांनी त्या त्या इंग्रज अधिकाऱ्यांचा सूड घ्यावा अशा अर्थाचीं पत्रकें आणि फतवे मौलवीनीं काढलेलें आहेत. आपल्या बापाचा तूं सच्चा बेटा असशील, तर तूं आपलें कर्तव्य कर ! ” असें म्हणून कांहीं इतर गोष्टीहि सांगून तो मौलवी निघून गेला.

मझरअल्लीला त्या रात्रीं झोप आली नाहीं. दुसरे दिवशीं इस्पितळाला रजा देऊन व आपला ड्रेस चढवून तो परेड ग्राऊंडवर गेला. आणि मेजर नील तेथें येतांच बंदुकीनें नेम धरून त्यानें त्याचा तत्काळ मुडदा पाडला ! मझरअल्लीची या गुन्ह्याबद्दल चौकशी झाली, तेव्हां त्यानें निर्भिडपणें सांगितलें कीं, “ मेजर नीलशीं माझें कोणतेंहि वाकडें नव्हतें. पण त्याचा बांप जनरल नील यानें माझ्या बापाला नाहक फाशीं दिलें म्हणून मीं त्या खुनाचा बदला घेतला. खुदाचीच तशी इच्छा होती. याबद्दल मला फांसावर चढवीत असाल तर त्याला माझी तयारी आहे ! ”

जुन्या इतिहासावर काळ आपलें विस्मृतीचें आवरण घालीत असतांना या हकिगती लिहून जुन्या अप्रिय आठवणी पुन्हां जागृत कराव्यात असा माझा हेतू नाहीं. बंडाची खरी कारणें आणि खरा इतिहास हा सगळा अद्याप लिहावयाचाच आहे ! कोणी तरी लायक मनुष्यानें हें काम हातीं घेतलें पाहिजे; आणि लोकांत फिरून, बारकाईनें माहिती मिळवून त्यांचा विश्वास संपादन करून, फिरंग्याच्या विरुद्ध त्यांनीं कां हत्यार घेतलें याची खरीं कारणें शोधलीं पाहिजेत. तीस वर्षांनंतर घडलेली हकीगत मी येथें मुद्दाम सांगण्याचें कारण हेंच आहे. मेजर नीलच्या खुनावरून माझी अशी पक्की खात्री झाली आहे कीं, अपकाराबद्दल सूड उगविण्याच्या भावना हिंदी लोकांच्या मनांतून अद्याप शमलेल्या नाहींत. असो.

कानपूरमध्यें दोन तीन दिवस राहून आम्ही गंगेचा पूल ओलांडला व अयोध्या प्रांतांत प्रवेश केला. गांवे निर्मनुष्य आणि उजाड दिसलीं. रस्त्यांत कोणीहि माणसें भेटत नव्हतीं. आमच्या छावणी मागोमाग येणारे फेरीवाले, रोटीवाले, दूधवाले, धान्य व कापड विकणारें, तसेंच किरकोळ

नोकरचाकर ही मंडळी प्रयागपासून आम्हांजवळ होतीं; पण लखनौ प्रांतांत आम्ही पाऊल घालण्याचा अवकाश, ती एका रात्रींत अदृश्य झाली ! फार काय आमचें खानसामे आचारी, आणि धोबीदेखील



लखनौची रेसिडेन्सी

पळून गेले. आणि मग सैंपाकदेखील करण्याची ब्रिगेडपैकीं कित्येकांवर पाळी आली.

आमच्या सैन्यांत सर्व कंपन्या मिळून सुमारें पांच हजार लोक होते. सैन्याचें अधिपतित्व सर कॉलीन कॅम्बेल यानें घेतलें होते. लखनौला रेसिडेन्सींत तीन हजार इंग्रज स्त्रीपुरुष चार महिने अडकून पडलें होतें. त्यांच्या सुटकेकरतां आम्हीं निघालो होतो. रेसिडेन्सी लखनौ शहराच्या एका टोकाला होती. आणि कानपूरकडून येणारा रस्ता अगदीं दुसऱ्या टोकाला होता. पण यामधील घरें इमारती, हमरस्ते, किंवा बोळ हे शत्रूनें इतकें पूर्णपणें व्यापलें होते कीं, रेसिडेन्सींतल्या इंग्रजांची सुटका होणें किंवा बाहेरून त्यांना मदत येणें ही गोष्ट अगदीं अशक्य होती. हेन्री लॉरेन्स गोळा लागून मृत्यु पावला. हॅवेलॉक व औटरॅम यांचेवर वेढ्यांत अडकून पडण्याचीच पाळी आली. अशा दुर्धर परिस्थितींत देशी नोकरचाकर असत ते केव्हांतरी महत्प्रयासानें एखादा गुप्त निरोप किंवा चिठीचपाटी नेण्याचें काम करीत. हें काम जोखमीचें असलें तरी देशी इसमांनाच शक्य होते. कारण काळ्या रंगाच्या इतर लोकांत ते सहज मिसळून जात. पण ‘ कवनाग ’ हा इंग्रज सिव्हिलियन मनुष्य मात्र असा निघाला कीं, त्यानें देशी मनुष्याचा वेष घेऊन या वेढ्यांतून बाहेर जाण्याचा मार्ग काढला. आणि मोठ्या शिताफीनें कानपूर येथें कॉलिन कॅंबेल याची गांठ घेतली म्हणून त्याची हकिगत सांगण्यासारखी आहे.

कवनाग याचा पेशा लढाऊ शिपायाचा नव्हे. तो एक साधा सिव्हिलियन कारकून होता व इतर इंग्रजांप्रमाणें त्यानेहि रेसिडेन्सीचा आश्रय केला होता. एक दिवस कानपूरहून कोणी हेर निरोप पोंचविण्याकरितां रेसीडेन्सीत आला व दुसरे दिवशीं तो परत जाणार होता. कवनाग हा सामान्य नागरिक असला तरी, त्याच्यांत शिपायाचें धाडस आणि धोका सोसण्याची तयारी हे गुण जन्मजात असल्यामुळें त्याचे मनांत आले की, या हेराचे सोबतीनें आपण वेढ्यांतून बाहेर जावें आणि लखनौमध्यें अनुभवलेली सर्व परिस्थिति सर सेनापति कॉलिन कॅंबेल याला समक्ष सांगावी. म्हणून जनरल नेपियर याला आपला उद्देश सांगून त्याने परवानगी विचारली. नेपियरनें त्याला सांगितलें, “ बाबारे ! ही अशक्य


गोष्ट आहे. तूं गोरा मनुष्य, तुझें वेषांतर क्षणभरहि टिकणार नाहीं. येथून बाहेर पडलास तर फुकट जिवाला मात्र मुकशील. जनरल औटरॅमनें परवानगी दिली तर पाहा ! " मग त्यानें औटरॅमला विचारलें. त्यानेंहि आपलें मत तसेंच दिलें. पण कवनाग याने पराकाष्ठेची रदबदल चालविली तेव्हां त्यानें ती परवानगी नाखुशीनें दिली. जनरलची परवानगी मिळाली पण बायकोची संमति कशी मिळणार ? तथापि मनाचा निश्चय करून कवनागनें घरांत पाऊल ठेवलें. संध्याकाळ झाली असल्यानें कांहींतरी दोन घांस ती मुलांना भरवीत होती. कवनाग गेला आणि तिच्या नजरेला नजर न देतां मुद्दामच पाठमोरा उभा राहिला. 'रात्रीं मला जेवावयाचें नाहीं, सकाळपर्यंत ड्यूटी आहे.' असें कांहींतरी सांगून तो निसटलाच. मेस हाऊसच्या बाहेर आडोशाची जागा होती. तेथें आल्यावर आपले कपडे त्यानें फेकून देऊन पायांत पठाणी चोळणा व अंगांत हिंदुस्थानी अंगरखा घातला. कमरेला काचा कसून त्यांत एक वाकडी तलवार अडकावून दिली. तळहातावर तेल व काजळ घेऊन तोंड आणि हातपाय यांना चोपडून दिलें आणि डोक्याला पठाणी पद्धतीचें पागोटें चढवून हेराबरोबर तो गुपचूप बाहेर पडला. बाहेर वेढा असल्यामुळें कोणकोणत्या चौक्या आणि घरें यांना बगल देऊन वाट काढावयाची तें हेराला बरोबर माहीत होतें. त्याप्रमाणें आडवळणांनी जाऊन दोघांनी गोमती नदी गांठली. मुख्य रस्त्यानें गोमतीचा पूल ओलांडणें शक्यच नव्हतें. याकरिता दोघांनी नदींत उड्या टाकल्या. ते नोव्हेंबरचे थंडीचे दिवस, त्यांत रात्रीच्या वेळीं बर्फासारखें गार पाणी अंगाला लागतांच कवनागच्या अंगावर कांटा आला; व मनांत क्षणभर विचार आला कीं कोठून आपण हें धाडस केलें ! पण तशीच कळ सोसून ते पोहत पैलतीराला गेले आणि पुढें कांहीं मार्ग शेतांतून काढला. लखनौ शहर अद्याप संपलें नव्हतें. कारण त्याचा विस्तार फार मोठा असून तो कित्येक मैलांवर पसरला आहे. याप्रमाणें लष्करी नाकीं चुकवीत चुकवीत पुढें जात असतां, एके ठिकाणी कोणीं हवालदारानें 'कौन है' म्हणून हटकलेंच. तो हेर गडबडला. आणि जवळच्या चिठ्ठयाचपाट्या सर्व त्यानें शेतांत टाकून दिल्या. कवनागला वाटलें आपलीहि शंभर वर्षें आतां भरलीं ! पण पुढे न जातां तो तसाच अंधारांत उभा राहिला. नंतर

कांहींतरी उत्तर सुचल्यामुळें त्या चौकीपुढून सुटका झाली आणि पुढला मार्ग निघाला. याप्रमाणें दोन दिवस सतत दिवसरात्र चालून त्यांनी गंगेचा पूल ओलांडला आणि कानपुरास जाऊन कवनाग यानें कॉलीन कॅम्बेलची भेट घेतली. दोघांनाहि एकमेकांची ओळख नव्हती. आणि त्यांत कवनागचा काळाकभिन्न चेहेरा आणि पठाणी वेष ! पण जेव्हां त्यानें पागोट्यांतून औटरॅम यानें लिहिलेली चिठ्ठी काढून कॉलीन कॅम्बेल याचे हातांत ठेवली, तेव्हा त्याला सर्व गोष्टींचा उमज पडला ! आणि कवनाग यानें केलेल्या धाडसाचें अत्यंत कौतुक वाटलें. चिठ्ठींत फक्त एकच ओळ होती कीं, " कवनाग रेसीडेन्सींतला मनुष्य असून येथील सर्व हकीकत तो तुम्हांला सांगेल. " रेसीडेन्सीतल्या हालअपेष्टांची त्यानें हकीकत सांगितलीच, पण त्याहीपेक्षां जी महत्त्वाची माहिती दिली ती लखनौमधल्या वाटांची !

१८५६ सालीं अयोध्येचें राज्य खालसा झालें त्यापूर्वीं जमिनीची सर्व्हे झाली नसल्यानें सर्व्हे–नकाशेच उपलब्ध नव्हते. कवनाग हा अलिकडे दोन-तीन वर्षें लखनौंत रहात असल्यामुळें, साऱ्या लखनौची माहीतगारी त्याला होती. यामुळें शहराचा एक कच्चा नकाशाच काढून त्यानें सर कॉलीन याचे-पुढें ठेवला. जनरल हॅवेलॉक आणि औऊटरॅम ज्या मार्गानें लखनौंत आले तोच मार्ग कॉलीन कॅम्बेल घेतां तर, रस्त्यानें हजारों घरांच्या तटबंदी समोरून गोळ्यांचा मार खात त्याला यावें लागलें असतें. पण हा कवनाग अचानक भेटल्यानें, त्यानें आपली सगळीच लष्करी योजना बदलली आणि गोमतीच्या उजव्या बाजूनें लखनौ शहराला वळसा घालून दिलखुष बागेच्या रस्त्यानें सैन्य न्यावयाचें ठरवलें. या रस्त्यानें गेलें असतां, ' दिलखुष प्रासाद, ' मार्टीनरी कॉलेज, मेस–हाऊस, सिकंदराबाग शहानजफ आणि मोतीमंझील इतकी सहाच ठिकाणें नाक्याची लागतात आणि एवढीं जिंकलीं की, पुढील सगळा मार्ग मोकळा होतो अशी योजना होती. कवनाग साधा नोकरपेशाचा मनुष्य, पण, मनांत तीव्र इच्छाशक्ति आणि देशभक्ति असली म्हणजे एखाद्या मोठ्या सैन्याला देखील त्याची मदत केवढी बिनमोल होऊं शकतें, याचें हें एक उदाहरण आहे ! (फॉरेस्ट खं. २ पृ. १२१–१२४.)

ता. १३ रोजी आलम–बाग आणि दिलखुष, यांमधील जलालबादची गढी आम्हीं सर केली व तसेंच पुढें जाऊन दोनतीन दिवसांत दिलखुष प्रासाद आणि मार्टीनरी ताब्यांत घेतलें. आमच्याजवळ चार हजार सैनिक आणि उत्तम तोफखाना होता. त्यापुढें कोणाचा टिकाव लागला नाहीं. कवनाग हा मार्गदर्शक वाटाड्या म्हणून आमच्या सैन्याबरोबरच होता. सिकंदराबाग येथील लढायांत बंडवाले लोक दीन दीन आरोळ्या ठोकून सैतानासारखे लढत होते. त्यांच्याजवळ बंदुकी होत्या, शिवाय वस्तऱ्याच्या पात्यासारख्या तीक्ष्ण तरवारी होत्या.

सिकंदराबागेंत फार मोठी कत्तल झाली. जवळजवळ तीन हजार लोक राजवाड्याच्या चौकांत मरून पडले. चौकांत एक पिंपळाचें मोठें झाड होतें. त्यावर लावलेला लखनौच्या राज्याचा हिरवा झेंडा काढून टाकून इंग्रजांनीं तेथें आपलें निशाण लाविलें. दुपारीं रखरखीत ऊन तापलें होतें आणि काडतुसें तोंडांनीं सोलावी लागत, यामुळें तहान फार लागे. तेव्हां थोडी विश्रांति घेण्याकरितां इंग्रजांचे सैनिक त्या पिंपळाच्या पारावर जाऊन बसले. तेथें गोळ्या लागून दहाबारा इंग्रजांचीं प्रेतें पडलींच होतीं. तीं प्रेतें पाहतां असें आढळून आलें कीं, छातीवर, पायावर, किंवा कोठेंहि बाजूनें गोळ्या लागण्यापेक्षां त्या सर्वांना वरून गोळ्या लागलेल्या आहेत. तेव्हां नवल वाटून क्वेकर वॉलेस याच्या मनांत सहज अशी कल्पना आली कीं, या झाडावर तर कोणी बसलें नसेल ना ! म्हणून हातांत रिव्हॉल्व्हर घेऊन तो झाडावर चढला. झाड फार गर्द असल्यानें प्रथम त्याला कोणी दिसलें नाहीं. पण तिरप्या आडव्या फांदीवर जातांच वर कोणी तरी त्याला बसलेलें आढळलें. ‘ आहे रे आहे ! ’ असें म्हणून त्यानें नेम धरून रिव्हॉल्व्हर झाडलें. तों ती व्यक्ति धाडकन् चौकांतील फरसबंदीवर मरणोन्मुख होऊन पडली. त्या व्यक्तीच्या अंगांत मखमलीचें जाकीट आणि पायांत रेशमी विजार होती. जवळ जाऊन पहातात तों ती एक सुंदर स्त्री होती. कदाचित आपल्या भाऊबंदांच्या रक्षणाकरितां किंवा स्वतःच्या रक्षणाकरितां किंवा स्वतःच्या अब्रूकरितां तिनें तें उंच आडोशाचें ठिकाण पत्करलें असेल. क्वेकर वॉलेस याला हें दृश्य पाहून मोठी हळहळ वाटली. “ आग लागो त्या पिस्तुलाला ! ” असें म्हणून पिस्तुल टाकून



सिकंदराबाग

तो पलटणींतून चालता झाला आणि दुसऱ्या दिवशींच काय पण पुनः कधीहि तो सैन्यांत कामावर आलेला कोणाला दिसला नाहीं !

कॅप्टन मेन याची एका बैराग्याबद्दल घडलेली अशीच एक गोष्ट आहे. कॅप्टन मेन व त्याचा स्नेही हातांत बंदुका घेऊन लखनौच्या रस्त्यांतून फिरत जात असतां एका कोपऱ्यावर कोणी एक गरीब बैरागी सर्वांगाला राख फासून एका वाघाच्या कातड्यावर बसला होता. तोंडावर, कपाळावर तांबडे आणि पांढरे पट्टे यांनीं त्याचें रूप विचित्रच दिसत होतें. मेनचा स्नेही त्या बैराग्याकडे पाहून मेनला म्हणाला, " पाहिलास का तो बैरागी ! ही संगीन त्याच्या अंगांत भोसक ! " त्यावर कॅ. मेन म्हणाला, " छट् ! हा काय बंडवाला आहे कीं काय ? हिंदुस्थानांत असे बैरागी कितीतरी पहाण्यांत येतात. त्यांना गांज्याची एक चिलीम किंवा हुक्का मिळाला कीं जगांत कशाची दाद नसते. " इतकें म्हणून बोलतबोलत ते दोघे त्या बैराग्याच्या जवळ येऊन पोंचतात तोंच त्या बैराग्यानें वाघाच्या कातड्या-खालून एक रिव्हॉल्व्हर काढलें आणि ठो, ठो, ठो, असे तीन बार केले ! त्याचे दोन बार हुकले; पण एक लागला. तेव्हां या दोघांनीं संगिनींनीं त्या बैराग्याचें काम पुरें केलें !

यानंतर आम्हीं शहानजफवर चाल केली. दर्ग्याच्या तटबंदीवर बंदुकवाले तर होतेच पण धनुष्यबाण घेऊन लढणारे लोकहि होते. त्यांची नेमबाजी वाखाणण्यासारखी होती. आमच्या तोफांचा मारा आम्ही एका भिंतीचे आडून करीत होतो. आमच्यातील एका गोऱ्या शिपायानें भिंतीचें बाहेर थोडेसें डोकें उंचावून पाहिलें. इतक्यांत एक बाण सणकन् त्याच्या टोपींत घुसला. 'एनफील्ड' रायफलच्या या काळांत हे सैतानी लोक धनुष्य-बाणानें लढाया करतात हें अजब आहे ! शत्रूचे लोक जसे हैवान होते, तसें आमचेकडील सैनीकहि युद्धमदानें बेहोष झालेले होते. एका सैनिकानें चरांतून थोडें आपलें अंग वर दाखविलें, इतक्यांत शत्रूचा एक तीर त्याच्या कपाळावर बघून तो कवटी फोडून एक वीतभर मागे निघाला ! मृत्यू पाहून कित्येक कच खातात. तर कित्येकांना त्यांतूनच इर्षा उत्पन्न होतें. आमचा मॉन्टगॉमरी त्यांपैकींच होता. शरसंधानाची अपूर्व आतष-बाजी पाहण्याकरितां तो सरळ ताठ उभा राहिला. इतक्यांत पुन्हां एक

बाण आला आणि त्याची छातीं भेदून पलिकडे जमीनीवर पडला. त्यासरशीं जोरानें उसळी मारून मॉंटगॉमरी पांच सहा फूट उंच उडाला आणि जमीनीवर मरून पडला !

शहानजफवरील लोक लढण्याची शिकस्त करीत होते आमच्या सैनिकांनी तटाला शिड्या लावून चढण्याचा जेव्हा प्रयत्न केला, तेव्हा हातांत जळते पलिते घेऊन बेहोष होऊन ते आव्हान देत होते ! नुसत्या दगडविटाच काय पण तेलानें पेटवलेल्या चिंध्या बोळे वगैरे सांपडेल तें फेंकण्यास त्यांनीं सुरुवात केली. पण आमच्या पल्लेदार तोफांतून जे गरनाळी गोळे उडत त्यापुढें त्यांचा निभाव लागला नाही. तटबंदी ढासळूं लागली. आणि आता शहानजफ खात्रीनें सर होणार हें पाहून त्यांनी पाठीमागल्या दारानें पळ काढला.

यावेळीं करकरीत संध्याकाळ झाली होती. दिवसभर श्रम झाल्यामुळें ब्रिगेडचा अधिकार कॅप्टन मॉर्टन याजवर सोंपवून कप्तानसाहेब दुसरीकडे गेला. शहानजफची इमारत ताब्यांत घेऊन कोटावर आणि दरवाजावर ठिकठिकाणीं पहारे बसविलें. कोठें एखादे ठिकाणीं शत्रू छपून बसला आहे कीं काय याचाहि शोध घेत होतो.

चौकांत गवताचे ढीग पडले होते. त्यांतल्या एकाची शेकोटी करून आणि अंगावरील ओव्हरकोट जमिनीवर पसरून कित्येकजण आडवे झाले होते. दर्ग्याचा आकार अतिशय विस्तीर्ण असून कडेला ओवऱ्या बांधलेल्या होत्या. चौकाच्या मध्यभागीं अयोध्येचा पहिला नबाब गाझी-उद्दीन हैदर याची कबर होती. ते स्थान पवित्र असल्यानें पुष्कळ यात्रेकरू आणि मुशाफर तेथें दर्शनास येत. तेव्हां भोंवताలच्या ओवऱ्यांत ते राहत असत. पण या लढाईच्या प्रसंगीं त्या सगळ्या खोल्यांचा उपयोग शत्रूच्या शिपायांनीं राहण्यासाठीं केला होता. कित्येक ओवऱ्यांत भिंतीच्या कोनाड्यांत दिवे मिणमीण करीत होते. शेजारीं चुलीवर डाळ शिजत होती व जवळच चपात्यांची चवड होती. अर्थात् शिपाई पळून गेल्यामुळें त्यांचा सारा सैंपाक फुकट गेला होता ! तेथून दुसऱ्या ओवरींत गेलो. तेथें तोच प्रकार. भूक कडाडून लागली होती. पण कडाक्याची थंडी वाजत होती, त्याचीच विवंचना मनाला प्रथम

लागली. सिंकदराबागच्या लढाईंत शत्रूच्या तरवारीचा एक वार माझ्या छातीवर बसला, पण छातीवरून ओव्हरकोटाचे वेटोळें पुढें दोन गांठी मारून बांधलेले असल्यामुळें, वार कोटावर बसला व मी वाचलों. पण ओव्हरकोटाची गांठ तुटून ओव्हरकोट खालीं पडला, तें लढाईच्या गर्दींत लक्षांत आलें नाही. पण आतां रात्र पडल्यावर तें लक्षांत आलें. एकदां मनांत आलें कीं, दर्ग्याचें बाहेर पडून थोड्या अंतरावर आमच्यांतले कित्येक शिपाई मरून पडले आहेत, त्यापैकीं एखाद्याचा कोट उचलून आणावा. म्हणून पहाऱ्यावर मुख्य अधिकारी नेमला होता, त्याला विचारलें. त्यानें सांगितलें कीं रात्रीं, या इमारतीचें बाहेर कोणालाहि सोडावयाचें नाहीं, असा वरिष्ठ अधिकाऱ्याचा सक्त हुकूम आहे. तेव्हा नाईलाज म्हणून पुनः ओवरींत परत आलो; चुलीवरची डाळ रटरट शिजत होती. आणि जणूं कांहीं मला हंसत होती. मग मनांत आलें—इंग्रज सैनिकाचाच कोट कशाला हवा ? येथलें बंडवाले सामान टाकून पळून गेले, त्यांतही एखादा कोट सांपडेल. ही कल्पना मनांत येतांच भिंतीच्या कोनाड्यांतील दिव्याची पणती हातांत घेतली आणि चौकांत मुख्य कबरीची भव्य इमारत अंधारांत आधिकच भव्य दिसत होती तिकडे गेलो. दरवाजांतून आंत गेल्यावर कांहींच दिसेना इतका गुडुप अंधार होता. तथापि हातांत पणती धरून मुख्य कबरीचे अनुरोधानें तसाच वीस पंचवीस कदम चालत गेलो. कांहीं वेळानें चालत असतांना असा भास झाला कीं, जणूं कांहीं समुद्रकांठच्या रेतींतूनच आपण चाललो आहो. पण पाय उचलावा तों गुडघ्याइतका त्या रेतींत जाई. माझ्या डोक्यांत ओव्हरकोट शोधण्याखेरीज दुसरें कांहींहि नसल्यामुळे त्या रेतीचा रंग काळाच आहे हें प्रथम लक्षांत आले नाहीं. नंतर त्या पणतीच्या प्रकाशांत सहज पुनः पायांकडे पाहिलें तो एकदम असें दृष्टीस पडलें कीं मी दारूच्या ढिगांतून चाललों आहे, आणि भोंवताली जिकडे तिकडे सुऱ्या वस्त्रगाळ दारूचेच ढीग पसरले आहेत ! कोपऱ्यांत एके ठिकाणीं गांवठी हातबाँबची रास असून त्याला शिलगावण्याच्या वाती मृत्यूच्या जिभांप्रमाणें सहा इंच बाहेर काढून ठेवल्या होत्या. हें पाहतांच माझ्या जिवाचा जो थरकांप उडाला त्याचें वर्णनच करतां येणार नाहीं.


जीभ घशांत ओढून गेली. अंगाला दरदरून घाम सुटला आणि पाय भीतीनें लटलटा कांपूं लागले. ‘दारूच्या कोठारांत जळती मशाल घेऊन प्रवेश करणे’ अशी म्हण आहे; पण दारूच्या ढिगांत मी खरोखरच हातांत जळती दिवटी घेऊन प्रवेश केला होता. लाल स्फुल्लिंग असलेली ती तेलाची वात पणतीबाहेर पुढें झुकली होती. त्या गुलाची एक ठिणगी जरी खालीं पडती, किंवा माझ्या पायानें हालविलेल्या दारूचे कण वर उसळून पेट घेते, तरी एकदम भडका होऊन माझ्यासकट तो सगळा शहानजफ आकाशांत उडून अदृश्य होण्याला वेळ नव्हता. तेव्हां अगदीं जीवभीतीनें प्रेरित होऊन ती जळती वात गुलाचे ठिकाणीं मी दोन बोटांत गच्च दाबून धरली. बोटांना चरका बसणार होता. पण बोटांमध्यें तो ठिणगीचा गुल संपूर्णपणें विझला तर ठीक, पण माझ्या अर्धवटपणानें वा भीतीनें त्यांतला एक जळता कण जरी खाली पडला तरी प्राण राहात नाहींत असें समजून, हाताचीं बोटें मी अगदीं गच्च आवळून धरली होती. माझी छाती धडधड करीत होती. यापुढे आंत राहणें शक्यच नव्हतें. म्हणून तसाच माघारा वळलो. चौकांत शेकोटीचा प्रकाश दिसत होता त्याचे अनुरोधानें चालत दर्ग्याबाहेर आलो.

बाहेर गार हवा लागली. पण हाताची बोटें चुरचुरत होतीं. डाव्या हातांत तेलाची पणती तशीच होती. त्यांतलें तेल उजव्या हातावर ओतले, पण आग थांबेना. छाती अद्याप धडधड करीत होती. तसाच धावत जाऊन शेकोटीच्या शेजारी माझा एक स्नेही ओव्हरकोट पांघरून निजला होता, त्याला दोन्ही हातांनीं गदगदा हालविलें आणि मी अनुभविलेला प्रकार सांगितला. तो अर्धवट झोपेंतच मला म्हणाला, “तुला झोपेंत चालण्याची संवय दिसते! एरव्ही तूं असा भ्याला नसतास!” मी त्याला थोड्या रागानें म्हटलें, “काल तुझ्याबरोबर मी खांद्याला खांदा लावून लढलो आणि चार वेळां जीव धोक्यांत घातला. मला असें बोलणें तुला शोभत नाही!” तेव्हां त्याचे डोळ्यावरची झोंप उडाली आणि माझें सगळें म्हणणें त्यानें ऐकून घेतले. सुक्या दारूच्या ढिगांतून मी चाललो होतो यावर त्याचा विश्वास बसेना. गुडघ्याखालीं माझ्या पायांवर दारूचा थर अद्याप होताच. त्यावर हात फिरवून हातांत मूठभर दारू घेतली

आणि समोर आगटी पेटली होती त्यांत टाकली. तो एकदम पुरुषभर जाळ झाला ! तेव्हां माझ्या मित्राचे डोळे उघडले. मग त्याने या गोष्टीची वाच्यता न करण्याबद्दल सांगितले. कारण शिस्तभंगाबद्दल उगाच शिक्षा व्हावयाची ! सकाळीं दर्यांतील कोठार सर्वांचे निदर्शनास आलें तेव्हां गोण्यांतून जें सामान भरलें त्यांत ती सुटी दारू साठ मण म्हणजे सुमारें पांच हजार पौंड होती असें आढळून आलें !

यानंतर मोतीमहाल, बादशाही बाग, मेस हाऊस वगैरे ठिकाणें आम्हीं घेतलीं. आणि रेसीडेन्सीपर्यंत पोहोचलों. आणि तेथील बायकामुलांची सुटका केली. एकीकडे लखनौमध्यें रेसीडेन्सीपर्यंत आमचें हात पोहोचत आहेत तोच तात्या टोपे आणि नानासाहेब यांनीं हल्ला करून पुनः कानपूर ताब्यांत घेतलें. आणि आमच्या पिछाडीला फार मोठा धोका उत्पन्न केला यामुळें सर कॉलिन यांना कानपूरकडे आपलीं पावलें वळवावीं लागलीं. वाटेंत कालीनदीची लढाई जिंकून फत्तेगड घेतलें. फरुकाबादचा नबाब पाडाव येथे सांपडला. त्याला फांसावर चढविलें. खटल्यांत ज्यूरी नव्हती, वकील नव्हता. त्याचा खटला म्हणजे केवळ फार्स होता. त्याचे तोंड डुकराचे चरबीनें माखून डोंबांनीं त्याचे पाठीवर कोरडे उडविले आणि नंतर फांशी दिले. शहरांत बंडावा होता आणि पोलिसांनीं पुष्कळांना पकडून कमिशनरपुढें उभें केलें. त्यांच्या टोळ्या करून चौकांत वडाचे झाडाकडे नेत आणि फाशी देत. दुपारी तीन वाजल्यापासून दुसरे दिवशीं सकाळपर्यंत हा कार्यक्रम चालला. त्या एका झाडावर एकशेपस्तीस लोकांची प्रेतें टांगलीं होतीं व आणखी जागाच शिल्लक नव्हती म्हणून हा कार्यक्रम थांबला !

कानपूरकडे आम्हीं त्वरेनें आलों. नानासाहेब आणि तात्या टोपे यांनीं ग्वालेरची कंटीजंट फौज मिळविली होती. हें सैन्य सुमारें पंचवीस हजार अद्यावत् शस्त्रास्त्रें व तोफांनीं सज्ज व कवाईत शिकलेलें होतें. नानासाहेबांचें सैन्य आणि ग्वालेरचें सैन्य अशी तात्या टोपेजवळ चाळीस हजार फौज होती. त्यानें तेथें असलेल्या जनरल विंडहॅमचा सहज पराभव केला. आणि बिब्रीघर, सतीचोर घाट, शहर, ट्रेझरी वगैरे सर्व भाग जो पूर्वी जुलैमध्यें आम्ही जिंकला होता. तो सर्व पुनः ताब्यांत घेतला सुदैव



कोर्टमार्शल-झटपट निकाल

इतकेंच कीं, गंगेवरचा नावांचा पूल अद्याप शाबूत होता; आणि अलाहा-बादचा रस्ता मोकळा होता. डिसेंबर महिन्यांत आमची फौज परत आल्यावर दहा दिवस युद्ध होऊन कानपूर बंडवाल्यांचें हातून गेलें आणि नानासाहेबांनीं नावेंत बसून पळ काढला. आमच्या घोडदळानें आणि तोफखान्यानें नदीपर्यंत त्यांचा पाठलाग केला आणि कित्येक नावांवर तोफा डागून त्या बुडवल्या. पण नानासाहेब हातीं लागले नाहींत.

आमच्या सैन्यांत कानपूर येथें जनरल होप ग्रॅन्ट होता. अंजूर तिवारी नांवाच्या एका हेरामार्फत ब्रम्हावर्तास असलेल्या नानासाहेबांच्या खजिन्याची बातमी त्याला लागली. होप ग्रॅन्ट याला तिवारी पुष्कळ गोष्टी सांगत असें, त्यांतील खरे किती खोटें किती हें कळण्याला मार्ग नसल्यामुळें सर्व ऐकून घेऊन होप ग्रॅन्ट नुसतें हूं हूं करून होकार देत असे. एकदां अंजूर तिवारी याला मुद्दाम डिवचण्याकरितां ग्रॅट त्याला म्हणाला, " हें बघ तिवारी ! तूं गप्पाच फार मारतोस. तुझ्या सांगण्यांत खरें किती, आणि थापा किती हें सांगवत नाही. बिठूरच्या राजवाड्यांतल्या गोष्टी तूं सांगतोस पण ब्रम्हावर्ताला तूं चुकून कधीतरी गेला होतास कां ? " तिवारीला या बोलण्याचा थोडा राग आला. पण तो इतकेंच म्हणाला, "साहेब ! मी याबद्दल तुमची खात्री करीन. मग तर झालें ना ? " यानंतर दोनतीन दिवसांनी ब्रह्मावर्तावर फौज निघाली, तेव्हां मार्गदर्शक वाटाड्या म्हणून अंजूर तिवारी होप ग्रॅन्टबरोबर होता. ब्रम्हावर्तास रस्त्यानें फौज जात असतांना एके ठिकाणीं थांबून होप ग्रॅन्टला तो म्हणाला, ' त्या समोरच्या झाडांच्या फांदीवर जें दिसत आहे तें एखाद्या शिपायाला काढून आणण्यास सांगा. ' ग्रॅन्टनें एका शिपायाला झाडावर चढवून ती वस्तूं आणवली, ती एक फडक्याची चिंधी होती. तिवारी म्हणाला ' ही चिंधी सध्यां तुमच्या खिशांतच असूं द्या; ' नंतर सर्व फौज मुक्कामावर गेली तेव्हां अंजूर तिवारी म्हणाला, ' मघाशी तुमच्याजवळ जें फडकें ठेवावयाला दिलें होतें तें काढा. ' होप ग्रॅन्टनें खिशांतून चिंधी काढतांच तिवारी म्हणाला " हीं चिंधी या माझ्या धोतराच्या काठाला लावून पहा. म्हणजे हा माझ्याच धोतराचा फाडलेला कांठ आहे हें दिसून येईल ! ब्रम्हावर्ताला मीं पूर्वीं आलों

होतो कीं नव्हतो याबद्दल आता तरी तुमची खात्री पटली ना ? "

होप ग्रॅन्टनें ब्रम्हावर्तचा सर्व राजवाडा धुंडाळून पाहिला. त्यांत नानासाहेबांची संपत्ती कोठें आढळली नाहीं. तेव्हां ती त्यानें विहिरींत टाकली असावी असें निश्चित वाटून विहीर उपसण्याचें काम सुरू झालें. विहीर मोठी असल्यानें चार लोखंडी रहाट चार बाजूला लावले होते. आणि कातड्याच्या मोटांनीं सतत पाणी उपसून टाकण्याचें काम बारा दिवस चाललें होतें. २५ माणसांची एकेक तुकडी अशा दर तीन तासांनी सर्व तुकड्या आळीपाळीनें मोटेच्या दोरावर पाणी खेचण्याचें काम करीत. विहिरींत उतरवलेलीं माणसें दर तासातासानें बदलावी लागत. प्राईझ मनीच्या शिरस्त्याप्रमाणें जी लूट मिळेल त्यावर शिपायांचा हक्क असल्यामुळें, आमच्या फौजेंतल्या तिन्ही तुकड्यांतील माणसें अहोरात्र कामाला लागलीं होतीं. अखेर तळ दिसूं लागला, तेव्हां चार मोठ्या लोखंडी पेट्या आढळल्या. त्यांत सोन्यारुप्याचीं मोठमोठीं ताटें, कित्येक भांडीकुंडीं, पेशव्यांचा हत्तीवर बसण्याचा रुप्याचा एक हौदा, आणि सुमारें तीस लक्ष रुपयांचा एकंदर ऐवज आढळला. नगद तीस लक्ष रुपयांचे हें मौल्यवान ओझें दोरानें वर ओढून घेण्यास किती जड असेल याची कल्पनाच केलेली बरी ! पण आशा आहे ना ! म्हणून आणखी कित्येक माणसें कामावर लावून तो सर्व खजिना वर काढला.

पण खरी गंमत पुढेच आहे. होप ग्रॅन्टनें हा सर्व खजिना कानपूरला नेला, तेव्हां सरकारनें तो सर्व ट्रेझरींत जमा केला आणि तो मिळवून आणणाऱ्या शिपायांना एक दमडी देखील मिळाली नाही ! नानासाहेबांनी कानपूरांतला इंग्रजांचा खजिना हाताखालीं घातला होता, तो या दुसऱ्या वाटेनें परत मिळाला असा सरकारचा युक्तिवाद होता.

याच सुमारास (२५ डिसेंबर १८५७) सचित्र लंडन न्यूज या पत्राचा अंक हिंदुस्थानांत आला. आणि त्यांत नानासाहेबांचे चित्र प्रसिद्ध झालेलें आढळलें. वास्तविक हें चित्र अयोध्या प्रसाद या कोट्याधीश व्यापाऱ्याचें. (त्यालाच ज्योतिप्रसाद असेंहि म्हणत असत.) हिंदुस्थानांत ज्यावेळीं हें चित्र लोकांनीं पाहिलें त्यावेळीं फारच गंमत झाली. ज्यांनीं नानाला पाहिला होता ते म्हणत हें चित्र नानासाहेबांचें मुळींच नव्हे. व

ज्यांनीं फक्त अयोध्याप्रसादला पाहिला होता ते म्हणत, नानासाहेब हा थेट ज्योतिप्रसाद सारखाच दिसत असला पाहिजे. कारण त्या चित्राखाली नांव नानासाहेबांचें होतें ! बॅरिस्टर लँग यानें १८५० सालीं हिंदुस्थानांत येऊन अयोध्या प्रसादचा एक मोठा खटला जिंकला होता. त्यावेळीं



अयोध्याप्रसाद

कृतज्ञताबुद्धीनें फीच्या रकमेखेरीज अयोध्याप्रसादनें त्याला तीन लाख रुपये बक्षीस देऊन स्वतःचें चित्रहि नजर केलें. त्या चित्राच्या चौकटीला हिरे–मोती लावले असल्यामुळें त्याचीच किंमत २५ हजारांवर होती ! पुढें १८५७ सालीं बंडांत नानासाहेबांचे नांवाचा गवगवा फार झाल

तेव्हां सचित्र लंडन न्यूजकरितां आर्टिस्ट लोक हिंदी संस्थानिकांचीं चित्रें धुंडूं लागले. त्यांत एकाची नजर लँगसाहेबाचे घरांतील ज्योतिप्रसादचे चित्रावर गेली ! लँगसाहेबानें त्याला पुष्कळ सांगितलें कीं हें चित्र नाना-साहेबांचें नाहीं. तो म्हणाला "नसलें म्हणून काय झालें ? विलायतेंतल्या लोकांनीं नानासाहेबाला काळागोरा कसा तो पाहिला नाहीं. वाचकांचे समाधान कोणत्याहि चित्रानें होईल आणि उद्या ते ही गोष्ट विसरून जातील !" असें म्हणून तो तें चित्र घेऊन गेला आणि सचित्र लंडन न्यूज पत्रांत तें (अयोध्याप्रसादचें) चित्र नानासाहेबांचें म्हणून प्रसिद्ध झालें. पण नंतर स्वतःच्या चुकीबद्दल लँगसाहेबाला अत्यंत खेद उत्पन्न झाला. जन्मांत या गोष्टीचा उच्चार त्यानें केला नाहीं. व मलाहि न करण्याबद्दल त्यानें शपथ घातली होती. आतां लँगसाहेब किंवा अयोध्या-प्रसाद दोघेहि (१८९३ सालीं) जिवंत असण्याचा संभव नाहीं म्हणून या चित्राच्या रहस्याची गोष्ट मी प्रथमच प्रगट करीत आहे.

यानंतर मार्च महिन्यांत आम्ही लखनौवर दुसरी मोहीम केली. पूर्वीच्या मोहिमेंत आम्ही फक्त इंग्रज बायकामुलांची सुटका तेवढी केली, पण लखनौ जिंकावयाचेंच होतें. यावेळीं जंगबहादुरचें बरेंच सैन्य आमच्या दिमतीला होतें. ता. १३ रोजीं इमामबरा आणि कैसरबाग सर केली. या मोहिमेंत आमचा कोठेंहि पाय पाठीमागें आला नाहीं. शीख, गुरखे व आमचे पलटणी शिपाई यांनीं या ठिकाणीं जाळपोळ व लुटालूट करि-तांना जें वर्तन केलें त्याला 'प्रलय' एवढा एकच शब्द लावतां येईल ! हिरे–मोती, रत्नें वगैरे हवें ते आणि हवें तितकें शिपायांचे हातीं लागत असे. संपत्ति म्हणजे काय हें ज्यांनीं पूर्वीं चुकूनहि पाहिलें नव्हतें त्यांना हिरेमोती, रत्नें आणि मोहोरा यांच्या राशीच्या राशी पाहून, त्यांचें डोकें फिरून गेल्यासारखें झालें. आणि इमामबरा, हझरतगंज व केसरबाग इत्यादि ठिकाणीं लूट करण्याकरितां जो गोंधळ हाणामार आणि सैतानी लीला या शिपायांनीं केल्या त्याचें वर्णन करणें अगदीं अशक्य आहे.

लखनौमध्यें अक्षरशः क्रोडो रुपयांची संपत्ति होती. १८५७चें पूर्वीं तेथें खरोखरच–'गजांतलक्ष्मी' वावरत होती. तें सर्व द्रव्य या लुटींत चोरा-पोरीं गेलें. कोणाला काय मिळावें किंवा किती मिळावें याला सुमारच

राहिला नाहीं. एकाचे हातीं नबाबाच्या ताझियाचें हिरेजडित पदक लागलें. शिपायांना रत्नांची पारख काय आणि किंमत कशी कळणार ? अनेक माणसांचे हातांतून जात तें लंडनला पोचलें. तेव्हां त्याची किंमत ऐंशी हजार पौंड म्हणजे सुमारें आठ लाख रुपये झाली. दुसऱ्या एकानें लखनौमध्यें लुटलेल्या संपत्तींतून स्कॉटलंटमधील एका स्थावर मिळकतीवर असलेलें एक लक्ष ऐंशी हजार पौंडाचें असलेलें गहाण फेडून ती मिळकत विकत



हजरत महाल बेगम

घेतली हें मला माहीत आहे. याच्या उलट मला दहा बारा तरी शिपा-यांचीं अशीं उदाहरणें माहीत आहेत कीं, त्यांना अनाथाश्रमांत निष्कांचन स्थितींत मरण आलें. त्यांपैकीं एकादोघांना शौर्याबद्दल व्हिक्टोरिया क्रॉसदेखील मिळाला होता. पण ही अखेर ज्याच्या त्याच्या नशिबाची बाब समजली पाहिजे. संपत्तीच्या समुद्रांत पडूनहि ती ज्यांना मिळाली नाहीं किंवा जे कोरडे राहिले त्यांच्याबद्दल दुसरें काय म्हणावयाचें ?

लखनौच्या युद्धांत सर्वांत अत्यंत कडवा प्रतिकार जर कोठें झाला असेल तर बेगमकोठीच्या लढाईत. हजरत महालच्या राजवाड्याभोंवती विस्तीर्ण खंदक व त्याबाहेर तट होता. यांतील तसूतसू जागा त्या शिपा-यांनीं लढविली. सबंध खंदक प्रेतांनीं भरून गेला होता, इतकेंच नव्हे तर कांही ठिकाणीं तटाच्या भिंतीसारखीं प्रेतें एकावर एक रचून ठेवलीं होती. युरोपांत सेबॅस्तेपूलच्या वेढ्यांत रेडनचा किल्ला घेणें जितकें दुर्घट होतें त्याहून आजिंक्य बेगमकोठीचा कोट होता. लखनौंतच काय पण लखनौच्या आसपास कित्येक मैलपर्यंत बैल, गाढवें, उंट, घोडे, माणसें यांचीं प्रेतें तशींच पडलीं होतीं. आणि त्यांची दुर्गंधि जिकडे तिकडे असह्य पसरली होती. हजारों डोंब, मांग व मजूर त्यावर माती लोटण्या-करितां लावले होते यामुळें तें विस्तीर्ण शहर एकाद्या अफाट दफनभूमी-सारखें दिसत होतें. मार्च १८५८ अखेर आम्ही लखनौतून बाहेर पडलों. कारण आम्ही लखनौ जिंकलें तरी बंडवाले अयोध्या प्रांतभर पसरले होते. ते फक्त लखनौची लढाई हरले पण हें युद्ध हरलें नव्हतें ! त्यांचा निश्चय अद्याप अपराजितच होता.

नानासाहेब पेशवे, हजरत महाल बेगम, शहाजादा फिरोजशहा, फैजाबादचा मौलवी, बरेलीचे खान बहादूरखान, रोयाचा नरपतासिंग इत्यादि मंडळी रोहिलखंडांत होती, तिकडे आम्ही मोर्चा वळविला. बरेलीचे खानबहादूरखान यांनीं यावेळीं आपल्या सैन्यास जाहीर केलें होतें कीं, ‘ इंग्रजी फौजेशी समक्ष गांठ घालू नका. त्यांची लष्करी शिस्त आणि तोफा आपल्यापेक्षां सरस आहेत. त्यांच्या हालचाली-वर पाळत ठेवा. ठिकठिकाणीं नद्यांवरील घाट आपल्या ताब्यांत ठेवा. त्यांची रसद, डाक, यांवर छापे घालून त्यांना हैराण करा. ’ पण या

गनिमी काव्याच्या युद्धाचा आतां फारसा उपयोग नव्हता. रोहिलखंडांत रोया येथें नरपतासिंगाची गढी होती. त्यावर आम्ही चाल केली. येथें बंडखोरांनीं ॲड्रियान होपवर आकस्मिक हल्ला करून त्याचा बळी घेतला. या लढाईत आमचे कित्येक नामवंत आणि शूर अधिकारी केवळ आमच्या गाफीलपणामुळें आणि गैरव्यवस्थेमुळें बळी पडले. नरपतसिंग हातीं लागला नाहीं. सैन्यासह त्यानें पळ काढला. यानंतर बरेलीच्या मार्गावरील फत्तेगंज येथें आलों. वाटेंत खेड्यांत एक देखील मनुष्य दिसला नाहीं. येथें खान बहादूरखान व फिरोजशहा यांच्या प्रचंड सैन्याशीं मुकाबला झाला. त्यांचेकडे तीस हजार पायदळ, पंचवीस हजार घोडेस्वार व मीरतचा सुप्रसिद्ध तोफखाना होता अशी बोलवा होती. रोहिल्यांनीं युद्ध अतिशय निकरानें, आणि त्वेषानें केलें. पायदळानें कच खाऊ लागतांच फिरोजशहा यानें स्वतः जातीनें रिसाल्याचा हल्ला केला. पण शीख आणि गुरखे यांपुढें त्यांचें कांहीं चाललें नाहीं. आणि सर्व सैन्य हटत मागें बरेलींत गेले. तेथेंहि दर घरांत कडवा प्रतिकार होतच होता. खानबदूरखान हस्तगत झाले त्यांना आम्ही फांशीं दिले. खान बहादूरखान हा वयोवृद्ध मनुष्य असून पांढरी शुभ्र दाढी असलेला होता आणि वॉरन हेस्टिंग्जपासून रोहिलखंडाचे नबाबांचा वंशज होता. शहाजहानपुरास ७ मे रोजीं फिरोजशहा आणि नानासाहेब यांनीं पुनः आमच्या सैन्यावर हल्ला केला. अखेर हटतहटत त्या सर्वांनीं नेपाळच्या तराईचा आश्रय केला.

* * *

: ६ : एका हेराची रहस्यकथा


'युद्धस्य कथा रम्या' हें तर खरेंच, पण युद्धाच्या इतिहासांत हेरांच्या गोष्टीइतकें नवलकारक व चित्तवेधक दुसरें आढळणार नाहीं. याचें कारण असें कीं, हेर इतिहास सांगत बसत नाहीं, तर आपण स्वतः पाहिलेली व अनुभवलेली गोष्ट सांगतो. त्यामुळें अशा सत्यकथेची किंमत वेळीं दहा इतिहासग्रंथांपेक्षाहि मौल्यवान् ठरते. शत्रूच्या हातीं पाडाव झालेल्या हेराला बहुधा देहांताची शिक्षा होते व त्यावेळीं तो जें सांगतो तें करुणास्पद असतें इतकेंच नाहीं तर खरेंहि असण्याचा संभव असतो. जिवाच्या आशेनें मनुष्य एखादे वेळ खोटें सांगेल, पण ज्याच्या जीविताची आशा नष्ट झाली त्याला खोटें सांगून तरी काय लाभ होणार ? व या दृष्टीनें पुराव्याच्या कायद्यांतहि, मृत्युपूर्वीं घेतलेल्या आरोपीच्या जबानीला (Dying Declaration) फार महत्त्व दिलेलें आहे. १८५७ सालच्या युद्धासंबंधीं नंतर प्रसिद्ध झालेल्या पुस्तकांत हेरांच्या किती तरी मनोरंजक गोष्टी प्रसिद्ध झालेल्या आहेत. तथापि त्यांतली एकच निवडून आम्ही पुढें दिली आहे; याचें कारण पुराव्याच्या दृष्टीनें अशा जबान्यांचा इतिहासाला केवढा उपयोग होतो हें वाचकांच्या लक्षांत यावें.

१८५७ सालाच्या बंडांतील एका प्रमुख कटवाल्याची ही जबानी असून, हें बंड कां झालें, कसें झालें, कटांत कोण व्यक्ति प्रमुख होत्या, त्यांचे हेतु काय होते, यांवर त्यामुळें फारच उत्तम प्रकाश पडतो. या गृहस्थाचें नांव महंमद अल्लीखान. बरेलीच्या उमराव घराण्यांत याचा जन्म झाला. वयानें तिशीच्या आंतबाहेर असून तो अत्यंत धाडशी, कर्तबगार

व उमदा होता. विलायतेंत व युरोपांत त्यानें प्रवास केला होता. परराष्ट्रीय राजकारण त्याला उत्तम कळत होतें. नानासाहेबांचा वकील अजीमुल्ला व हा महंमदअल्ली यांनींच परराष्ट्रांशीं संगनमत करून हिंदुस्थानांत बंडाची उठावणी केली. बंडांत लखनौच्या बेगमेच्या सैन्यांत हा महंमदअल्ली एक वरिष्ठ दर्जाचा लष्करी अधिकारी होता. पण इंग्रजांच्या सैन्याची लष्करी माहिती काढण्याकरितां वेषांतर करून गेला असतां तो हेर म्हणून धरला गेला, व त्याला फांसावर चढविण्यांत आलें ! १८५७ चें बंड कां झालें, कशाकरितां झालें, नानासाहेबांचा कानपूरच्या कत्तलीशीं कसा संबंध नव्हता, कंपनी सरकारचे हातून राज्य काढून घेऊन पार्लमेंट तें राणीसरकारकडे देणार ही सनदशीर सुधारणा किती इष्ट आहे, वगैरे अनेक गोष्टी त्यानें मनमोकळेपणानें बोलून दाखविल्या, व ही हकीकत सांगत असतां रात्रहि सरली, व त्याचबरोबर त्याचें आयुष्यहि सरलें असल्यामुळें दुसऱ्या दिवशीं महंमदअल्ली यास फांशी देण्यांत आलें. फोर्बस् मिचेल यानें ही सर्व हकीकत आपल्या ' आठवणीं 'त सविस्तर दिली असल्यामुळें आम्ही ती जशीच्या तशीच मुद्दाम पुढें देत आहों:—

१८५७ सालच्या फेब्रुवारींत कॉलिन कँबेल लखनौचा वेढा उठविण्याकरितां निघाला असतांना त्याचे हाताखालीं जनरल लुगार्ड, ॲड्रियान होप, फोर्बस मिचेल वगैरे कित्येक अधिकारी होते. लखनौमध्यें बंडवाल्यांचा प्रतिकार फार सख्त असल्यामुळें कानपूरपासून लखनौपर्यंत रस्त्यावर इंग्रजी सैन्याची रांगच लागली होती. यावेळीं सुमारें एकतीस हजार सैन्य आणि एकशेंसाठ तोफा इंग्रजांचे सैन्याबरोबर होत्या. उनाववर फार मोठी छावणी पडली होती व अनेक माणसें कामाच्या मिषानें छावणींत येत, त्यांत कांहीं हेरहि असत !

मिचेल यानें आपल्या 'आठवणी'त लिहिलें आहे; या वेळी उनावपाशीं दहा दिवस आमच्या छावणीचा तळ पडला होता. अलमबागेंत औटरॅमच्या सैन्यावर हजरत महाल बेगम व मौलवी वारंवार तोफा डागीत त्यांचा आवाज आम्हांला दूरवर ऐकूं येत असे. तसेंच, आमच्यामागें कानपुरास गंगेच्या घाटावरील देवळें उडवून देण्याचें काम जनरल नेपियर करीत होता, त्याचे आवाजहि कानावर येत. एक दिवस सकाळीं विशेष काम



फितुराला देहांत प्रायश्चित्त

नसल्यामुळें विलायतचीं कांहीं वर्तमानपत्रें वाचीत असतां, चहाबरोबर खाण्याच्या ' प्लम केक्स ' विकणारा एक फेरीवाला छावणींत आला. तो रूपानें तरुण, दिसण्यांत सुरेख, वर्णानें गौर, कपाळ उंच, काळ्याभोर वळविलेल्या मिशा, डोळे पाणीदार, अंगांत पांढरीशुभ्र शेरवानी, देशी नेटिव्ह सैन्यांतील अधिकारी जसे असतात तशी त्याची एकंदर ढब वाटली. त्याचे पाठीमागें एक उग्र चेहऱ्याचा, तोंडावर देवीचे वण आणि हातावर दाट काळे केस असलेला असा काळाकभिन्न मुसलमान नोकर होता. त्याचे डोक्यावर केक्सनी भरलेला हारा होता.

' कायरे कशा आहेत केक्स ? '

' हां साहेब, खाऊन पहा मग पैसे द्या. '

' अरे ! तूं छावणींत आलास, तुजजवळ रीतसर परवाना आहे का ? '

' हा बघा साहेब ! शेरियर साहेबांचे सांगण्यावरून ॲड्रियन होप साहेबांनीं स्वतः लिहून दिला आहे. त्यांचे हस्ताक्षर तुमच्या ओळखीचें असेलच. '

मिचेलने तो परवाना पाहिला. त्यांत फेरीवाल्याचें नांव जेम्स् ग्रीन असें लिहिलें असून परवाना सर्व रीतसर होता.

थोड्याच वेळांत त्यानें तेथें बसून इंग्रजी वर्तमानपत्रें पाहावयास मागितलीं. आणि आमची फौज किती आहे, विलायतेंतील लोक बंडाबद्दल काय बोलतात, नव्या आलेल्या फौजांना लखनौला उन्हाळा कसा काय मानवेल, इत्यादि चौकशी केली. हा फेरीवाला अगदीं अस्खलित शुद्ध इंग्रजी बोलत होता याचें मिचेल यास फार नवल वाटलें. " तूं इतकें सफाईदार इंग्रजी कसें बोलतोस ? " असें मिचेल यानें विचारलें. तेव्हा तो म्हणाला, " माझा बाप युरोपियन लष्करांत फार दिवस खानसामा होता. मीही लहानपणीं रेजिमेंट शाळेंत जाई, त्यामुळें मला लहानपणापासूनच इंग्रजी येते. " असें सांगून फेरीवाल्याच्या स्वभावाप्रमाणें थोडा थट्टा विनोद करून आपल्या केक्स विकण्याकरितां तो ॲड्रियन होपसाहेबाच्या छावणींत गेला. जातांना इंग्रजी वर्तमानपत्रें मागून नेण्यास मात्र तो विसरला नाहीं !

मिचेल पुढे लिहितो—" या फेरीवाल्याच्या हुशारपणाचें मला नवल

व कौतुक वाटलें. पण संध्याकाळीं त्याचेबद्दल जी बातमी कानावर आली त्यामुळें मात्र फारच आश्चर्य वाटलें ! होपग्रँट याचे छावणींत हा फेरीवाला गेला तेव्हां असें आढळून आलें कीं, हा लखनौचा हेर आहे व बातमी काढण्याकरितां त्यानें इंग्रजी छावणींत प्रवेश केला होता ! त्याची कोर्टमार्शलपुढें चौकशी झाली व दुसरे दिवशीं सकाळीं त्याला फांशी द्यावयाचें ठरलें. रात्र बरीच झाली असल्याकारणानें त्या दिवशीं शिक्षा अमलांत आली नाहीं. म्हणून त्याला माझ्या छावणींत बंदोबस्त देऊन पाठविण्यांत आलें. त्या फेरीवाल्याबद्दल माझा थोडा बरा ग्रह झाला होता; पण तो ' हेर ' ठरला हें पाहून मला थोडें वाईट वाटलें. आणि त्याच्याबरोबर जो मुसलमान हरकारा होता त्यानें तर बिबीघरांतील इंग्रज बायकामुलांची कत्तल केली असें चौकशींत निघालें !! "

मिचेल त्यावेळीं कानपुरास बँडवाला पोऱ्या होता. त्यानें पुढें सहा महिन्यांनीं अशी स्पष्ट साक्ष दिली कीं, लष्करांतील लोक किंवा नानासाहेबांचे पहारेकरी यांनीं जेव्हां बायकामुलांची कत्तल करण्याचें नाकारलें तेव्हां एका रखेलीनें (बेगम, अगर नानासाहेबांची ' कुणबीण ') जाऊन बाहेरच्या पांच माणसांना आणलें. त्यांत दोन धंदेवाईक कसायी, दोन गांवकरी व एक मजबूत काळाकभिन्न विलायती होता. मला वाटतें पुढें फिचेटनें त्याचें जें वर्णन केलें त्यावरून जेमी ग्रीनबरोबर असलेला मनुष्य हा तोच असावा !

माझ्या छावणींत त्या दोघांना आणल्यावर कांही पहारेकरी डुकराचें मांस आणण्याकरितां धावले. कारण ज्यांना फांशी द्यावयाचें त्यांना प्रथम धर्मभ्रष्ट करून त्यांची विटंबना करीत ! किंबहुना तसा प्रघातच होता. मला हें आवडलें नाहीं. तेव्हां जो कोणी बिगरहुकूम असें बेकायदा कृत्य करील त्याचा पट्टा व ड्रेस काढून घेऊन नोकरींतून त्याला मी कमी करीन असें मीं फर्मावलें. जेमी ग्रीन याला माझा हा हुकूम ऐकून इतकें बरें वाटलें, कीं त्यानें माझे मनःपूर्वक फार आभार मानले.

त्या कैद्यांनी संध्याकाळची प्रार्थना केली. तेव्हां माझे मनांत आलें कीं, आतां आपण रात्रीं झोंप घेऊं नये ! हेरांना सांभाळण्याची अवघड जबाबदारी माझेवर होतीच. बिचाऱ्यांचें जीवन सारी एक रात्र राहिलें

होतें. तेव्हां मी आपल्या खर्चानें बाजारांतून त्यांना थोडी मेवामिठाई आणून दिली, त्यांना खातांपितां यावें इतपत त्यांच्या बेड्या सैल केल्या, आणि त्यांच्याशीं मोकळेपणानें गप्पागोष्टी मारून उरल्या रात्रींत त्यांचे-कडून काय मिळेल ती माहिती घेण्याचें ठरविलें.

भरपूर मनासारखें जेवण झालें तेव्हां थोडा हुक्का पिऊन कांबळ्यावर आरामांत बसल्यावर जेमी ग्रीन यानें मला आपला हकीगत मोकळेपणानें सांगण्यास सुरवात केली. तो म्हणाला, " साहेब, मला एखादा हेर किंवा क्षुद्र चहाडखोर मनुष्य समजूं नका. बेगमेच्या फौजेंतला मी वरिष्ठ दर्जा-तला ऑफिसर आहे. लष्करी चीफ इंजिनिअरचें माझेकडे काम असून लखनौला वेढा घालणाऱ्या तुमच्या सैन्याची बारीक रीतीनें पाहणी करण्याकरितां मी आलों होतों. पण वेळ वाईट, म्हणून दुर्दैवानें तुमच्या हातीं पडलों. पण माझें नांव विचारतां तर माझें खरें नांव महंमद अल्लीखान. जेमी ग्रीन हें कांहीं माझें खरें नांव नाहीं. मी विलायतेंतील लंडन व एडिंबरो पाहिलें आहे. तेथें माझी स्नेहीमंडळीहि आहेत. रोहिल-खंडच्या उच्च सरदार घराण्यांत माझा जन्म झाला. बरेलीच्या कॉलेज-मध्यें शिक्षण झालें पुढें रुरकीच्या कॉलेजमध्यें जाऊन मी एंजिनिअर झालों. पुढें अयोध्येचा नबाब नासिरुद्दीन याचे हाताखालीं नोकरी करावी असा बेत होता, इतक्यांत नेपाळच्या जंगबहादुरबरोबर त्याचा खासगी चिटणीस म्हणून विलायतेस जाण्याचा माझा योग जमून आला. इतर शहरांबरोबर आम्हीं एडिंबरो पाहिलें. तेथें याच तुमच्या ९३ हायलंडर पलटणीनें मोठी परेड करून आम्हांला स्वागतार्थ सलामी दिली होती ! दुर्दैवानें आतां त्याच पलटणीच्या हातीं सांपडून मी हेर म्हणून फांशी जात आहें, हा योगायोग नव्हे काय ?

" विलायतेंत कांहीं दिवस राहिल्यानंतर मी हिंदुस्थानांत परत आलों आणि अनेक राजदरबारीं काम केलें. १८५४ सालीं नानासाहेबांचे वकील अजीमुल्लाखान याचेबरोबर पुनः विलायतेस जाण्याचा मला योग आला. माझ्याप्रमाणेंच त्यालाहि अस्खलित उत्तम इंग्रजी येतें. कानपुरास सरकारी हायस्कुलांत गंगादिन याचे हाताखालीं त्यानें शिक्षण घेतलें. विलायतेस मोठमोठ्या लोकांच्या आमच्या ओळखी झाल्या; पण नाना-

साहेबांच्या पेन्शनचे कामाचे मुळींच जमलें नाहीं! आम्ही विलायतेंत याकरितां सुमारें पन्नास हजार पौंड खर्च केले. नंतर मी कानस्तांतिनोपल-मार्गें हिंदुस्थानांत १८५५–५६ चे सुमारास परत आलों. क्रिमियांत ता. १८ जून रोजीं रशियाविरुद्ध लढत असलेली इंग्रज व फ्रेंच फौज किती भिकार आहे हें पाहून मला नवल वाटलें. पुढें कान्स्तांतिनोपलमध्यें रशियातर्फे कांहीं बड्या व्यक्ति (त्या खरोखर किती अधिकृत होत्या हें सांगवत नाहीं) आम्हांस येऊन भेटल्या व हिंदुस्थानांत आम्ही बंड उभारलें तर रशियाकडून फार मोठी मदत मिळेल असें त्यांनीं आम्हांस खात्रीपूर्वक वचन दिलें! तेव्हां आम्हींहि हिंदुस्थानांत कटाची उभारणी करण्याचा बेत केला. शुक्र खुदा! आणि त्यांत आम्हांला खुदाच्या दयेनें यशहि आलें! तुम्हीं आज जीं वर्तमानपत्रें मला दिलीं त्यावरून दिसतें कीं, कंपनी सरकारची लुटारूपणा करण्याची सनद कांहीं पुढें चालविण्यांत येणार नाहीं! पुष्कळ झालें. इंग्रजांपासून हिंदुस्थान जरी आम्ही स्वतंत्र करूं शकलों नाहीं तरी आमच्या हातून थोडें तरी देशहित घडलें. आमचे प्राण कांहीं अगदींच व्यर्थ गेले नाहींत! राणी-सरकारच्या हाताखालीं कंपनीसरकारपेक्षां हिंदुस्थानला अधिक बरे दिवस येतील, अशी आशा वाटते. आतां मी ते दिवस पाहण्यास राहणार नाहीं हें सोडून देऊं!

“ बंडांत जे कित्येक अमानुष अत्याचार झाले ते मनांत आले कीं शरम वाटते. या छावणींत मी आलों तो इंग्रजाविरुद्ध द्वेष व शत्रुत्व बाळगून आलों. पण तुम्हीं जी माणुसकी मला दाखविली त्यानें मी लाचार झालों. गंगेच्या घाटावर असेंच उदाहरण घडलें. नदीवरचीं देवळें नेपिअर उडवून देत असतां कांहीं ब्राह्मणांनीं येऊन विनंति केली कीं, ‘ या देवळाचें रक्षण करावें ’. तेव्हां नेपियरनें त्यांना सांगितलें कीं, ‘ इंग्रज बायकामुलांचा कानपुरांत घात होत असतां तुमच्यापैकीं एकानें जरी त्याविरुद्ध प्रयत्न केला असला, किंवा निदान त्या वेळीं मनानें नापसंती दर्शविली असली तरी त्यानें पुढें येऊन तसें सांगावें. म्हणजे तें देऊळ मी सोडण्यास तयार आहे ’ मी त्या वेळीं घाटावर नेपियरचे हे शब्द ऐकण्यास समक्ष होतों. नामुष्कीची गोष्ट अशी कीं, एक देखील

ब्राह्मण तसें म्हणणारा पुढें आला नाहीं ! ”

मी महंमदअल्लीला विचारलें, “ बंडास सुरवात झाली त्या वेळीं तूं कानपुरांत होतास काय ?”

“ नाहीं, मी त्या वेळी सुदैवानें रोहिलखंडांत माझ्या बायकामुलांची व्यवस्था करण्यांत गुंतलों होतों. कारण लवकरच बंडाची गडबड सुरू होणार हें मला माहीत होतें. बरेलीला बंड झालें तेव्हां त्या शिपायांबरोबर मी ताबडतोब दिल्लीला गेलों. तेथेंहि बादशहानें मला मुख्य एंजिनीयर नेमलें. चार महिने मी दिल्लींत होतों. पुढें दिल्ली पडण्याचे सुमारास इतरांबरोबर पळ काढून मी लखनौस आलों. मथुरेस आल्यावर यमुनेस फार पाणी आल्याकारणानें सैन्यास जाण्यास वाट नव्हती. तेव्हां मींच नावांचा पूल तयार करून दिला. या वेळीं शहाजादा फिरोजशहा व बखतखां यांचेजवळ तीस हजार सैन्य होतें. लखनौस गेल्यावर तेथेंहि मुख्य लष्करी एंजिनिअरचें काम मला मिळालें. सिकंदराबादची कत्तल मीं डोळ्यांनीं पाहिली ! तीन हजार शिपायांना आदल्याच रात्रीं तेथें बसवून कसा हल्ला करावयाचा याची मी सूचना देऊन शहानजफवरून लढाई पहात होतों. दुदैवानें त्या सर्वांचा फडशा झाला, आणि चौकांतील बादशाही ध्वज खालीं ओढून जेव्हां इंग्रजी निशाण वर चढलेलें मीं पाहिलें तेव्हां तर माझ्या डोळ्यापुढें अंधारीच आली ! लखनौमधील पुष्कळ कोटांचें व गढ्यांचें काम लष्करी प्रतिकाराचे दृष्टीनें मींच करून दिलें. लखनौस आतां तुम्ही जाल. तेथें गेल्यावर त्या कोटापुढून जातांना तुम्ही जगलां वाचलांत तर माझीं कामें कशीं आहेत तें तुम्हांस दिसेलच ! ”

मिचेल यानें कैद्याला विचारलें—“ बरें, हा जो तुझ्याबरोबर नोकर आहे हाच बिबीघरांत इंग्रज बायकामुलांची कत्तल करणारा मारेकरी होता काय ? ”

“ असावा असें आतां मलाहि वाटतें. पण साहेब, ज्या वेळीं मी त्याला कामावर घेतला त्या वेळीं मला हें माहीत नव्हतें ! असल्या दुष्ट माणसांच्या संगतीनेंहि दुसऱ्यावर प्राणसंकट ओढवतें. ”

“ इंग्रज बायकामुलांचा प्राण घेण्यापूर्वी त्यांचेवर जुलूम, बळजबरी

झाली म्हणतात हें खरें काय ? " मिचेलनें विचारलें.

त्यावर महंमदअल्ली तत्काळ म्हणाला, " साहेब, या देशांत आपण परके नसतात तर असला प्रश्न विचारला नसतात ! या देशाचे रीतिरिवाज व धर्माचार किती सख्त आहेत हें ज्यांना माहीत आहे त्या सर्वांना कळतें कीं, हे सर्व प्रकार अगदीं झूट आहेत ! जातिद्वेष माजविण्याकरितां ते मुद्दाम पसरविलेले आहेत ! ! एकाहि स्त्रीवर जुलूम झाला नाहीं. भिंतीवर या स्त्रियांनीं करुण कहाण्या लिहून ठेवल्या होत्या असें कित्येक वर्तमानपत्रांतून प्रसिद्ध करण्यांत आलें. पण तेंहि खोटें होतें. भिंतीवर कांहींएक लिहिलेलें नव्हतें. हॅवेलॉक व औटरॅम यांच्या सैनिकांनीं जेव्हां पुनः कानपुरांत प्रवेश केला तेव्हां त्या शिपायांनीं भिंतीवर हीं वाक्यें चितारलीं ! ! मी त्या वेळीं खुद्द कानपुरांत नसलों तरी मी याची पुष्कळ बारीक चौकशी केली आहे व त्यावरूनच हें तुम्हांस सांगतों. "

" बायकामुलांची असली अमानुष कत्तल नानासाहेबांनीं केली याला तरी कारण काय घडलें ? " मिचेलने विचारलें.

" साहेब ! आमच्या लोकांच्या शब्दांवर तुम्ही जाऊं नका. ते वचन देतील व तें त्यांनीं पाळलें नाहीं असेंहि पुढें दिसेल; पण याचा अर्थ त्यांच्या मनांत कपटबुद्धि असते असा मात्र नाहीं. तें दिलेलें वचन फुकट जातें, हीं माणसेंहि तें वचन विसरून जातात ! नानासाहेबांच्या मनांतून खरोखर या स्त्रियांना वांचविण्याचें होतें. पण दुर्दैवानें अंतःपुरांतच या स्त्रियांना एक अंतःशत्रु होता. अजीमुल्ला त्यांत होता. नानांच्या हातून असली अघोर कर्में होऊन त्यांनीं इतकें पुढें जावें कीं, नंतर मनांत आलें तरी बंडाच्या चळवळींतून त्यांना पाठीमागें पाऊल घेतां येऊं नये, ही त्याची इच्छा ! अजीमुल्ला व बेगम यांनींच हें कत्तलीचें काम केलें. नानांच्या परिवारांपैकीं कोणीहि हें करण्यास तयार झाला नाहीं. तेव्हां या बेगमेनें बाहेरचीं माणसें आणवून हें कृत्य करविलें. स्वतः तात्या टोपे यांनीं ही गोष्ट मला सांगितली आहे. त्यांचे या बाबतींत नानासाहेबांशीं भांडण झालें. हें अघोर कर्म स्त्रीजातीनें केलें, पुरुषांनीं नव्हे. त्याच इतक्या निर्दय व स्त्रीजातीच्या वैरी होऊं शकतात. या इंग्रज स्त्रियांवर तिचा इतका राग कां होता कोण जाणे ! मी ती चौकशी केली नाहीं. "

मिचेलनें पुढें त्याला विचारलें, " जनरल व्हीलरच्या मुलीनें चार-पांच इसमांना पिस्तुलानें ठार मारलें आणि जुलूम होऊं नये म्हणून तिनें विहिरींत उडी घेतली हें खरें काय ? "

" तेंहि साफ खोटें ! व्हीलरची मुलगी आतां या क्षणीं लखनौमध्यें जिवंत आहे. मुसलमानी धर्म स्वीकारून, ज्यानें तिचें रक्षण केलें त्याबरोबर तिनें निका लावला आहे. "

इतकीं बोलणीं होत आहेत तो पहाट झाली, त्याबरोबर मीं त्यांना ताबडतोब प्रार्थना आटपण्यास परवानगी दिली. क्षणभर बायकामुलांची आठवण येऊन त्याला वाईट वाटलें. पण मनाचा निग्रह करून तो म्हणाला, " असें उपयोगी नाहीं. फ्रेंच इतिहासांतील डँटनचें उदाहरण या वेळीं डोळ्यांसमोर ठेवावें. " नंतर त्यानें मला नजर म्हणून एक अंगठी दिली. तो म्हणाला, तुम्ही मला माणुसकीनें व उदारपणें वागविलें. या क्षणीं या अंगठीशिवाय मजजवळ देण्यास कांहीं नाहीं. हिची किंमत सारी दहापांच रुपयेच आहे. पण एका साधूनें ही मला दिली आहे. लखनौमध्यें गेल्यावर मधून मधून हिच्याकडे पाहा म्हणजे तुमचा जीव रक्षण होईल."

इतक्यांत होपसाहेबाचा जमादार छावणींत आला आणि कैद्यांना तांतडीनें बोलावलें आहे असें सांगून त्यांना घेऊन गेला.

मला वाईट वाटलें. पण लखनौला जाण्यासाठीं ताबडतोब तळ हालविण्याचा हुकूम असल्यामुळें मीहि आवराआवरीस लागलों. दुपारीं तंबूराहुट्या सर्व पाडून छावणीचा तळ हालला व लष्कर चालूं लागलें. सूर्य आकाशांत प्रखरपणें तळपत होता. लखनौ कानपूर रस्त्यावर एका झाडापाशीं आल्यावर मीं सहज वर पाहिलें. तों फांसाला लटकून महंमद अल्लीखान व त्याचा हारेवाला नोकर अचेत स्थितींत लोंबत आहेत असें दिसलें ! तें दृश्य पाहून माझ्या डोळ्यांत अश्रूबिंदु जमा झाल्याशिवाय राहिले नाहींत.

* * *

७ अजीमुल्लाखान

एखाद्या व्यक्तीचें चरित्र असें असतें कीं, त्याच्या सान्निध्यानें दुसऱ्याचें सारें भवितव्य बदलून जातें! अजीमुल्ला हा मनुष्य नानासाहेबांजवळ नसता तर नानासाहेब बंडांत पडले असते कीं नाहीं हें सांगवत नाहीं. पण कानपूरच्या दोन्ही कत्तली मात्र झाल्या नसत्या असें निश्चित वाटतें. कोणावरहि हां हां म्हणतां छाप पाडील असें त्याचें बोलणें होतें. व अनेक गोष्टी जुळवून आणील अशी त्याची कर्तबगारी होती. लंडन टाईम्सचा युद्धवार्ताहर वुइलियम रसेल हा १८५६ सालीं क्रीमियांत आला असतां त्याची व अजीमुल्लाची ओळख झाली. पण ती नुसती तोंडओळख होती. पुढें एका वर्षानंतर हिंदुस्थानांत कानपूरच्या कत्तलीचा अतिशय गवगवा होऊन त्यांत वारंवार अजीमुल्लाचें नांव येऊं लागलें तेव्हां रसेल याला एकदम आठवलें कीं, कानस्तांतिनोपल येथें ही व्यक्ती आपणांला पूर्वी भेटली होती. त्याचेंच नांव अजीमुल्लाखान !!

रसेल यानें अजीमुल्लाचें सुरेख शब्दचित्र दिलें आहे तेंच येथें देतो. " ता. १८ जून रोजीं कॉनस्तांतिनोपल येथें मिसरी नामक निवासांत मी उतरलों असतां, एका अनदीं सडपातळ व तरुण अशा गृहस्थाची व माझी गांठ पडली. त्याचा चेहरा सुस्वरूप व रुबाबदार असून वर्ण ताम्र-गौर होता. हातांत मौल्यवान जवाहिराच्या अंगठ्या असून अंगांत पौर्वात्य पद्धतीची शेरवानी होती. इंग्रजी व फ्रेंच दोन्ही भाषा त्याला अस्खलित येत होत्या. त्याच्या रुबाबावरून हा कोणी तरी संस्थानिक अगर मोठा राजघराण्यांतील इसम असावा असें मला वाटलें, नंतर कळलें कीं ईस्ट इंडिया कंपनीविरुद्ध विलायतेंत त्याचें काम होतें; पण त्या कामाचें

न जमल्यामुळें तो आतां हिंदुस्थानास परत निघाला आहे.

क्रीमियांत असलेल्या इंग्रजी सैन्यांत कामगार खात्यांत डॉइन नांवाचा एक सुपरिटेंडेंट होता. त्याची या गृहस्थानें ओळख करून घेतली होती. आम्हीं एक दिवस मिसरी निवासच्या गच्चीवर बसलों होतों तेव्हां डॉइननचें त्याची व माझी ओळख करून दिली. बोलण्यांत त्यानें स्वतःचें कांहींतरी नांवहि सांगितलें. क्रीमियांत जाण्याची त्याला फार इच्छा होती. तो म्हणाला " हे शूर रुस्तुम—जवान मला फार पाहावेसे वाटतात. कारण इंग्रज व फ्रेंच दोघांचाहि त्यांनीं पराभव केला! माल्टा येथें असतांना इंग्रजांचा पराभव झाल्याचें मला कळलें तेव्हां मी वास्तविक कलकत्त्यास परत निघालों होतों. पण या बातमीमुळें मुद्दाम कॉनस्तांतिनोपल येथें जाऊन पुढें बालकलावाहि पहावें असें मला वाटूं लागलें!"

नंतर बोलतांना त्यानें लंडनमधील आपल्या अनेक ऐषारामी चैनींचे अनुभव सांगितले. त्यांत सहज जातां जातां इतक्या मोठमोठ्या स्त्रियांचीं व घराण्यांचीं त्यानें नांवें घेतलीं कीं मला संशय पडलाच, पण सांगणाराबद्दलहि माझा ग्रह थोडा दूषित झाला. ही गोष्ट त्याच्या, अर्थात् खिसगणतींत नव्हती. " स्त्रियांना इतकें स्वातंत्र्य असणें बिलकूल उपयोगाचें नाहीं. पौर्वात्य देशांतल्या रिवाजाप्रमाणें त्यांना नजर कैदेंतच ठेवलें पाहिजे. तीच वास्तविक यांची मर्यादा. त्यांना स्वातंत्र्य मिळालें कीं, पतंगाप्रमाणें दीपज्योतिवर झडप घालून त्यांनीं आत्मघात करून घेतलाच समजा!" असें आपलें मत त्यानें उघड बोलून दाखविलें.

या संभाषणानंतर कांहीं आठवडे लोटले, तेव्हां एक दिवस डॉईन याजकडून एका नोकरानें मला चिठी आणून दिली; त्यांत अजीमुल्लाखान यांना रणभूमीवर खंदक पाहण्यास घेऊन यावें असें लिहिलें होतें. त्याची गांठ पडली तेव्हां माझ्या लक्षांत आलें कीं याचेंच नांव अजीमुल्ला, मी यावेळपर्यंत त्याला संस्थानिकच समजत होतो! नंतर त्याला घेऊन लगेच मी खंदकाकडे निघालो. पण अजीमुल्लाकरितां लष्करी परवाना घ्यावयाचा होता. म्हणून त्याला क्षणभर तेथेंच टेंकडीवर उभा केला व मी सेनापतीच्या खोपटाकडे पायी निघालो.

यावेळीं सूर्य मावळण्याचा अगदी सुमार होता. थोडा अंधार पडला

कीं लढाईकरितां खंदकांतील व्यवस्था व नेआण आम्ही करीत असू. पण शत्रू नेमकी हीच वेळ साधून तोफांचा आमचेवर भडीमार करीत असे. आतांहि असेंच झालें. अजीमुल्लाखान टेकडीवर उभा असतां रशियन लोकांनीं तोफेला बत्ती दिली, तेव्हां अंतरिक्षांतून सूं सूं करीत एक गोळा येऊन अजीमुल्लाचे अगदीं जवळ येऊन पडला. त्याबरोबर जवळच एक कबरस्थान होतें त्यांत जाऊन त्यानें भिंतीचा आडोसा घेतला व न भितां अगर न घाबरता तेथून शत्रूच्या तोफांच्या वातेरीकडे तो नीट न्याहाळून पाहूं लागला. इतक्यात मी येऊन त्याचेजवळ परवाना दिला व सांगितलें कीं, आतांच अंधार झाला आहे; मला एके ठिकाणीं जेवणाचे आमंत्रण आहे तेथें मला गेलें पाहिजे. म्हणून मी जातो. तुम्हीहि लवकरच या. तो म्हणाला, " तुम्ही बेलाशक जा. शत्रूची गोलंदाजी पहावयाला ही मला सुरेख जागा मिळाली आहे. माझें पहाणें झाल्यावर मीहि थोड्या वेळानें तिकडे निघून येतो. पण बघा राव ! शत्रूची ती नाक्याची टेकडी तुम्हांला सर करितां येईल असें मला तरी वाटत नाहीं ! " यानंतर मी त्याला एका स्नेह्याचे घरीं जेवणास येण्यास सांगितलें. तेव्हां थोडें तिरस्कारपूर्वक हंसून तो म्हणाला " मी हाडाचा मुसलमान आहे हें विसरूं नका ! "

" पण मिसरी हॉटेलमध्यें माझ्या बरोबर तुम्ही नव्हतांत का जेवलात ?" मी विचारलें.

त्यावर तो हंसून म्हणाला, " अहो कसला धर्म, आणि कसलें काय ? असल्या थोतांडावर मी विश्वास ठेवतो असें समजूं नका. मला स्वतःला कोणताच धर्म नाही. सर्व धर्म मला सारखेच आहेत. "

इकडे जेवणानंतर मी उशीरा घरीं परत आलो तेव्हां असें आढळले कीं, अजीमुल्ला माझ्याच बिस्तऱ्यावर गाढ झोंपी गेला आहे ! मी येण्याचे पूर्वीं तो आला व माझे घरच्या शिध्यावर हात मारून तो खुशाल तेथेंच झोंपला होता. सकाळीं पाहतो तो, मी उठण्याच्या आधी तो उठून पसारहि झाला होता ! टेबलावर त्यानें एक चिठ्ठी लिहून ठेवली होती. त्यांत पाहुणचाराबद्दल त्याने माझे आभार मानले होते ! अशी ही एक अजब व्यक्ति होती !!

तात्या टोपे

तात्या टोपे हें नांव उच्चारलें म्हणजे एक दुर्दम, पराक्रमी व कर्तबगार व्यक्ति डोळ्यासमोर उभी राहते. मराठ्यांचे हे शेवटचे सेनापति. आणि मराठ्यांचा जो सुप्रसिद्ध लढाऊ गुण ' गनिमी कावा ' तो त्यांच्या अंगीं फार उत्तम रीतीनें वसत होता. उगाच वडाची साल पिंपळाला लावण्याकरितां ऐतिहासिक व्यक्तींना अतिशयोक्तीचीं विशेषणें देऊन स्वतःचें समाधान करण्याचा हा प्रकार नव्हे. तात्या टोपे यांचे प्रतिपक्षी जे इंग्रज त्यांनीं त्या वेळीं जीं वर्णनें लिहिलीं आहेत तीं पुराव्याकरितां केव्हांहि ग्राह्य मानलीं पाहिजेत. तात्या टोपे यांना पकडल्याची बातमी कळल्याबरोबर झांशी जिंकणारा इंग्रजी सेनानायक सर ह्यू रोझ यानें एका खाजगी पत्रांत असे उद्‌गार काढले होते कीं, " सर्व बंडवाल्या पुढाऱ्यांत तात्या टोपे यांचे अंगीं विलक्षण धडाडी, कर्तबगारी व दुर्दम इच्छाशक्ति होती, आणि त्यांचें संघटनाकौशल्य तर वाखाणण्यासारखें होतें. "

" Of all the rebel chiefs who acted a part in the rebellion, Tantia possessed the greatest enterprise as regards initiation, and the most enduring resolution in character. His talents for organisation were also remarkable. "

१८५७ सालच्या विद्रोहापर्यंत जसा नानासाहेबांचा उदय झाला नाहीं, तसा तात्या टोपे यांचाहि झाला नाहीं. ब्रम्हावर्तांच्या जहागिरींत नानासाहेबांचें पडेल तें काम खासगी कारभारी म्हणून ते करीत. कानपूरचीं पहिली लढाई होईपर्यंत नानांच्या दरबारीं अजीमुल्लासारख्या मुसलमानांचें



हातघाईची लढाई

प्राबल्य अधिक होतें. पण नंतर सर्व सूत्रें तात्या टोपे यांचे हातीं आली तेव्हां त्यांच्या कर्तबगारीला अधिक वाव मिळाला. कानपूर, ब्रम्हावर्त पडलें तेव्हां त्यांनीं काल्पी हें केंद्र निर्माण केलें आणि जेव्हां काल्पीहि पडली तेव्हां ग्वाल्हेर हस्तगत करून तेथें नव्या राज्याची स्थापना केली ! असा हा मातींतून सुवर्णनगरी उत्पन्न करणारा, निराशेंतून आशेची सृष्टि निर्माण करणारा अजब किमयागार होता ! पुढें ग्वाल्हेर पडलें तेव्हां आशेचा सर्व खेळ आटोपला. लढाईत जय मिळत गेल्यानें सैनिकांत कांहीं तरी उत्साह टिकवितां येतो, पण जय मिळण्याची फाडीमात्र आशा नाहीं अशा दुर्धर स्थितींत धैर्यानें परिस्थितीला तोंड देणें हें फार अवघड आहे ! महाराष्ट्राच्या अंगीं जो विशेष गुण आहे तो म्हणजे ' विपदि धैर्य ' हाच होय. ' अनेक पराजयांनींहि अपराजित ' असलेली तात्यांची बुद्धिमत्ता व विपत्कालचें ' धैर्य ' पाहून विस्मय वाटल्याखेरीज राहात नाहीं. तात्या टोपे यांच्या गनिमी काव्याच्या लढायांच्या हकिगती नवलकथांइतक्या चित्तवेधक आहेत व शेवटची हकीकत तर फारच करुणास्पद आहे.

ग्वाल्हेरच्या लढाईत पराजय झाला तेव्हां मुख्य मंडळी निरनिराळ्या टोळ्या करून अनेक दिशांना पांगली. रामराव गोविंद व रघुनाथसिंग हीं कांहीं माणसांनिशीं झांशीवालीचा मुलगा दामोदरराव उर्फ आनंद याला घेऊन निवाऱ्याच्या आश्रयस्थानाकडे गेलीं. रावसाहेब व तात्या टोपे जावरा, अलीपूरकडे पळाले. बाळासाहेब हे नानासाहेबांबरोबरच या वेळीं अयोध्या-रोहिलखंडांत होते. आतां पळाला सुरवात झाली. राज्यसाधनाचा हेतु व आशा आतां संपलीच होती. प्राणरक्षण हेंच सर्वस्व झालें होतें. १८५८ चे जूनपासून १८५९ चे मार्चअखेरपर्यंत फौजा हाताशीं घेऊन तात्या टोपे भटकत होते. उत्तरेस अलवार तों दक्षिणेस नर्मदेच्या पलीकडे नागपुरापर्यंत, त्याचप्रमाणें पश्चिमेस उदेपूर ते पूर्वेस सागरपर्यंत, एवढ्या टापूंत भिंगरीप्रमाणें दररोज केव्हां चाळीस मैल, तर केव्हां साठ मैल वेगानें त्यांच्या हालचाली सुरू होत्या. तीन हजार मैलांचा हा प्रवास झाला असेल ! इंग्रजांच्या सात आठ फौजा त्यांचेमागें वर्षभर त्यांनीं नाचवत ठेवल्या होत्या. हातीं शस्त्रसंभार नाहीं, सैन्य नाहीं, पैसा नाहीं, मित्र नाहींत, कोणी मातबर पुढारी व सहकारी जाग्यावर उरले नाहींत

अशा बिकट परिस्थितींत, मागें निराशा व पुढें मृत्यु मूर्तिमंत उभा असतांना तात्या टोपे यांनीं गनिमी काव्यानें दहा महिने नुसता धुमाकूळ मांडला होता. एकप्रकारें ती मृत्यूशींच शर्यत होती. लागोपाठ पांच सहा दिवस दररोज चाळीस चाळीस मैलांची मजल मारून, आज या ठिकाणीं तर नंतर अकस्मात् दीडशें मैल दूर, असें इंग्रजांना त्यांचें धूमकेतूसारखें दर्शन घडत असे. त्यांच्या चपळ हालचालींना रसेल यानें 'Forked Lightening' म्हणजे, क्षणार्धांत शाखापल्लवित होणाऱ्या विद्युल्लतेची उपमा दिली आहे. गनिमी काव्याला इतकें समर्पक विशेषण कोणीं क्वचितच दिलें असेल.

असे हे रणशूर तात्या टोपे किती तरी दिवस इंग्रजांच्या हातीं लागले नाहींत. त्यांना पकडण्याकरितां एक लाख रुपयांचें बक्षीस सरकारनें लावलें होतें ! पण सामान्य जनतेपैकीं कोणींहि त्यांचा विश्वासघात केला नाहीं. कोणी कशीहि त्यांना मदत पोंचवी. राजेलोकांकडून जी मदत इंग्रजांना मिळणार नाहीं अशी हरएक मदत त्यांना रानावनांतले शेतकरी आणि वनचर करीत. कारण त्यांना हें माहीत होतें कीं, तात्या लोकांचे पाठीराखे आहेत आणि इंग्रजांशीं ते स्वराज्यकारितां झगडत आहेत !

अखेर सैन्यांतील लोक कंटाळले व निघून जाऊं लागले. सदैव पळणें हेंच जीवन कसें होऊं शकेल ? रावसाहेब पेशवे बरोबर होते. त्यांच्याशीं कुरबूर व अखेर भांडणें होऊं लागलीं. पडता काळ व विनाश यांचें हें निशाणच आहे. अखेर परोणच्या जंगलांत राजा मानसिंहाची गांठ पडली. त्यांनीं दोघांनीं किती तरी गोष्टी केल्या असतील, अनुभविल्या असतील. पण आज त्यांचें काय झालें आणि पुढचे दिवस आतां कसे काय जाणार ? मानसिंह या विचारांत होता व तात्या टोपे यांना तर हा विचार रोजचाच होता. तथापि सिरोंज येथें फौज सोडून देऊन चार दिवस त्यांनीं निवांतपणें मानसिंहाकडे विश्रांति घेण्याचें ठरविलें. नेपिअर व मीड यांचे हाताखालची इंग्रजी फौज या वेळीं परोणपासून अगदीं जवळ, सुमारें अर्ध्या किंवा एक मैलाचे अंतरावरच होती. पण पांच आठवडे तात्या परोणच्या जंगलांत आहेत ही त्यांना कोणींहि बातमी कळविली नाहीं. याचे उलट, तात्यांचे हस्तक व हेर मात्र मीडच्या फौजेंत

होते. त्यांचेकडून तात्यांना बातम्या कळत असत. कदाचित् मानसिंहाकडूनहि कांहीं बातम्या कळत असतील. एरवी पांच आठवडे परोणच्या जंगलांत त्यांना निर्वेधपणें काढतां आले नसते.

पण फितूर खेळविणें हें शस्त्र दुधारी आहे. साप खेळविणारा गारुडी अखेर सर्पदंशानें मरण पावतो त्याप्रमाणें, हेरांचीं सूत्रें नित्य चाळविणारालाहि एखादे वेळीं स्वतःच फितुरांच्या जाळ्यांत अडकण्याची पाळी येते. मानसिंहाकडून अनेक गोष्टी तात्या टोपे ऐकत. पण स्वतः मानसिंह मीड यांचेशीं बोलण्यांत किती पुढें गेला होता व स्वतःची मान त्यानें किती अडकावून घेतली होती हें मात्र त्यानें उघड केलें नाहीं. तात्यांनाहि तो अंदाज आला नाहीं असें दिसतें.

परोणच्या जंगलांत मानसिंहाचा चुलता अजितसिंह व पेंढाऱ्यांचा वृद्ध पुढारी नारायणसिंग यांचे पाठलागावर मीड असतां प्रथम नारायणसिंग त्याचे हातीं लागला. व त्यानें नंतर मानसिंहाचीं बायकामुलें कोठें राहतात तें ठिकाण जनरल मीड यास सांगितलें. नायब कमाविसदार प्रभुलाल याचीहि जनरल मीड यास फार मदत झाली. हीं बायकामुलें इंग्रजांचें हस्तगत झाल्यामुळें मानसिंहहि सहजच गळाला लागला. मीड याला कळून चुकलें होतें कीं,पाठलागांत तात्या टोपे कोणालाहि सांपडणें अशक्य आहे. फितुरीनें सांपडले तर ते सांपडतील. पण तेंहि कदाचित् ! म्हणून त्यानें उगीच एक खडा टाकून पाहण्याचें ठरविलें. मानसिंहाला तो म्हणाला, " तुम्हीं लोकांनीं राजरोस बंड केलें. सरकारनें तुमच्यावर दया तरी आतां करण्याचें काय कारण आहे? तुमच्या मदतीची सरकारला काय पर्वा आहे? स्वतःच्या बळावरच त्यांनीं हें बंड मोडून काढलें." तेव्हां मानसिंहानें आपण राजनिष्ठ राहूं असें गयावया करून सांगितलें. पण या राजनिष्ठेची खात्री काय? जामिनकी कशानें पटविणार? त्यावर मानसिंह म्हणाला, " कृपा करा, हा प्राण तुमच्या सेवेला अर्पण केला आहे असें समजा!"

" त्याची तरी कसली एवढी मातबरी? लष्करांत शिपाई येतात ते प्राणावर उदार होऊनच येतात. लढाईंत कधीं तरी मरावयाचें आहे हें त्यांना कळतच असतें. त्या आशेवर आम्हीं त्यांना पगार देऊन खाऊं

घातलें आणि त्यांनीं बंड मात्र केलें. तें कांहीं नाहीं. यापुढें बंडाशीं संबंध असलेला जो कोणी सांपडेल त्याला फांसावर द्यावयाचें असें आम्हीं ठरविलें आहे. " हें ऐकून मानसिंहाचे पाय अगदीं गळून गेले. तेव्हां मीड त्याला म्हणाला, " तशीच कांहीं महत्त्वाची कामगिरी सरकारची तूं करून देशील तर कांहीं आशा आहे. मग शिफारस करून तुझे प्राण मला वांचवितां आले तर पाहीन ! "

" असें कोणतें तुमचें काम मी करूं ? " असें मानसिंहानें म्हणतांच, मीड यानें युक्तियुक्तीनें तात्या टोपे यांना पकडून देण्याविषयीं आपला मनोदय हळूहळू व्यक्त केला. पण हें काम करण्यास मानसिंह प्रथम मुळींच कबूल होईना. आपणांस कांहींच माहीत नसल्याचा बहाणा तो करूं लागला. ' तेव्हां त्याचें मन वळविण्यास मला महाप्रयास पडले ' असें मीड यानें लिहिलें आहे.

मानसिंहाची व तात्या टोपे यांची परोणच्या जंगलांत गांठ पडली तेव्हां मानसिंह या दुर्धर मनःस्थितींत होता. त्याच्या प्राणांच्या रक्षणाचा मोबदला दुसऱ्याचे प्राण घेऊनच पटावयाचा होता ! व तें सुद्धां रणांगणांत उघड रीतीनें नव्हे, तर विश्वासघात करून !

एक दिवस रावसाहेब पेशवे व फिरोजशहा हे सैन्य घेऊन नजीक आले आहेत असें समजतांच आपण पुनः त्यांना जाऊन मिळावें, असें तात्यांचे मनांत आलें. यावर आणखी दोन-तीन दिवस राहण्याचा मानसिंहानें त्यांना फार आग्रह केला. आजपासून तिसरे दिवशीं मी नक्की येतो असें त्यानें सांगितलें. त्याप्रमाणें रावसाहेबांचे सैन्यास न मिळतां, तात्या त्याचेच घरीं राहिले. मध्यंतरीं मानसिंहानें मीडला सर्व बातमी कळवून शिपायांना बरोबर घेतलें व रात्रीं तात्या त्याचे घरांत विश्वासानें झोपले असतां त्यांना एकदम असावध पकडलें. सावधगिरीनें जवळपासचीं हत्यारें त्यांनीं दूर करविलीं होतीं. न जाणो, वाघाशीं गांठ आहे !

नंतर त्यांना मीडच्या छावणींत नेऊन दाखल करण्यांत आलें. तात्या टोपे याचें वर्णन मीड यानें त्या वेळच्या प्रतिवृत्तांत पुढीलप्रमाणें केलें आहे—

" तात्या टोपे यांना गिरफदार करून आणलें तेव्हां त्यांचेजवळ एक

तरवार, एक कुकरी व ११८ मोहोरा असलेली पिशवी सांपडली. तात्यांना उर्दू, गुजराथी व मराठी भाषा येत होत्या व इंग्रजी केवळ सहीपुरतें येई. त्यांचें वय सुमारें चाळीसपंचेचाळीस, उंची मध्यम–सुमारें पांच फूट, धनुष्याकृति भिवया, काळेभोर डोळे व रेखीव नजर, चेहरा मोठा–दाढीमिशा व कल्ले असलेला, अशी त्यांची भव्य रुबाबदार चर्या होती! बुद्धिमत्तेची झाक व अंगांतील कर्तृत्वशक्ति तोंडावर स्पष्ट दिसत होती. ते तुटक, मोजकें स्पष्ट बोलत. आणि जबानींत जास्त चौकस अगर फाजील प्रश्न विचारला म्हणजे "मालुम नहीं!" अशा दोनच गंभीर शब्दांनीं नकार दर्शवीत."

इंग्रजांच्या हातीं सांपडल्यावर आपलें काय होणार तें तात्यांना कळून चुकलें. आतां निष्कारण चौकशीचा फार्स व कालहरण कशाला? चौकशीची मला इच्छा नाहीं, गरजहि नाहीं. मरणाला मी तयार आहें कोणाहि कुटुंबियांना भेटण्याची माझी इच्छा नाहीं. परंतु माझे वृद्ध वडील आणि कुटुंबीय यांचा मात्र माझेकरितां छळ करूं नये एवढीच त्यांनीं विनंति केली होती.

ता. १५ रोजीं लष्करी कोर्टासमोर त्यांना आरोप वाचून दाखविल्यावर त्यांनीं एक सुसंगत स्टेटमेंट तोंडानें सांगितलें. तें त्यांना वाचून दाखविल्यावर त्यांनीं तें लक्षपूर्वक ऐकून कांहीं ठिकाणीं दुरुस्ती केली व नंतर खालीं 'तात्या टोपे' अशी स्वतःची इंग्रजींत सही केली.

या जबानींत आपण कोणाहि इंग्रजाचा खून केला नाहीं, तसेंच एका नानासाहेबांखेरीज कोणाचाहि हुकूम कधीं मानला नाहीं, या दोन गोष्टी निक्षून सांगितल्या. तात्या कांही 'ब्रिटिश सरकारचे प्रजाजन' नव्हते. तसेंच त्या वेळीं शस्त्रबंदीचा कायदाहि झाला नव्हता. म्हणून या दोन्ही कारणांकरितां त्यांना दिलेली फांशीची शिक्षा कायदेशीर म्हणतां येणार नाहीं, असें विधान मॅलेसन यानें इतिहासांत केलें जाहे व तें बरोबर दिसतें. आणि खरोखरच पुढें कर्नल वुइल्यम्स् यानें कानपुरांत वर्षभर बसून शेंकडों लेखी जबान्या घेतल्या, पण कानपूरच्या दोन्ही कत्तलींत नानासाहेबांचें आगर तात्या टोपे यांचें अंग होतें ही गोष्ट कोणत्याहि पुराव्यानें शाबीत झाली नाहीं.

ता. १८ एप्रिल सन १८५९ रोजीं शिवपुरीस त्यांना फांशी देण्यांत आलें. ‘ शिडीवर ते स्वतः चढले आणि धैर्यानें मान पुढें करून फांसांत त्यांनीं स्वतः अडकावून घेतली ’ असें तेथें हजर असलेल्या प्रेक्षकानें वर्णन केलें आहे. फांस लोंबूं लागल्यावर कांहीं वेळानें लष्करी सैन्यें जेव्हां चालतीं झालीं, तेव्हां शेकडों लोकांनीं तेथें गर्दी करून त्या हुतात्म्याच्या चरणाला स्पर्श केला, आणि मुकाट्यानें अश्रु ढाळीत ती मंडळी घरोघर परतली !



सेनापती तात्या टोपे

महाराष्ट्राच्या इतिहासांत ‘ मराठ्यांचे शेवटचे सेनापति ’ म्हणून तात्या टोपे यांचें स्थान चिरकाल राहील. तात्या टोपे यांच्या उदाहरणावरून, मराठ्यांचे अंगची गनिमीकाव्याची इतिहासप्रसिद्ध परंपरा एकोणिसाव्या शतकाचे अखेरपर्यंत जागृत होती इतकें मात्र उघड दिसून येतें. त्याचें भूषण आजच्याहि मराठ्यांनीं कां मानूं नये ?

* * *

१ वरसईकर गोडसेकृत बंडाची बखर

वरसईकर गोडसे यांनी लिहिलेल्या " माझा प्रवास " या पुस्तका-इतकी सुंदर ऐतिहासिक पुस्तकें मराठी भाषेंत फारच थोडीं आहेत. प्रस्तुत लेखकाने हें पुस्तक अनेकवार चिकित्सक दृष्टीने वाचलें आहे; व खुद्द विष्णुभट गोडसे यांचे वृद्ध व विद्वान चिरंजीव श्री. नानासाहेब यांची गांठ पडण्याचा योग आल्यामुळे ग्रंथकर्त्यांबद्दल पुष्कळ अज्ञात व मनोरंजक माहिती मिळाली. १८५७ सालीं तीर्थयात्रा करून द्रव्य मिळविण्याकरिता विष्णुभटजींनी उत्तर हिंदुस्थानांत प्रवास केला. पण बंडाच्या वावटळींत सांपडल्यामुळे अनेक अद्‌भुत गोष्टी त्यांनी पाहिल्या व अनुभाविल्या. यामुळे ही सर्वच बखर मोठी अद्‌भुतरम्य असल्यामुळे या पुस्तकासंबंधीं व ग्रंथकर्त्यासंबंधी थोडी हकीकत देतों.

१८५७ सालच्या बंडांत पराजय झाल्यामुळे, त्यानंतर सुमारें तीस वर्षें स्थिति फार चमत्कारिक होती. तो प्रसंग पाहिलेलीं अनेक माणसें वावरत होतीं. पण त्यांना या विषयाचें स्मरण नको की बोलणें नको असें झालें होतें. ही बखर देखील बंडानंतर २५ वर्षांनी लिहिली गेली व त्यानंतराहि ती श्री. चिंतामणराव वैद्य यांच्याजवळ सव्वीस वर्षें अप्रकाशित पडून होती. नंतर १९०७ सालीं म्हणजे बंडानंतर अर्ध्या शतकानंतर तें पुस्तक चिंतामणराव वैद्य यांचे नांवाने प्रसिद्ध झालें. नंतर मध्यंतरीं सरकारी लहर लागून कांही दिवस तें पुस्तक जप्त झालें व फिरून निर्बंधमुक्त झालें. आणि आता १८५७ च्या जुन्या हकिकती पूर्णपणें ' इतिहासजमा ' झाल्यामुळे यापुढे तरी ती भीति राहिली नाही. असा हा सर्व अद्‌भुतरम्य इतिहास पाहिला म्हणजे " आंधळ्याच्या गायी देव राखी " या म्हणीची

आठवण झाल्याशिवाय राहत नाही.

१८५७ सालांतील इंग्रजांच्या बाजूचीं पुस्तकें शेंकडो आहेत. पण पेशव्यांची व इकडील लोकांची बाजू सांगणारें, ऐतिहासिक पुराव्याच्या दृष्टीने अस्सल व भाषेच्याहि दृष्टीने सरस असें पुस्तक दुर्मिळच म्हटलें पाहिजे. पेशव्यांचा पराजय झाल्याकारणाने ब्राह्मणांची निंदा करणारांची सद्दी होती. त्यांत इंग्रजांना आमच्याकडील विद्वानांनी हातभार लावला होता! 'ब्राह्मणांनी मेजवान्या झोडून राज्य घालविलें' हें लोकहितवादींचें मत त्या वेळीं समाजांत सुप्रतिष्ठित होतें. विनायक कोंडदेव ओक यांनी लिहिलें होतें की, "ज्यांनी एवढे अनावर कृत्य करून आपली स्वतःची फजिती, हजारों लोकांची इतिश्री आणि स्वदेशाची धूळधाण केली त्यांना कोणी शहाणा मनुष्य शूर किंवा पराक्रमी म्हणेल काय?" तात्पर्य, कोणीहि सभावित अगर विद्वान मनुष्य अशा अवहेलनेनेच लिही अगर बोले. आपला त्या गोष्टीशीं संबंध नाही असे जो तो वर्तन करी. पराकाष्ठा म्हणजे लोक आपापसांत कुजबुजत. अशा स्थितींत पेशवे वगैरे व्यक्तींशी आलेला संबंध बोलून दाखविण्याचें धाडस कोण करणार?

वरसईकर भटजी तीर्थयात्रा आटोपून जिवानिशीं पुनः घरीं परत आल्यावर त्यांनी क्षेत्रसंन्यास घेतला. कारण अर्थलाभाच्या बाबतींत निराशा होऊन ते पक्के दैववादी बनले. "जो बसला त्याचें नशीबहि बसलेंच, आणि जो फिरूं लागला त्याचें भाग्य उदयाला आल्याशिवाय राहत नाही" अशा अर्थाचें एक संस्कृत सुभाषित आहे. पण गोडसे भटजींना द्रव्यार्जनाकरिता अत्यंत कष्ट करूनहि—

मा धाव मा धाव विनैव दैवं ।
श्वा धावमानो लभते न लक्ष्मीम् ॥

असा अगदी विपरीत अनुभव आल्यामुळे, आपलें गांव सोडून मरेपर्यंत आता कोठेहि जावयाचें नाही, असा त्यांनी निश्चय केला. सर्व जन्मांत येणारा अनुभव बंडाच्या अवघ्या दोन वर्षांतच त्यांना आला होता! गोडसे भटजी हे चिंतामणराव वैद्य यांच्या घराण्याचे परंपरागत उपाध्याय असल्याने बंडांत समक्ष पाहिलेल्या अनेक चित्तवेधक हकिकती खासगी रीतीने लिहून देण्याचा वैद्य यांनी गोडसे भटजींना फार आग्रह केला; पण

त्यांनी तो बरीच वर्षें मनावर घेतला नाही. अखेर बंडास २५ वर्षें होऊन गेल्यावर त्यांनी स्वतःची हकीकत लिहिण्यास घेतली, व ही बखर शके १८०५ मार्गशीर्ष शु. ११ स म्हणजे १८८३ सालच्या डिसेंबरांत पुरी केली. या वेळीं विष्णुशास्त्री चिपळूणकरांची निबंधमाला पुरी होऊन स्वकीयांच्या अवहेलनेचें लोकहितवादींचें मत मागे पडलें होतें; इतिहास-संशोधनाला सुरुवात होऊन लोकांत इतिहासाची कांही थोडी आस्था उत्पन्न झाली होती, व काळहि किंचितसा बदलल्याचीं लक्षणें दिसूं लागलीं होतीं; या अनेक गोष्टी गोडसे भटजीच्या मनांत ही बखर खासगी रीतीने लिहून ठेवण्याची प्रेरणा करण्याला कांही अंशीं तरी कारक झाल्या नसतीलच असें संभवत नाही. तथापि तें कसेंहि असलें तरी, ही बखर त्या काळांत कोणी छापून प्रसिद्ध करणें मात्र शक्य नव्हतें. या बाबतींत कै. महादेव चिमणाजी आपटे यांनी गोडसे भटजी हयात आहेत तेथपर्यंत ही बखर छापूं नये असा सल्ला दिला. १८९२-९३ साली कै. पारसनीस हे झांशीच्या राणीचीं चरित्रसाधनें जमा करूं लागले त्या वेळीं त्यांना या बखरीचा सुगावा लागला व निदान चोरून या बखरीचा उपयोग करण्याचें टाळण्यासारखें नव्हतेंच. श्री. चिंतामणरावजी मार्फत त्यांना ही बखर पाहावयास मिळालीहि; तथापि या बखरीचा उपयोग पारसनिसांनी किती मोजका, फार आडपडद्याच्या पडदपोशीने, व लेखकाचें नांवगांव कोठेहि न उच्चारतां कसा केला आहे हें पाहिलें म्हणजे, मूळ अस्सल बखर जशीच्या तशी प्रसिद्ध करण्यांत त्या वेळीं अडचणी किती होत्या हें वाचकांच्या नीट ध्यानांत येईल !

पारसनिसांच्या लक्ष्मीबाईच्या चरित्रांत इंदूरप्रत, ग्वाल्हेरप्रत व उज्जैनप्रत असे तीन ' प्रतींचे ' उल्लेख आहेत. कांही हकिगत त्यांना स्वतः दामोदररावांनी लेखी दिली होती. हीच बहुधा 'इंदूरप्रत' असावी. कै. चिंतामणराव वैद्य त्या वेळीं उज्जैनला न्यायाधीश होते. त्यांच्यापाशीं असलेल्या वरसईकरांचे अस्सल बखरीचा किंवा त्यावरून केलेल्या दुसऱ्या हातप्रतीचा ' उज्जैनप्रत ' असा मोघम उल्लेख पारसनीस यांनी केला आहे. याशिवाय झांशी संस्थानची चांगली माहिती असलेल्या एका ' जुन्या माहितगार ' माणसाकडून एक टांचण रा. सा. माधवराव

व्यंकटेश लेले यांनी घेऊन ठेवलें होतें; त्याचा पारसनिसांनी ' ग्वाल्हेरप्रत ' असा निर्देश केला आहे. याहि माणसाचें नांवगांव किंवा 'प्रत' आज कोठे उपलब्ध नाही. 'प्रत' या शब्दाने वाचकांची कांहीशी दिशाभूल होते. कारण एकाच लिखाणाच्या या प्रती असाव्यात असें सकृतदर्शनी वाटतें; पण तें बरोबर नाही. कारण तिघा व्यक्तींनी स्वतंत्रपणें दिलेली ही हकीकत असेल तर 'प्रत' म्हणण्यांत स्वारस्य नाही. अर्थात् वरसईकरां-प्रमाणें कै. माधवराव लेले यांना माहिती लिहून देणारांचीहि मूळ बखर प्रसिद्ध झाल्यास किंवा सांपडल्यास या विषयावर आणखी प्रकाश पडूं शकेल.

राणी लक्ष्मीबाईचें चरित्र लिहितांना पारसनिसांची दृष्टि विशेष सोवळी होती. वरसईकरांच्या बखरीसारखी विलक्षण हकीकत हातीं पडली असतांना, ती कितीहि खरी व रोमांचकारी असली तरी, इतर इंग्रजी ग्रंथांतील हकिगतीच्या तुलनेने, म्हणजे प्रत्यंतर पुराव्याने जी शाबीत करतां येईल आणि बाहेर जितकें बोललें असतां पचेल तितकीच हकीगत पारसनिसांनी ग्राह्य मानून तिचा पुस्तकांत उपयोग केला आहे. ही दृष्टि अत्यंत शास्त्रशुद्ध असल्याने त्याबद्दल कोणासच कांही आक्षेप घेतां येण्यासारखा नाही. तथापि पारसनिसांच्या या प्रयत्नामुळे असा एक निराळाच फायदा पदरांत पडला की, अनेक इंग्रज लेखकांची हकीगत व वरसईकरांची हकीगत यांत किती तंतोतंत साम्य आहे हें परस्परच दोनहि पुस्तकांतील हकिगती शेजारीं मांडून कोणालाहि पडताळून पाहतां येतें. व वरसईकर गोडसे यांनी बखरींत लिहिलेली हकीगत किती सत्य व विश्वसनीय आहे ही गोष्ट इंग्रजी लेखांच्या प्रत्यंतर पुराव्यानेच शाबीत होते. आता ऐंशी वर्षांनंतर जग इतकें पालटलें आहे की, सत्य ऐतिहासिक गोष्टी पुढे मांडण्यास पूर्वीप्रमाणें भीति राहिली नाही, हें न्या. किंकेड यांच्या लेखावरूनहि दिसेल. पारसनीसकृत चरित्रावरून एवढें मात्र दिसतें की, त्या वेळचा काळ फारच विपरीत व बिकट होता व मनांत प्रकट होणाऱ्या भावना किंवा इतिहासहि शब्दांनी बोलून दाखवतां येत नव्हता. वरसईकर गोडसे भटजींची मूळ बखर व ' माझा प्रवास ' हें पुस्तक तुलनात्मक रीतीने मी पाहिल्यामुळे, ठळक दोन-चार गोष्टी नमूद करतों. विष्णुभट गोडसे यांना इंग्रजी येत

नव्हते व त्यांनी बखर लिहिली तीहि कुग्रामांत बसून; इतर कोणत्याहि पुस्तकाच्या सहाय्यावांचून; बंडानंतर २६ वर्षांनी ! पण त्यांची हकीगत अगदी बिनचूक आढळते हें मोठें नवल आहे. उदाहरणार्थ—

(१) झांशीचा वेढा बारा दिवस चालला असें बखरींत लिहिलें आहे. इंग्रजी इतिहासावरून ता. २३ मार्च ते ता. ३ एप्रिलपर्यंत वेढा चालला. ता. ४ एप्रिलला राणी किल्ल्यांतून निसटली. यावरून वेढ्याचे १२ दिवस अगदी बरोबर जमतात !

(२) ता. १६ जुलै रोजीं कानपूरची लढाई झाल्यानंतर नानासाहेब ब्रह्मावर्तास जाऊन रात्रीं गंगापार झाले, ही हकीकत शेरिअरच्या टिपणां-वरून के याने दिली आहे. (के–Kaye–खंड २–३९०) ती आणि गोडसे यांनी दिलेली हकीकत तुलना करून पाहण्यासारखी आहे. ('माझा प्रवास ' पृ. ३७–३८ पाहा.)

(३) इंग्रजांनी ग्वाल्हेर घेतलें असतां राजवाड्यांत सर्व बंडखोर जमा झाले होते. तेव्हा सर रिचर्ड मीड याने तोफा न डागतां एकट्याने पुढे जाऊन बंडखोरांशीं बोलणें केलें व राजवाडा ताब्यांत घेतला. हें काम फारच धोक्याचें असल्याने मीड याला व्हिक्टोरिया क्रॉस द्यावयास पाहिजे होता, असें थॉर्नटन याने त्याच्या चरित्रांत लिहिलें आहे. रावसाहेब पेशवे यांनी ग्वाल्हेर घेतल्यावर झांशीवालीनेहि असाच एकटीने ग्वाल्हेरच्या राजवाड्यांत प्रवेश केला. व " वाड्यांत कपट नाही, तुम्ही आता खुशाल यावें " असा पेशव्यांस निरोप पाठविला. (' माझा प्रवास ' पृ. ११७) अशा साक्षेपी हाकिकतीमुळे इंग्रज ग्रंथकारांइतकें साहजिकच या बखरीस महत्त्व द्यावें लागतें. असे तुलनात्मक प्रसंग पुष्कळ दाखवितां येतील. पण ते सोडून देऊन कांही इतर गोष्टींचा निर्देश करतों.

नानासाहेब बंडात कसे सामील झाले ही हकीकत, ' माझा प्रवास ' पृ. २६ व २७ यांत छापलेली आहे, ती मूळ बखरींत नाही ! पण ती चिंतामणराव वैद्य यांनी विष्णुभटांनी सांगितलेल्या हकीगतीवरूनच लिहिली असेल असें दिसतें. त्याचें एक निश्चित गमक हें की, त्यांत रामचंद्रशास्त्री साठे याचें जें नांव आलें आहे तें कोणत्याहि इंग्रजी पुस्तकांत नाही. विष्णुभट पुष्कळ हकिगती सांगत असत. असें होऊं शकतें की, लिहितांना

त्यांतलें कांही गळतें. अगदी पूर्वी जसें बोललें गेलें तसेंच बोलणाराहि स्वतः फिरून लिहूं शकत नाही ! याचीं उदाहरणें एक दोन सांगतों. (१) " हिंदु धर्माकरिता व हिंदु राज्याकारिता पुनः एकवार झटलें पाहिजे. " तसेंच (२) " जगदीशा ! आज दीडशें वर्षें वैभव भोगून त्या पेशवाईचा लय झाला. " हीं नानासाहेब याच्या तोंडीं घातलेलीं सुंदर वाक्यें मूळ बखरींत सापडत नाहीत. या गोष्टी तोंडाने सांगतांना विष्णुभटांनी हें वर्णन खचित केलें असेल व त्यावरून चिंतामणरावांनी 'माझा प्रवास' या पुस्तकांत जोडलें असेल. हें पुस्तक लिहितांना, आपण 'दुर्दैवी रंगू' कादंबरी लिहीत नाही, एका 'ऐतिहासिक' टिपणाचें संपादन करीत आहों, त्यांत स्वतःचे किती शब्द घालावे, कोणते व किती काढावे या जबाबदारीची जाणीव चिंतामणरावजींना फारच चांगली होती, यांत शंका नाही.

या पुस्तकांत क्रमविपर्यासाच्या चुका फार तर दोन किंवा तीनच आढळतात, त्या 'माझा प्रवास' पुस्तकाच्या टीपेंत नमूद आहेत. बखरींतून गाळलेला मजकूर म्हणजे (१) झांशीचे गंगाधरराव यांच्याबद्दल प्रवाद (२) बाणपूरचा राजा येऊन त्याने झांशींतील फितूर उघडकीला आणला ती हकीकत (३) भुलाजीसिंग परदेशाने प्रत्यक्ष फितूर शेवटच्या दिवशीं केला ती हकीकत (४) तसेंच यात्रेहून परत येताना एका गौड ब्राह्मणाचे घरीं चारित्र्यास कलंक लागण्यासारखा प्रसंग त्यांचेवर येत होता, पण त्यांतून ते निष्पाप बाहेर कसे पडले ही व्यक्तिविषयक हकीकत, इतक्या गाळलेल्या आहेत. झांशीच्या लक्ष्मीबाईच्या लग्नासंबंधी हकीकत बखरींत दुसऱ्या प्रकरणांत आहे ती चिंतामणरावजींनी झांशी-प्रकरणांत योग्य ठिकाणीं जोडून घेतली आहे. मूळ बखरींत लक्ष्मीबाईसंबंधाने " स्वतंत्रता जरी होती तरी बाईने गैरशिस्त आचरण केलें नाही. शिकारीच्या शोका-मुळे गैरवाजवी वागणूक होत नसे हें खरें आहे " अशी विष्णुभटाने ग्वाही दिली आहे. हीं वाक्येंहि 'माझा प्रवास' या पुस्तकांत गळालेली आहेत.

झांशीवालीच्या मुलास नेपाळांत पोंचविण्याबद्दल ठरलें होतें असें बख-रींत लिहिलें आहे तें चूक आहे. एखादी गोष्ट व्हावी असा समज किंवा

अपेक्षा, व प्रत्यक्ष ऐतिहासिक घडलेली गोष्ट, यांत कशी तफावत जाणत्यांच्या हातूनहि होते याबद्दल इतिहासकार के याने दुसऱ्या खंडाच्या प्रस्तावनेंत मार्मिक विवेचन केलें आहे, तेंच येथेहि लक्षांत ठेवण्यासारखे आहे. अमुक एका प्रसंगासंबंधी खात्रीलायक ग्वाही अमुक मनुष्य देईल असें समजल्यावरून इतिहासकार के याने एका गृहस्थाला लिहिलें. त्याने त्याला असें कळविलें की, त्या वेळीं ती गोष्ट घडली असा माझा जरी पक्का समज होता, तरी ती गोष्ट प्रत्यक्ष घडलेली नव्हती असें पुढे मला कळलें व तेंच आता मी खरें मानतों. पुष्कळदा इष्टचिंतन हें मनाला इतकें खिळलेलें असतें की, तसेंच घडलें असें मनुष्य मानीत असतो.

" He then told me that it was not an accomplished fact, but an intention unfulfilled."

तसेच येथेहि कसें घडलें पाहा. झांशीवालीच्या मृत्यूनंतर तिच्या पोरक्या मुलाची नानासाहेबांनी काळजी करावी हें इष्टचिंतन किंवा अपेक्षा; पण ' तसेंच ठरलें होतें ' असें त्यानें बखरींत लिहिलें ही मात्र ऐतिहासिक चूक !

असो. गोडसे भटजींच्या पुस्तकासंबंधाने इतकेंच म्हणतां येईल की, १८५७ च्या विषयासंबंधाने पुढे कोणी यथार्थ पुस्तक लिहील, किंवा अधिक साधनें उपलब्ध होतील, त्या वेळीं या बखरीची खरी किंमत लोकांस अधिक समजेल. कीर्ति ही चीज अशी आहे की, सर्वांनाच ती हयातींत लाभते असें नाही. पण शंभर वर्षांनी कां होईना, ती मरणोत्तर लाभली तरी ती कीर्ति नाही असें नव्हे ! बाजूला पडलेल्या लेखकांचाहि उदयकाळ कधी तरी येतोच ! (सह्याद्रि, मे १९४४)

* * *

परिशिष्ट

(१)

धर्मासाठीं सर्वांची आशा सोडली

महाराणी लक्ष्मीबाईबद्दल 'माझा प्रवास' या छापील पुस्तकांत एक सुंदर आठवण आली आहे. पुराव्याच्या कायद्याचे कसोटीनें त्यांतले शब्द अस्सल म्हणजे पहिल्या प्रतीच्या किंमतीचें आहेत. पण दुसऱ्या एका दृष्टीने त्यांतील शब्द मोत्यांच्या सराप्रमाणें बहुमोल वाटतात. कारण "**हिंदु धर्माचा अभिमान धरून या कर्मास मी प्रवृत्त झालें**; आणि त्या करिता वित्ताची, जीविताची, सर्वांची आशा सोडली" असे महाराणी लक्ष्मीबाईचे स्पष्ट शब्द त्यांत नमूद आहेत. हेतूचा पुरावा याहि दृष्टीनें या शब्दांचें महत्त्व असल्यानें, गोडसे भटजींच्याच शब्दांत ही हकीगत पुढें दिली आहे:—

काल्पीचा रस्ता धरल्यानंतर दर मजल जातां जातां एके दिवशीं सायंकाळीं एका खेडेगांवीं वस्तीस पोचलों. काल्पी सुमारे सहा कोस राहिली होती. गांवाबाहेर चिंचेची झाडी आहे तेथें स्वयंपाक तयार करून भोजनें झाल्यावर स्वस्थ निद्रा केली. पहांटेच्या प्रहर रात्रीच्या सुमारास एकाएकी मोठा गलका झाला. त्यासरसें उठून पहातों तों शेंकडों स्वार रस्त्यावर उधळत चालले आहेत असें दृष्टीस पडलें. हें काय अरिष्ट आलें आहे याची कल्पना होईना. तसेंच घाईघाईनें आपलें सामान गुंडाळून खांकोटीस मारून शिपाई लोकांच्या बरोबरीनें पळ काढूं लागलों. कांहीं वेळानें असें समजलें कीं, पेशव्यांची व इंग्रजांची चरखारीवर लढाई होऊन त्यांत पेशव्यांचा मोड झाला. त्यांत झांशीवाली राणीहि होती. ती फौज परत काल्पीवर चालली आहे. मग आम्हीं किंचित् स्वस्थ होऊन झुंजुमुंजूचे सुमारास एका विहीरीवर पाणी काढून शौचमुखमार्जन करण्यास बसलो, तों पांच चार स्वार विहीरीवरून जात होते, त्यांत झांशीवाली दृष्टीस पडली. तिनें सर्व पठाणी पोशाख केला होता व सर्व अंग धुळीनें भरलें होतें. तोंड किंचित् आरक्त असून म्लान व उदास दिसत होतें. तिला फार लागली असल्यानें घोड्यावरून तिने तुम्ही कोण आहां असा

प्रश्न केला. तेव्हां आम्ही पुढें होऊन हात जोडून विनंति केली कीं, आम्ही ब्राह्मण आहों. आपणांस तृषा लागली असल्यास पाणी काढून देतों. बाईसाहेबांस ओळख पटली व त्या खालीं उतरल्या. मी रस्सी व मडकें घेऊन लागलींच विहिरींत सोडणार तों बाईसाहेब म्हणाल्या कीं, तुम्ही विद्वान ब्राह्मण, तुम्ही मजकरतां पाणी काढूं नका. मीच काढून घेतें! हे तिचे उदारपणाचे शब्द ऐकून मला फार वाईट वाटलें; परंतु निरुपायास्तव रस्सी व मडकें खालीं ठेवलें. बाईसाहेबांनीं पाणी काढून त्या मृण्मय पात्रांतून ओंजळीनें पाणी पिऊन तृषा हरण केली. दैवगति मोठी विचित्र आहे. नंतर मोठ्या निराश मुद्रेनें बोलल्या कीं, "मी अर्धा शेर तांदुळाची धनीण, मजला विधवेला



झांशीवाली महाराणी

विधवाधर्म सोडून हा उद्योग करण्याची कांहीं जरूरी नव्हती. परंतु हिंदुधर्माचा अभिमान धरून या कार्यास प्रवृत्त झालें. व याजकरितां वित्ताची, जीविताची, सर्वांची आशा सोडली. आमच्या पदरीं पातकच फार म्हणून ईश्वर यश देत नाहीं. चरखारीवर मोठी लढाई झाली. परंतु आम्हांस यश आलें नाहीं. काल्पीवरहि इंग्रज चालून येत आहे. तेथे थोडक्यांतच जंग होईल. जें अदृष्टांत लिहिलें असेल तें होईल!" असें म्हणून बाईसाहेब उठल्या, आम्हीहि उभे राहिलों. इतक्यांत आठवण होऊन आम्हांस विचारलें कीं, "तुम्ही गरीब भिक्षुक ब्राह्मण, तुम्हांस घोड्यावरहि बसतां येत नाहीं. काल्पीस काय हेतु धरून जात आहां?" असा प्रश्न करतांच आम्हीं सांगितलें कीं, "काल्पीस दाक्षिणी ब्राह्मण पुष्कळ

आहेत; त्यांपासून दक्षिणा मिळेल ती मिळवून यमुना उतरून गंगास्नानार्थ ब्रह्मावर्त क्षेत्रीं जाणार आहों.'' "बरें आहे. काल्पी गुदामांत यावें" असें म्हणून बाईसाहेब चालत्या झाल्या.

(माझा प्रवास पृ. ९५)

(२)

श्रीगंगामातुश्री यास साक्ष आहे

एके दिवशीं संध्याकाळच्या सुमारास घाटावर संध्येस निवडक मंडळी बसली आहेत, तों एक पलटणी अम्मलदार, फेसाने भरलेला घोडा भरधांव टाकीत घाटावर आला व नानासाहेबांस मुजरा करून बोलूं लागला की, "सरकार, मीरत येथील छावणींतील लोक धर्मभयास्तव उठून इंग्रज लोकांस ठार मारून दिल्लीस जाऊन त्यांनी बादशहास अधिपतित्व दिलें. हिंदुधर्मावरहि तोच कठीण प्रसंग आला आहे व शिपाई लोकहि धर्मासाठी मरूं, परंतु बेधर्मी होणार नाहीं असें दृढनिश्चयाचे आहेत; हिंदुधर्मास तर आपल्याशिवाय अधिपति राहिला नाही. जर हिंदूंचें आधिपत्य स्वीकारावयाचें असेल तर ह्या क्षणीं कानपुरावर ही तलवार व हा घोडा घेऊन चला.'' हा अकल्पित प्रसंग पाहून शास्त्रीबोवादि मंडळी घाबरून जागच्या जागीं शून्यदृष्टि बसली. नानासाहेब किंचित् आरक्त नेत्र होऊन त्या स्वाराकडे सारखी टक लावून कांही वेळ स्तब्ध राहिले. शेवटीं एकाएकी ते म्हणाले की, "बरें आहे, जर हजारों लोक धर्मासाठी मरून जाण्यास तयार आहेत तर मीहि आपल्या बायकापोरांची आशा सोडतों. यास गंगामातुश्री साक्ष आहे.'' असें म्हणून घोड्यावर बसून आवेशाने घोडा फेकला. वाड्यांत येऊन बाळासाहेब इत्यादिकांस मजकूर निवेदन केला व लागलीच आपल्या बरोबरचे लोक घेऊन कानपूरचा रस्ता धरला.

(माझा प्रवास, पृ. २७)

* * *

१० समस्यापूर्ति

[१८५७ च्या संग्रामाचीं खरी समस्यापूर्ति सुभाषसेनेच्या उठावणीमुळें झाली. या बलिदानांतील ती शेवटचीं पूर्णाहुति म्हणावयाची. पुढला लेखांत १८५७ चे बंड व सुभाषसेनेचें बंड यांतील साम्य-विरोध कोणती हें दाखविलें आहे. यांतील प्रथमार्ध (१) ती. न. चिं. केळकर यांनीं लिहिला असून, उत्तरार्ध (२) प्रस्तुत लेखकानें लिहिला आहे. सदर लेख सह्याद्रि मे १९४६ मध्यें प्रासिद्ध झाला होता. —लेखक]

(१)

१८५७सालानंतर हिंदुस्थानांतील ब्रिटिश सत्तेविरुद्ध हत्यारी उठावणी अशी मोठ्या प्रमाणावर झाली ती १९४३-४४ सालीं. तथापि या दोन उठावण्यांमध्ये कांही बाबतींत सारखेपणा तर कांहीत वेगळेपणा आहे तो ध्यानांत आणणें अवश्य आहे. तेव्हाची उठावणी मुख्यतः सरकारी सैन्यांतील सैनिकांची होती व आताचीहि मुख्यतः तशीच. तेव्हां सैनिक शिपाई नसलेले कांही लोक (प्रथम नव्हे पण पुढे त्या उठावणींत सामील झाले. आताहि तेंच घडलें. तेव्हा त्या लढाऊ लोकांच्या हातांत सर्वस्वीं सरकारी हत्यारें, बंदुका, तोफा, दारुगोळा होता. आताच्या उठावणींत प्रथम सरकारी सामान होते. पण पुढें त्यांत जपानी सरकाराकडून मिळालेल्या सरंजामाची भर पडली. तेव्हाच्या उठावणींत हिंदु व मुसलमान मिळून लढले. आताच्या उठावणींतहि तशीच जूट होती. हिंदु-मुसलमानांची तेव्हाची जूट जातिभावनाविरहित होती, तशीच आताचीहि होती. ही जूट अखेरपर्यंत किती टिकते हें पाहण्याची वेळ तेव्हा आली नाही, तशीच ती आताहि आली नाही. त्या जुटीने तेव्हाचें राजकीय उद्दिष्ट पदरांत पडलें

नाही. आताहि तसेंच झालें. त्या उठावणींत शेंकडों हजारों लोकांची कत्तल झाली. तितकी आता झाली नाही, कारण उठावणी झाली तरी युद्ध असें थोडें झालें. तेव्हा मृत्यूशिवाय दुसरी शिक्षाच सहसा दिली गेली नाही. एक समोर दिसला की गोळी घालीत, नाहीतर पकडून फासावर चढवीत. आता पकडलेल्या बऱ्याच लोकांना नुसते कैदी म्हणून वागविण्यांत आलें. तेव्हा कोर्ट मार्शलकडून चौकशा झाल्या; परंतु तो नुसता नाटकी देखावा होता. आता चौकशा होत आहेत, होतील, त्या अधिक रीतसर व बचावाच्या कायदेशीर तजविजीने होत आहेत. तेव्हा गोऱ्या लोकांच्या कत्तली हत्यारी उठावणीदार लोकांनी केल्या तशा या दुसऱ्या उठावणींत घडलें नाही. यामुळे तेव्हा माफी अशी थोड्याच लोकांना मिळाली, पण आता बहुसंख्य उठावणीदारांना माफी दिली जाईल, फार थोड्या लोकांना देहान्त शिक्षा दिली जाईल, वा न जाईल; व कांहींना कैदेची शिक्षा होईल.

पण यापलीकडे जाऊन वेगळेपणाच्या दोन तीन महत्त्वाच्या अशा बाबी उरतात त्यांचा विचार करण्यासारखा आहे. (१) १८५७ची उठावणी झाली तिला कोणाहि परराष्ट्राची सहकारिता नव्हती. आताच्या उठावणीला जपानी शत्रुराष्ट्राची सहकारिता प्रथम तरी बरीच लाभली. पण (२) तेव्हा व आता यांत मुख्य फरक पडला तो हा की, तेव्हाच्या उठावणीला जीं दोन तीन कारणें घडलीं तीं आताच्या उठावणीला नव्हतीं. पूर्वींचीं कारणें मुख्यतः तीन (१) स्वतः हिंदी सैन्यांतील लोकांमधील महत्त्वाकांक्षा व मानापमान यांसंबंधी असंतोष (२) धर्मभ्रष्टतेची भीति आणि (३) व्यक्तिशः स्वार्थविषयक निराशा पदरीं पडलेल्या मातबर, स्वार्थी लोकांना आपल्या हानीमुळें आलेला त्वेष व चेव.

परराष्ट्रीय मदतीच्या दृष्टीने पाहतां १८५७ च्या बंडाला तशी मदत कोणतीच झाली नाही. पूर्वीं हिंदुकुशपलीकडील इराणी–अफगाणी लोक अलीकडे येऊन एखादे वेळ दिल्लीपर्यंत स्वाऱ्या करीत, त्यांतील कांही लुटीकरिता होत असत. नादिरशहाची स्वारी अशा प्रकारची होती. परंतु कांही दिल्लीच्या मोंगल बादशहाला साहाय्य करण्याच्या मिषानेहि केव्हा होत; परंतु पानपतानंतर अहमदशहा अबदल्ली स्वदेशीं गेला तो फिरून

इकडे आला नाही. १९ व्या शतकाच्या अखेरीस दिल्लीकर बादशहाला कोणी आपल्या ताब्यांत ठेवावें याविषयी मराठे व इंग्रज यांच्यामध्यें स्पर्धा सुरू होती; परंतु या दुहेरी संकटांतून सोडविण्याकरिता दिल्लीचा बादशहा किंवा त्याची मुसलमान प्रजा हिने उत्तरेकडून कोणा परक्या राष्ट्राला वा सरदाराला आपल्याला साहाय्य करण्यास बोलाविल्याचें इतिहास सांगत नाही. त्या शतकांत मराठ्यांनी फ्रेंचांशीं कारस्थान चालविलें होतें तें मात्र इंग्रजांना घालवून देण्याकरिता होतें. यापूर्वी इंग्रज व्यापाऱ्यांना डच पोर्तुगीज हे शत्रू प्रतिस्पर्धी होते. पण यांपैकी डच लोक पूर्वआशियाकडे वळले व हिंदुस्थानाकडे त्यांनी पाठ फिरविली. पोर्तुगीजांनी हिंदुस्थानांत सर्वांच्या आधी पाय रोवला व तो फ्रेंच, डच यांच्यापेक्षा आधिक टिकविला तथापि इंग्रज पुढे सरसावल्यापासून ते हतप्रभ झाले व इंग्रजांप्रमाणे त्यांचा हात दिल्लीच्या राजकारणांत कधीच शिरूं शकला नाही. बंडाच्या सालीं गोवा, दीव, दमण या ठिकाणीं पोर्तुगीज राज्य होतें, तसेच पॉंडिचरी येथे फ्रेंचांचा अंमल होता. परंतु या परदेशीय लोकांकडून मदत मागण्याची कल्पना बंडवाल्यांना सुचल्याचे इतिहास सांगत नाही.

हिंदुस्थानाबाहेर एकच संस्थानिक बंडवाल्यांना मदत करण्यासारखा होता. तो नेपाळ-नरेश; परंतु त्याने बंडवाल्यांना साहाय्य केलेंच नाहीं; पण उलट इंग्रजांनीं त्याजकडे मदत मागण्याच्या आधींच त्यानें आपण होऊन इंग्रजांना मदत म्हणून आपलें सैन्य देऊं केलें. हेन्री लॉरेन्स व कॉलिन कॅम्बेल यांनीं या कुमकेचें स्वागत केलें. परंतु कलकत्त्याच्या बड्या लाटाच्या मनाची या बाबतींत डळमळ झाली. त्यामुळें तराई उतरून आलेली गुरख्यांची पलटण प्रथम परत पाठविण्यांत आली; पण एक महिना फुकट गेल्यावर नेपाळनरेशाच्या मदतीचा स्वीकार करावा असें ठरून तीन हजार गुरखा शिपायांना पुनः तराई उतरून अलीकडे आणविलें. खुद्द हिंदुस्थानांतल्या संस्थानिकांपैकीं एकानेंहि बंडवाल्यांना मदत केली नाहीं. संस्थानी सैन्य बंडवाल्यांना साहाय्य करण्याला मनांतून तयार होतें, आणि इंग्रजांच्या कुमकेला पाठविलेल्या संस्थानी फौजेपैकी कांहीं सैनिकांनीं फितुर होऊन दगा दिला. संस्थानी सैन्यांतील या बेदिली-मुळें शिंदे व होळकर यांना आपण कसे बचावतों याचीच चिंता उत्पन्न

झाली. या वेळीं शिंदे २३ वर्षांचे व होळकर १६ वर्षांचे होते. यामुळें त्यांचे दिवाण करतील तें होईल अशी स्थिति होती. परंतु शिंद्यांचे दिवाण दिनकरराव राजवाडे व होळकर नरेशाची म्हातारी आजी यांनीं नेट धरून बंडवाल्यांकडे जातील ते शिपाई नाईलाजानें जाऊं दिले, पण उरले त्यांच्या साहाय्यानें स्वतःचेंच काय पण आश्रयार्थ आलेल्या गोऱ्या अधिकाऱ्यांचें व त्यांच्या बायकामुलांचें संरक्षण केलें. धार व देवास यांची स्थितीहि अशीच. रजपुतान्यांतील १७ संस्थानांत तर ग्वाल्हेर-इंदूरप्रमाणें संस्थानी शिपायांनीं किंवा प्रजेनें प्रथमपासून शांतताच राखली.

यामुळें अगदी मध्यवर्ति असा सुमारे एक लक्ष चौरस मैलांचा टापू संभाळला गेला; व शिवाय इंग्रजांना उलटी थोडीबहुत कुमकच झाली. सगळा पंजाब म्हणजे मुसलमानी संस्थानांचा मुलुख पूर्णपणें शांत राहिला. इंग्रजांविरुद्ध लढविण्याला इंग्रज फितुर तर राहोच; पण हिंदुस्थानांतला एखादा फ्रेंच अगर पोर्तुगीजहि मिळाला नाही. याच्या उलट हिंदी लोकांच्या राष्ट्रीय बुद्धींत अशी उणीव दिसून आली की, नेपाळच्या गुरख्यांनी व पंजाबच्या शीखांनी खुशाल दिल्लीच्या बंडवाल्या मुसलमानांवर त्यावर चालविलें. आणि हैद्राबादच्या मुसलमान पलटणींनी दिल्लीवर चालून जाण्याचें नाकारलें, तरी कानपूरच्या हिंदु बंडवाल्यांचा यथास्थित समाचार घेण्यास त्यांनी कमी केलें नाही !

(२)

राष्ट्रीय संकटाच्या बाबतींत नेहमी सर्वसामान्य मनुष्याची जी राष्ट्रीय भावना व स्वार्थत्यागाची तयारी असते, तीच निर्णायक ठरते असें खुशाल समजावें. याचीं बंडांतीलच दोन तीन ठळक उदाहरणें देतां येतील. या बंडाच्या वेळीं प्रत्येक इंग्रजाने आपल्या राष्ट्राकरिता कमालीचा स्वार्थत्याग दाखविला. त्यांचें धैर्य, नेतृत्व, शिस्त आणि संघटना ही बंडवाल्यांपेक्षा निःसंशय सरस होती. बंडवाल्यांत एकहि पुढारी असा नव्हता की, ज्याचा शब्द सर्वजण मानतील किंवा जो अनेक ठिकाणचीं लष्करें एकत्र जमवून लढाई देऊं शकेल. दिल्लीसमोरच्या टेकडीवर इंग्रज तीन महिने तळ देऊन होते. दिल्लींत चाळीस हजार सैन्य असूनहि ही एक टेकडी कांही मुसलमानांना सर करतां आली नाही ! अखेर कांही फितुरी होऊन

बखतखां खुशाल तीस हजार सैन्य घेऊन यमुनेच्या पुलावरून निघून गेला तेव्हां दिल्लीचा सहजच पाडाव झाला. दुसरें उदाहरण कानपूरचें. कानपूरला अगदी उघड्या बराकींत जनरल व्हीलरजवळ सुमारें एक हजार इंग्रज लोक होते. त्यांतहि तीन-चारशें बायकामुलेंच होतीं. बाहेर संरक्षणाला नांवाला वाळूची एक भिंत होती. ती चार फूट देखील उंच नसेल ! उलट नानासाहेबांजवळ इंग्रजांकडूनच हस्तगत केलेले मॅगेझीन व त्यांतील अगणित शस्त्रास्त्रें होतीं. पण चोवीस दिवस मारा करून देखील ही भिकार छावणी बंडवाल्यांना घेतां आली नाही ! यांत खरोखर कोणाचें कौतुक करावें हें वाचकांनीच ठरवावें. एका इंग्रजाने त्या वेळीं उघड म्हटलेंहि की, "या बायकामुलांच्या कारणाने आम्ही आज अडचणींत आलों. पण आमच्या जागीं छावणींत हे बंडवाले असते आणि आम्ही बाहेर असतों तर, चोवीस दिवस कशाला एका तासांत ही छावणी आम्ही सर करून दाखविली असती !" लखनौच्या वेढ्याची गोष्ट अशीच आहे. साऱ्या शहराविरुद्ध मूठभर इंग्रज रेसिडेन्सींत कोंडले गेले होते. पण शरण न जातां धैर्याने झगडत होते. अखेर अवघ्या अठराशें सैनिकांनिशी हॅवेलॉक याने हा वेढा फोडून त्यांची सुटका केली. यांतहि इंग्रज अल्पसंख्य म्हणून त्यांचेंच कौतुक करावें लागतें. इंग्रजांची फौज परदेशांत अडकली होती किंवा येथेंच लांब होती ती वाट चालूं लागेपर्यंत इंग्रजांनी कांही दिवस फार संकटांत काढले. पण त्यांचा आत्मविश्वास फार जबर होता. मुंबई, मद्रास, कलकत्ता, लंडन हें तारायंत्र सुरू होऊन फौजा चालूं लागतांच, हा लढा आम्ही हरूं असें इंग्रजांना चुकून देखील वाटलें नाही. त्या वेळच्या इंग्रजी अधिकाऱ्यांतील प्रमुख माणसें म्हणजे आग्र्यास कोलविन, ग्वाल्हेर येथे मॅकफर्सन, लखनौ येथे सर हेनरी लॉरेन्स, मुंबईस एलफिन्स्टन, पंजाबांत सर जॉन लॉरेन्स व त्याचे सहकारी, हीं माणसें अशी खबीर होतीं की, चोवीस तासांत राजकारणाचें सूत्र त्यांनी क्षणभर देखील दृष्टीआड केलें नाहीं. या कर्तव्यनिष्ठेमुळेच अखेर बंडवाल्यांवर प्यादेमात झाली. तात्या टोपे, कुंवरसिंग, झांशीवाली लक्ष्मीबाई यांच्यांत व्यक्तिशः लष्करी चातुर्याचे गुण फार नांवाजण्यासारखे होते. पण हे अपवाद सोडले तर त्या वेळच्या सामान्य इंग्रज मनुष्याला जी राष्ट्रीय बुद्धि होती त्यापेक्षां


आमच्याकडील सामान्य मनुष्याची राष्ट्रीय बुद्धि कमी पडली म्हणूनच अखेर अपयश आलें हें नाकबूल करून कसें चालेल ?

१८५७ च्या बंडांतील परराष्ट्रीय मदतीसंबंधानेहि एक मुद्द्याची गोष्ट येथे सांगण्यासारखी आहे. १८५६ सालीं रशिया व इंग्लंड यांचें सेबॅस्तेपूल व क्रीमिया येथे युद्ध चाललें होतें. त्या वेळीं नानासाहेबांतर्फे विलायतेस मुखत्यार म्हणून गेलेला अजीमुल्ला, तसेंच अयोध्येच्या वाजीदअलीचा वकील महंमदअलीखान, ही शिष्टमंडळी मुद्दाम कान्स्तांतिनोपलला गेली असतां रशियन वाकिलाने त्यांची गाठ घेतली आणि हिंदुस्थानांत बंड झालें तर रशियाकडून मदत होईल असें आश्वासन दिलें. पुढे १८५७ सालीं चीन व पार्शिया यांच्याशीं इंग्लंडचें युद्ध सुरू होऊन हिंदुस्थानांतलें पुष्कळ लष्कर बाहेर न्यावें लागलें. काडतुसांचें प्रकरण १८५७ च्या जानेवारींत उद्भवलें तेव्हा बंडाला परराष्ट्रांची मदत मिळेल ही पुढाऱ्यांची अटकळ बरोबर होती. पण मार्चमध्ये बाहेरील सर्वच युद्ध थांबून पॅरिस येथे चीन व पर्शिया यांच्याशीं तसेंच इंग्लंडचा रशियाशीं तह होऊन परराष्ट्रीय मदतीची आशा बंद झाली. मग बंड कोणाच्या जीवावर करावयाचें ? ता. ३१ मे ही उठावणीची तारीख ठरलेली असतां १० मेलाच बंडाची सुरवात झाली ! याचा अर्थ, बंडाला सुरवात करण्यासंबंधानेच जाणत्या पुढाऱ्यांचा अनुयायांशीं मतभेद असावा असें दिसतें. नानासाहेब वगैरे मंडळी प्रथम बंडांत पडण्याला नाखूष होती.

परराष्ट्रीय मदतीबद्दल सुभाषबाबूंचें एक वाक्य अगदीं मनन करण्यासारखें आहे. " गेल्या दोन शतकांतला जगाचा इतिहास मी काळजीपूर्वक वाचला आहे. विशेषतः स्वातंत्र्याच्या लढ्याचें मी अध्ययन केलें आहे. त्यांत परराष्ट्रांच्या साहाय्याशिवाय स्वातंत्र्य मिळाल्याचें एकहि उदाहरण मला आढळलें नाहीं " असें त्यांनी स्पष्ट लिहिलें आहे. सुभाषसेनेच्या उठावणींत व १८५७ च्या बंडांत मुख्य फरक असा आहे की, इंग्लंड परराष्ट्रीय युद्धाच्या पेचांत संकटांत असतां सुभाषसेनेने उठाव केला. १८५७ सालीं मेमध्ये जेव्हा बंड झालें त्या आधी दोन महिने पॅरीस येथे तह होऊन परराष्ट्रीय राजकारणांत सर्वत्र सामसूम झालें होतें !

१८५७ च्या चळवळीला अपयश आलें असलें तरी तें अपयश इतकें

थोर होतें की, शंभर वर्षांनंतरहि सुभाषबाबूंसारख्या देशभक्ताला त्यापासून स्फूर्ति मिळावी. ब्रह्मदेशांत त्यांनी केलेलीं पुष्कळ भाषणें रंगून येथे बहादुरशहाच्या कबरीसमोर केलीं व त्यांत " १८५७ च्या अपयशाचा व रक्ताचा आम्ही सूड घेऊं " असें आग्रहाने प्रतिपादिलें होते. १८५७ च्या संघटनेपेक्षां सुभाषबाबूंची संघटना किती तरी मोठी व प्रभावी होती. आझाद हिंद सरकार हें स्वतंत्र सरकार असल्याची मान्यता जपान व जर्मनी यांनीच दिली होती असें नव्हे तर जगांतल्या नऊ स्वतंत्र राष्ट्रांनी आझाद सरकार स्वतंत्र असल्याचें कबूल केलें होतें. आयर्लंडचे डी. व्हॅलेरा यांनी स्वतःची पंधरा हजार पौंडाची देणगी सुभाषबाबूंकडे पाठविली होती. या सरकारचा वीस लक्ष लोकांवर अंमल चालत होता व दोन लक्ष सदतीस हजार लोक सही करून हिंदी स्वातंत्र्यसंघाचे सभासद झाले होते. मलायामध्ये या लीगच्या सत्तर शाखा असून जावा, सुमात्रा, बोर्निओ, सयाम इत्यादि ठिकाणीं आणखी २४ शाखा होत्या. ब्रह्मदेशांत ६५ शाळा आझाद सरकाराने चालविलेल्या होत्या. या सरकाराला स्वतःचा मुलूख म्हणजे अंदमान निकोबार बेटें, वीस कोट रुपयांचा निधि, स्वतःचें सैन्य, स्टेट-बँक, पोष्ट, रेडिओ स्टेशन, नाणें वगैरे सर्व कांहीं होतें. पण दुर्दैवानें नव्हतें काय तर आयुष्य ! हिंदुस्थान स्वतंत्र होऊन त्याची नवी राज्यघटना होईपर्यंत आझाद सरकार हें तात्पुरतें सरकार असून, राष्ट्रीय-



नेताजी सुभाषबाबू

सभा ही आमची सर्वश्रेष्ठ सभा, तिरंगी झेंडा हा आमचा ध्वज, आणि अखंड हिंदुस्थान हें आमचें ब्रीद असें जाहीरनाम्यांत म्हटलें होतें. व हिंदुस्थान स्वतंत्र करण्याकरिता रक्ताचा शेवटला बिंदु सांडेपर्यंत आम्ही लढूं अशी शपथ घेण्याचा त्यांत आदेश होता.

आझाद सेनेचा इतिहास व १८५७ चा इतिहास यांत दुसराहि फरक आहे. सत्तावनच्या बंडानंतर त्या बंडाशीं संबंध दर्शविण्याचें राहोच पण नुसतें बोलण्याची चोरी होती, मग अभिनंदन दूरच! याच्या उलट आझाद सेनेच्या शौर्याचें अभिनंदन व समर्थनहि साऱ्या देशभर इतक्या मोठ्या प्रमाणावर झालें की सारा देश हालून गेला. शहानवाझ, सहगल, धिलन, कर्नल लक्ष्मी इत्यादि पुढाऱ्यांना सरकारला सोडून देण्याची पाळी आली. स्वातंत्र्यासाठी बंड करण्याचा परतंत्र राष्ट्राचा हक्क आहे, हें या वीर लोकांनी कोर्टांत हडसूनखडसून सांगितलें. आणि त्यांना सहानुभूति दाखविण्याकरिता सारा देश त्यांच्या पाठीशीं उभा करून पंडित जवाहरलाल नेहरू यांनी अपूर्व कामगिरी केली. १८५७ सालीं सशस्त्र बंड होऊन व अमूप रक्त सांडलें जाऊनहि जनतेच्या पदरांत राजकीय हक्क कांहीच पडले नाहीत. कारण सामान्य जनता त्या बंडापाठीमागे नव्हती. आज ती स्थिति पुष्कळच पालटली आहे.

म. गांधी व सुभाषबाबू यांचे स्वातंत्र्याच्या मार्गाबद्दल असलेले स्वभाव-भेद व राजकीय मतभेद सुप्रसिद्ध आहेत. तथापि दोघांनी एकाच वेळीं इंग्रजाविरुद्ध बंड केलें! सुभाषबाबू हे "शठं प्रति शाठ्यं" या शिवाजीच्या तत्त्वाचे अनुयायी होते. सशस्त्र प्रतिकार व हिंसा त्यांनी निषिद्ध मानली नाही व बंधमुक्त झालेल्या शूर सुभाषसैनिकांमधून यापुढे जें नवें पुढारीपण देशाला लाभणार आहे तेंहि असेंच असेल हें सहज अनुमानितां येईल. याच्या उलट गांधीजींचें अहिंसात्मक तत्त्वज्ञान आहे. कलकत्त्याला शरच्चंद्रजींच्या घरीं म. गांधी गेले असतां सुभाषबाबूंबद्दल एकच वाक्य बोलले. " सुभाषबाबूंच्या स्वार्थत्यागाबद्दल मला या पूर्वींहि कधी शंका नव्हती. पण त्यांचें निधड्या छातीचें धैर्य आणि संघटनाचातुर्य याची कल्पना ते हिंदुस्थान सोडून जाईपर्यंत मला आली नाही! " याच्या उलट, सिंगापूर पडल्यावर म. गांधी यांनी जी ऐन युद्धकाळांत इंग्रजांविरुद्ध

"चलेजाव"ची चळवळ केली त्याचें सुभाषबाबूंना मनांतून फार कौतुक वाटलें. सिंगापूर पडल्यानंतर इंग्रज सेनापतीने हिंदी सैन्याला मेंढरांप्रमाणे जपान्यांच्या हवाली केलें, त्या बिकट चमत्कारिक परिस्थितींत म. गांधींच्या या घोषणेने आम्हांला धीर आला असें ले. धिलन यांनी नुकतेंच व्याख्यानांत सांगितलें तें खोटें नाही. १९४३ सालीं नभोवाणीवरील सुभाषबाबूंनी केलेल्या भाषणांत म. गांधींना उद्देशून म्हटलें होतें, " हिंदुस्थान स्वतंत्र करण्याचा तुम्हांप्रमाणेच आम्हीहि निश्चय केला आहे. महात्माजी ! हिंदुस्थान स्वतंत्र झालें म्हणजे इंद्रप्रस्थाच्या तख्तावर तुम्हांला बसवून गंगाजलाने मी तुमचे पाय धुवीन. स्वतंत्र हिंदुस्थानला तुम्हांसारख्या थोर विभूतीची कितीतरी आवश्यकता आहे. आमच्या चळवळीला आपला आशिर्वाद असावा !" गांधीजी व सुभाषचंद्र या दोन शक्तींना आपण फार तर उत्क्रांति व क्रांति असें म्हणूं. दोहोंत स्वभावभेद व प्रकृतिभेद इतके आहेत की, त्यांचें एकत्र पटणें सहसा दुरापास्त होतें यांत कांही शंका नाही. पण क्रांति आणि उत्क्रांति या सख्या बहिणी नसल्या तरी एकमेकांचें शत्रुत्व करणाऱ्या सावत्र बहिणीहि नाहीत ! असलाच तर त्यांत सख्खा-चुलत इतकाच भेद मानतां येईल. कारण उत्क्रांति ही क्रांतिचीच पूर्वतयारी करते आणि क्रांति स्थिर करण्याकरिता पुनः उत्क्रांतीचाच स्वाध्याय म्हणावा लागतो हें विसरूं नये.

स मा प्त



चंदेल प्रकाशन